महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ६९ वी बैठक

बैठक दिनांक	दिनांक -२८ जानेवारी २०२२
ठिकाण	सभागृह क्र. ४, ७ वा मजला, मंत्रालय, मंबई -४०००३२
वेळ	सकाळी ११.०० वाजता

बैठकीचे इतिवृत्त

विषय क्रमांक. १: - सन्माननीय सदस्यांच्या रजे बाबत.

ठराव क्रमांक. १: - सन्माननीय सदस्य श्री. फारुक अनवर शाह यांची रजा एकमताने मंजुर करण्यात येत आहे.

विषय क्रमांक.२: - दिनांक २५.१२.२०२१ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत.

ठराव क्रमांक. २: - दिनांक २५.१२.२०२१ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त वाचून सुधारणांसह कायम करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळासमोर सुनावणी होऊन निर्णयासाठी बंद करण्यात आलेली प्रकरणे आदेशार्थ सादर.

विषय क्रमांक. ३: -

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४१ अंतर्गत क्षेत्रफळ दूरूस्ती बाबत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ओएसडी/१०५६/२००७

खूददूस जिलानी जमादार व इतर ५ रा. बेंबळी, ता. उस्मानाबाद

----- अर्जदार

विरुध्द

सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी,
मौजे. बेंबळी, ता. जि. उस्मानाबाद

----- हरकतदार

प्रकरण - दर्गाह हजर जिंदा लाल शाहबाद कब्रस्तान व मशीद, मुपो. बेंबळी, ता.जि.उस्मानाबाद या संस्थेचे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४१ नुसार मस्जीदचे क्षेत्रफळ दूरूस्त करणे बाबत. नोंदणी क्रमांक. MSBW/ ओएसडी/३६//२००८

प्रारंभिक(विवेचन) :-

दर्गाह हजर जिंदा लाल शाहबाद ॲण्ड ग्रेवयार्ड मुपो. बेंबळी, ता.जि.उस्मानाबाद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/ ओएसडी/३६//२००८ असा आहे.

सदर संस्थेची मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

दिनांक ७.२.२०१४ रोजी सय्यद बरकतुल्ला यासीन हाश्मी रा.बेंबली ता. जि.उस्मानाबाद यांनी अर्ज देवून सदर वक्फ संस्थेचे क्षेत्र दूरूस्त करून देणे बाबत विनंती केली आहे. तसेच वक्फ मंडळाच्या अभिलेखात वक्फची जागा २ एकर ३ गूंठे असून ७/ १२ च्या रेकॉर्डला २ एकर २१ गूंठे अशी नोंद आहे. त्या अनूषंगाने १८ गूंठे नोंद कमी लागलेली आहे. त्यानूसार ७/१२ रेकॉर्ड प्रमाणे क्षेत्राची नोंदणी दूरूस्त करण्यांत यावी अशी विनंती केली आहे.

दि. २१/०४/२०१४ रोजी या कार्यालयाचे पत्र. क्र मरावमं/नोंदणी/१०५६/०७/२२८०/१४ अन्वये या प्रकरणी जाहिर प्रगटन काढण्यात आलेले होते व जिल्हा वक्फ अधिकारी उस्मानाबाद यांना या प्रकरणी अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार दि. १०/०२/२०१४रोजी जिल्हा वक्फ अधिकारी उस्मानाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. नोंदणी/७२/२०१४ अन्वये अहवाल देऊन असे कथन केले आहे की सदर संस्थेची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र ता.जि. उस्मानाबाद पार्ट सि च्या अनुक्रमाने ०३ वर आहे. व त्यांची नोंद वक्फ मंडळामध्ये नोंद झालेली आहे. सदरील दर्गा कब्रस्तानचे क्षेत्र राजपत्रा प्रमाणे २ एकर ३ गुंठे आहे. महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये क्षेत्र कमी लागलेले आहे. परंतु ७/१२ च्या रेकॉडला २ एकर २१ गुंठे अशी नोंद आहे या करीता कलम ४१ प्रमाणे क्षेत्र दुरूस्ती करण्यात यावी असा अहवाल सादर केला आहे. या प्रकरणाच्या अनुषंगाने दि. २५/०४/२०१४ रोजी सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी बेन्बली ता.जि. उस्मानाबाद यांनी हरकत दाखल केलेली आहे.व हरकतीत असे नमुद केलेले आहे की मौजे बेंबळी ता.जि.उस्मानाबाद येथील कब्रस्तान मस्जिद येथे एकूण १ हेक्टर २ आर इतकी जमीन ग्रामपंचायत बेंबळी येथील नमुना नंबर २७ प्रमाणे ग्रामपंचायत रेकॉर्डला नोंद आहे. तसेच ग्रामपंचायत ने दर्गाह हजरत जिंदाल शाहबाद व कब्रस्तान मस्जीद येथे तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत विविध विकास कामांचे उदा कम्पाउंड वाल, रस्ता,दिवाब-ती इ. अंदाजपत्रक तयार करन शासनाकडे मंजूरीसाठी पावण्याची पूणर्स प्रक्रिया केली आहे तसेच ग्रामपंचायत व तलाठी कार्यालयाकडील रेकॅ र्ड प्रमाणे सदर जमीन महाराष्ट्र शासन या नावाने सात बारावर नोंद आहे या पूर्वी ग्रामपंचायत कडून विविध विकास कामे करण्यांत आली आहे.

तरी सदर नोंद तलाठी कार्यालय बेंबळी व ग्रामपंचायत बेंबळी ता. जि.मस्मानाबाद यांच्याकडे असल्याने सदर नोंद आपणाकडे वक्फ रजिस्टर मध्ये घेवू नये अशी हरकतदार यांनी विनंती केली आहे.

त्या अनुषगाने दि. ३०,९,२०२१ रोजी सर्वांना सूनावणी करिता बोलविण्यांत आले होते तदनंतर दिनांक ८/१०/२०२१ रोजी शेवटची सूनावणी झाली त्यावेळेस अर्जदाराच्या वतीने एम.झेड.ए.खान हे वकिल हजर होते व त्यांचा यूक्तीवाद ऐकल्यानंतर सदरची संचिका आदेशाकरिता ठेवण्यांत आली.

ठराव क्रमांक ३:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार व हरकतदार यांचे म्हणणे तसेच संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, दर्गाह हजरत जिंदालाल शाहबाद ॲण्ड ग्रेवयार्ड मु.पो. बेंबळी, ता.जि.उस्मानाबाद या वक्फ संस्थेच्या मिळकती बाबत झालेल्या दि. १४ जुलै १९६४ च्या सर्व्हे मध्ये सदर वक्फ संस्थेची मिळकत २ एकर २१ गुंठे इतकी दर्शविण्यात आली आहे. तथापी या सर्व्हे अहवालावरुन

तयार करण्यात आलेल्या राजपत्रामध्ये या वक्फ संस्थेची मिळकत २ एकर ३ गुंठे अशी दर्शविण्यात आली आहे. सर्व्हे अहवालची नोंद योग्य व बरोबर आहे अशीच नोंद महसूल विभागाच्या ७/१२ च्या उता-यावर २ एकर २१ गुंठे अशी घेण्यात आली आहे. याच जागेवर आठवडा बाजार कालंतराने भरविण्यास सुरुवात झाली. सदर आठवडा बाजार वक्फ मिळकतीच्या जागेवरच भरविण्यात येत आहे हे स्पष्ट होते. महसूल विभागाकडील ७/१२ उता-यामध्ये वक्फ मिळकतीच्या क्षेत्रफळाची २ एकर २१ गुंठे अशी असलेली नोंद योग्य असून या नोंदीप्रमाणे दर्गा हजरत जिंदालाल शाहबाद कब्रस्तान मस्जीद मु.पो.बेंबळी ता.जि.उस्मानाबाद या वक्फ संस्थेच्या मालम-तेची नोंद वक्फ अभिलेखात २ एकर २१ गूंठे अशी घेण्यांत यावी व त्या प्रमाणे सुधारित नोंद घेण्यास वक्फ मंडळाची मंजूरी आहे.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक ४:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अंतर्गत मस्जिद नोंदणी करिता झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका /नोंदणी//८८९//सोलापूर२०१४

जैनोददीन लाडलेसाब अशरफी
मैंदर्गी ता. अक्कलकोट जि.सोलापूर ----- अर्जदार

विरुध्द

सय्यद महेमुद शाहेद सय्यद खूंदमीर पिरजादे ----- हरकतदार
रा. मैंदर्गी ता. अक्कलकोट जि.सोलापूर

प्रकरण : सार्वजनिक मस्जीद ट्रस्ट मु .पो.मैंदर्गी ता.अक्कलकोट जि.सोलापूर या संस्थेचे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार मस्जीदचे नोंदणी करणे बाबत. नोंदणी क्रमांक. MSBW/ एसएलआर/३६४//२०१८

प्रारंभिक(विवेचन) :-

सार्वजनिक मस्जीद ट्रस्ट मु.पो. मैंदर्गी ता.अक्कलकोट जि.सोलापूर या संस्थेचे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार मस्जीदचे क्षेत्रफळ नोंदणी करणे करिता अर्जदार यांनी अर्ज दाखल केला होता व अर्जासोबत नगरपरिषद मैदंर्गी हददीतील मिळकत कराचे रजिस्टरचा उतारा सन १९८९.९० तसेच सन २०१३.२०१४ चा उतारा जोडला होता .वरील कागदपत्राची पडताळणी करण्यारत आली.

या प्रकरणी सूनावणी ठेवण्यांत येवून दिनांक २४.१०.२०१८ रोजी आदेश पारीत करूनल सार्वजनिक मस्जीद मैंदर्गी ता. अक्कलनकोट जि. सोलापूर या वक्फ मिळकतीचे वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नूसार नोंदणी करून सदर मिळकतीची कलम ३७ अन्वये अभिलेखात नोंद घेवून त्यास नोंदणी क्रमांक दयावा असे आदेशित करण्यांत आले होते व्यवस्थापनासाठी संबंधीतांनी वेगळाअर्ज देवून योजना सादर करावी अशा स्वरुपाचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी मरावमं औरंगाबाद यांनी निर्गमित केले होते

मुख्या कार्यकारी अधिकारी मरावंम औरंगाबाद यांनी दिलेल्या दिनांक २४/१०/२०१८ च्या आदेशास अर्जदार श्री सय्यद महेमुद शाहेद सय्यद खूंदमीर पिरजादे रा. मैंदार्गी ता. अक्कलकोट यांनी मा. वक्फ न्यायाधीकरण यांच्यापूढे आव्हान दिले होते व वक्फ अर्ज क्र ५/१९ चा दाखल केला होता. सदरच अर्जवर न्यायाधिकरणाने दिनांक ७.१२.२०१९ रोजी अंतिम आदेश दिले असुन, अर्जदार सय्यद महेमुद यांचा अर्ज अशंत मंजूर केला आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १९.११.२०११ रोजी

निर्गमित केलेले नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक एमएसबीडब्ल्यू/एसएलआर/३६४/२०१८ हे रद्द बातल ठरवुन (सेट असाईड) मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेशित केले आहे की दोन्ही पक्षकारांना पुरेशी संधी देवून पून्हा प्रकरणाची चौकशी करावी तसेच प्रकरण व संस्थेची नोंदणीचा अर्ज दिनांक ३०.१२.२०१६ बाबत एकत्र निकाल दयावा.

मा. वक्फ न्यायाधिकरणाच्या आदेशानूसार या कार्यालयाचे पत्र क्रमांक सूनावणी ०६/६३१६/१५ दिनांक २८.९.२०२१ रोजी नोटीसा काढण्यांत आल्या व प्रकरण सूनावणी करिता दिनांक ८.१०.२०२१ रोजी ठेवण्यांत आले.

सूनावणी मध्ये ॲड रियाज मंगोडी हे जैनोददीन लाडलेसाब अशरफी करिता हजर होते तसेच ॲड दळवी हे गैरअर्जदार/सामनेवाले करिता हजर होते दोन्ही पक्षकारांना ३०.१०२०२१ पूर्वी लेखी यूक्तीवाद दाखल करण्यांत सांगण्यात आले तसेच एकमेकांना त्यांच्या प्रती देण्यांस सांगण्यात आले व प्रकरण आदेशाकरिता ठेवण्यांत आले

<u>अर्जदार जैनोददीन लाडलेसाब अशरफी यांचा यूक्तीवाद -</u>

त्यांनी असे नमुद केले आहे की मा. न्यायधिकरणाने कागदपत्राचां अभिलेख न पाहता वक्फ नोंदणीचा आदेश सेट असाईड केलेला आहे व अर्जदाराने दिलेल्या अर्जावर वक्फ मसजिद ची नोंदणी करण्यांत आली आहे. सदरची वक्फ मसजिद जूनी असून सर्व मुस्लीम लोकांच्या वर्गणीतुन मैदांर्गी गावातील लोकांच्या मदतीने बांधलेली आहे सन १९८९.९० साली सय्यद खूंदामीर सय्यद आलम पिरजादे यांचे नांव सार्वजनिक मसजिद बरोबर वहिवाटदार म्हणून लागलेले आहे. सन १९९० साली सय्यद खूंदामीर यांनी अधिका-यांना हाताशी धरून त्यांचे नांव वहिवाटदार म्हणुन महसूली रेकॉर्डला लावले आहे व त्यानंतर त्यांनी मसजिदच्या गेटला त्यांचे कूलूप लावलेले आहे सदराची मसजिद हे संपूर्ण मुस्लीम समाजाची असून त्यात अहेले सून्नत वल जमात महादवी मोमीन जमात व इतर सून्नी जमात येतात. सबब सदरील संस्थेस सार्वजनिक मसजिद मैंदार्गी अशीच नोंदणी व्हावी व अर्ज मंजूर व्हावा असे नमुद केले आहे.

<u>सय्यद महेमुद शाहे खून्दमीर पीरजादे यांचे तर्फे लेखी युक्तीवाद -</u>

वक्फ मसजिद ही महेदवी समाजाची असून अर्जदार हे त्या समाजाचे धर्मगूरू आहेत. कूरूंदवाड राज्याचे राजे यांनी महेदवी समुदायाकरिता जागा दिली होती सूमारे ४०० वर्षापूर्वी वर उलेखित मसजिद बनवली आहे. श्री. जैनोददीन अशरफी हे महेदवी समुदायाचे व पंथाचे नाही त्यांचा ट्रस्टशी कोणताही संबंध नसतांना ते विनाकारण वाद निर्माण व्हावा म्हणून मसजिद व त्याची जागा हडप करण्याच्या उददेशाने त्यांनी खोटा अर्ज दाखल केला आहे. तरी दिनांक २१/०२/२०१७ रोजी दाखल केलेला नोंदणीचा अर्ज मंजूर करण्यांत यावा व अशरफी यांनी दिलेला अर्ज खारीज करण्यांत यावा.

ठराव क्रमांक ४:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार व हरकतदार यांचे म्हणणे तसेच संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, अर्जदार जैनुद्दिन लाडलेसाहब अशरफी यांनी अलिकडच्या कालावधीतील दस्ताऐवज सादर केले आहेत.

सार्वजनिक मसजिद मैंदर्गी ता.अक्कलकोट जि.सोलापूर च्या नोंदणी करिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे अर्जदार श्री.जैनोद्दिन अशरफी यांनी दिनांक १२.११.२०१४ रोजी वक्फ अधिनियम ३६ अन्वये नोंदणीसाठी अर्ज केला होता. गैरअर्जदार श्री सय्यद महेमुद शाहेद खूंदमीर पिरजादे यांनी सार्वजनिक मसजिदच्या नोंदणीसाठी दिनांक ३०-१२-२०१६ रोजी नोंदणी अर्ज दाखल केला होता. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी म.रा.व.मंडळ औरंगाबाद यांनी दिनांक २४.१०.२०१८ रोजी या प्रकरणी निर्णय देतांना गैरअर्जदार यांचा दिनांक ३०.१२.२०१६ चा अर्ज विचारात घेण्यांत आला नाही असे मा.वक्फ न्यायधिकरणाच्या निष्कर्षात नमुद करण्यांत आले आहे. वक्फ मंडळापूढे

दोन्ही बाजूंचे अर्ज विचारात घेण्यांत आले त्यांचे लेखी म्हणणे तसेच युक्तीवाद विचारात घेण्यांत आला. हे प्रकरण वक्फ संस्थेच्या नोंदणीबाबतचे आहे. वक्फ संस्थेची नोंदणी करण्याचे वक्फ मंडळाला अधिकार आहे. वक्फ संस्थेची नोंदणी कोणी केली आहे किंवा कोणत्या अर्जाच्या अनूषंगाने करण्यांत आली आहे ही बाब गैर लागू आहे. सदर संस्था ही वक्फ संस्था असल्याचे वक्फ मंडळाकडून निश्चित केल्यानंतर अश्या वक्फ संस्था वक्फ मंडळ स्वत:हून कोणाचा अर्ज आलेला नसतांना देखील नोंदणी करु शकते, तथापि, गैरअर्जदाराचा अर्ज विचारात न घेतल्यामुळे वक्फ न्यायाधिकरणाने हे प्रकरण पून्हा सुनावणी साठी पाठविले असल्याने या संपूर्ण प्रकरणाची पुन्हा तपासणी करण्यांत आली.

अर्जदार जैनुद्दिन लाडलेसाहब अशरफी यांनी सादर केलेल्या लेखी दस्तऐवजांची पडताळणी केली असता त्यांनी केलेल्या दाव्यामध्ये अलिकडच्या कालावधीतील कागदपत्रे आढळून आली आहेत. गैरअर्जदाराने दिनांक १०.४.२०४८ पासूनचे विविध दस्तावेज सादर केले असून ते विचारात घेण्यांत आले. त्या दस्ताऐवजानूसार सदर मसजिद मेहदवी मुस्लिम जमातीची असल्याबाबत विविध दाखले सादर करणेत आले आहेत. वक्फ मंडळापूढे हे प्रकरण केवळ नोंदणीच्या अनूषंगाने परत पाठविण्यांत आले असल्याने अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणणे विचारात घेवून सार्वजनिक मसजिद मैंदर्गी ता.अक्कलकोट जि.सोलापूर या वक्फ संस्थेची नोंदणी करण्याबाबत करण्यांत आलेल्या कार्यवाहीमध्ये कोणताही बदल करणे योग्य होणार नाही, कारण सदर वक्फ संस्थेच्या नोंदणीबाबत नोंदणी प्रमाणपत्र देण्यांत आले आहे व त्या बाबतची नोंद वक्फ मंडळाच्या दस्ताऐवजात घेण्यांत आलेली आहे, ही नोंद रदद करता येणार नाही, या वक्फ मिळकतीवर व्यवस्थापन समिती कोणाची असावी या बाबत संबंधित अर्जदार व गैरअर्जदार यांना व्यवस्थापन योजना सादर करणेबाबत कळविण्यांत यावे त्यानंतर दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून व संबंधित संस्थेबाबतचे दस्ताऐवज विचारात घेवून स्वतंत्रपणे योजना मंजूरी बाबतचा निर्णय घेण्यांत येईल.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक ५:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश
संचिका क्र. NDD/२७५/२०१३

अब्दूल बशीर अब्दूल मन्नान
वय- ७९ धंदा- पेन्शनर
र ा.हमीदिया कॉलोनी.नांदेड, ता.नांदेड जि.नांदेड

----- अर्जदार

श्री शेख आबेद म.अ.समद र ा,पीरबू-हान नगर गल्ली नंबर २३ नांदेड

-----हरकतदार

प्रकरण - मस्जिद.ए.अब्दूल हमीद सलफिया, ब्रम्हपूरी,नांदेड जिल्हा नांदेड या संस्थेचे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार व्यवस्थापक समितीची नोंद घेणेबाबत नोंदणी क्रमांक. MSBW/एनडीडी/२५५//२०१६

प्रारंभिक(विवेचन) :-

मस्जिद.ए.अब्दूल हमीद सलफिया, ब्रम्हपूरी, नांदेड जिल्हा नांदेड ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/एनडीडी/२५५//२०१६ असा आहे.

सदर संस्थेची मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

दि.२७/१२/२०१२ रोजी अब्दूल बशीर अब्दूल मन्नान वय- ७९ धंदा- पेन्शनर रा.हमिदिया कॅ ालोनी यांनी अर्ज देऊन विनंती केली की वक्फ अधिनियम १९९५ कलम ३६ अन्वये सदर संस्थेचे व्यवस्थापक समितीची नोंद घेणेत यावी

त्या अनुषंगाने म.रा.व.मं.औरंगाबाद यांनी जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड यांना जा.क्र. मरावमं/नोंदणी/७९५३/१३ दि.२६/०३/२०१३ चे पत्र पाठवुन अब्दूल बशीर अब्दूल मन्नान वय- ७९ धंदा- पेन्शनर रा.हमिदिया कॉलोनी यांनी दिनांक २७/१२/२०१२ रोजी दिलेल्या अर्जानुसार जाहीर पगटनाचा प्रत २ प्रतिकध्ये मोक्याच्या ठिकाणी चिटकावून पंचनामा करून पंचनामा सह सविस्तर चौकशी करून तसा अहवाल त्यांच्या अभिप्राय सह सादर करण्यास सांगण्यात आले होते.

त्यानुसार जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड यांनी चौकशी करून सविस्तर अहवाल त्यांचे पत्र जा.क्र/मरावंम/नोंदणी/७९५३/१०८/१३ दि.१३/०५/२०१३ अन्वये दिलेला आहे. सदरच्या अहवालमध्ये त्यांनी असे नमुद केले आहे की, वक्फ संस्थेच्या प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी व चौकशी करण्यात आली. चौकशी दरम्यान श्री शेख आबेद म.अ.समद रा,पीरबू-हान नगर गल्ली नंबर २३ नांदेड यांनी अक्षेप अर्ज दाखल केला आहे परंतु त्यासोबत त्यांनी कोणतेही कागदपत्र दिलेले नाही, . घटनास्थळी स्थळ पाहणीचा पंचनामा करण्यात आला त्याची प्रत त्यांनी अहवाल सह दाखल केलेली आहे. तसेच घटना ठिकाणी त्यांनी फोटो काढलेले आहे. तरी नियमा नुसार पूढील आदेश पारीत करावे असे कथन केले आहे,

हरकतदार श्री शेख आबेद म.अ.समद रा,पीरबू-हान नगर गल्ली नंबर २३ नांदेड यांनी दि.०८/०४/२०१३ रोजी अक्षेप अर्ज दाखल केला आहे. त्यांत त्यांनी खालील प्रमाणे कथन केलेले आह

हरकतदार श्री शेख आबेद म.अ.समद रा,पीरबू-हान नगर गल्ली नंबर २३ नांदेड यांचे म्हणणे-

हरकदार यांनी त्यांच्या हरकतीमध्ये असे नमुद केले आहे की, विषयांकित मस्जीद व मदरसेचा अर्जदारांशी कसलाही प्रकारचा संबंध नसून त्यांनी अपूर्ण व खोटी माहिती सादर केलेली आहे व आपल्या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे,

तसेच मस्जीद व मदरसेचे व्यवस्थापन हरकतदार अर्जदार व त्यांचे सहकारी गेल्या आठवर्षापासून करीत आहे, नोंदणी करिता प्रस्तावित अर्जात नमुद माहिती वस्तुस्थितीशी विसंगत आहे,

विष्यांकित मस्जीद व मदरसाची मालम-ता जूना मस्जीद ए शोकनूल इस्लामचा वक्फ आहे, एकदा वाकीफने वक्फ केल्यानंतर नूजूलदाराने (मालक नसतांना) यपून्हा वक्फ मंडळात वक्फ करणे कायदयास अभिप्रेत नसून बेकायदेशीर कृत्ये आहे,

वरील नमुद हे सर्व प्राथमिक आक्षेप ग्राहय धरुन वक्फ नोंदणी व व्यवस्थापन मंडळाची कार्यवाही रदद करून उपकृत करावे अशी विनंती केलेली आहे,

त्यानंतर हरकतदार व अर्जदाराला मंडळाचे पत्र जा.क्र. मरावमं/सुनावणी/५६२४/२१ दिनांक १८/८/२०२१ अन्वये नोटीसा काढून दि. ०२/०९/२०२१ रोजी हजर होऊन लेखी म्हणणे देण्यास सांगण्यात आले. त्यानंतर दि. ०२.०९.२०२१ चौकशी झाल्यानंतर त्या चौकशी मध्ये ॲड. एस बी खान हे अर्जदार अब्दूल बशीर करिता हजर होते, तसेच हरकतदारास म्हणणे देणेस मुदत देण्यांत आली होती परंतु आज अखेर त्यांनी म्हणणे व कागदपत्र. सादर केलेले नाही करिता कायदेशीर सल्ला घेवून वक्फ मंडळाच्या सदस्यापूढे ठेवणेकरिता पूढील आदेश पारीत केले आहे. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर सदरचे प्रकरण हे आदेशा करिता ठेवण्यात आले.

ठराव क्रमांक ५:- उपरोक्त विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.

विषय क्रमांक ६:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ४२/४२/२०१९

मुसाअब्दुल मोमीन
वय- ७९ धंदा- पेन्शनर
रा. केम ता. करमाळा जि. सोलापुर

----- अर्जदार

विरुध्द

सैफन रशीद पठाण,
रा. केम, ता. करमाळा, जि. सोलापुर ----- हरकतदार

प्रकरण - मस्जिद केम ता. करमाळा जि. सोलापुर या संस्थेचे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार व्यवस्थापन समितीची फेरफार अर्ज मंजुर करणे बाबत.
नोंदणी क्रमांक. MSBW/SLR/३७९/२०१९

प्रारंभिक -

मस्जिद केम ता. करमाळा जि. सोलापुर ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/SLR/३७९/२०१९ असा आहे.

सदर संस्थेची मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे

दि.२३/०१/२०१९ रोजी मुसाअब्दुल मोमीन, वय- ७९, धंदा- पेन्शनर, रा. केम ता.करमाळा, जि. सोलापुर यांनी अर्ज देऊन विनंती केली आहे की वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ अन्वये सदर संस्थेची व्यवस्थापकीय समिती मधील विश्वस्तांच्या बदलास मान्यता मिळावी व तसा अर्ज मंजुर करण्यात यावा.

सदरच्या अर्जदार मुसा अब्दुल मोमीन यांनी दिलेल्या अर्जावर श्री. सैफन रशीद पठान रा. केम, ता. कळमाळा जि. सोलापुर यांनी दि.०९/०४/२०१९ रोजी अक्षेप अर्ज दाखल केला आहे.

हरकतदार सैफन रशीद पठान यांचे म्हणणे-

हरकदार यांनी त्यांच्या हरकतीमध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदाराचा अर्ज खोटा असुन खोटया माहितीच्या आधारे दाखल केलेला आहे. सबब हरकतदार त्यास नाकारत आहे. फेरफार अर्ज योजनेमध्ये Mode Of Succession च्या आधारावर दिलेले नाही. तसेच योजनेची प्रत दाखल केलेली नसल्याने ते रद्द होनेस पात्र आहे. अर्जदाराने अदयाप पावेतो ऑडीट रिपोट दिलेले नाही. वरील सर्व करणास्तव अर्जदाराचा अर्ज रद्द करण्यात यावा.

त्या अनुषंगाने म.रा.व.मं.औरंगाबाद यांनी प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे विभाग पुणे यांना जा.क्र. मरावमं/चौकशी/२१३४/१९ दि.१६/०४/२०१९ चे पत्र पाठवुन मुसा अब्दुल मोमीन यांनी दि. २३/०१/२०१९ रोजी दिलेल्या अर्जानुसार सविस्तर चौकशी करून तसा हवाल त्यांच्या अभिप्राय सह सादर करण्यास सांगण्यात आले.

त्यानुसार प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे यांनी चौकशी करून सविस्तर अहवाल त्यांचे जा.क्र. पुणे/चौकशी/८४/१९ दि.१७/०५/२०१९ अन्वये दिलेला आहे. सदरच्या अहवालमध्ये त्यांनी असे नमुद केले आहे की, वक्फ संस्था मस्जिद केम ता. करमाळाचे महाराष्ट्र वक्फ अधिनियम कलम ४२ प्रमाणे प्रत्यक्ष घटाना स्थळी जाऊन पाहणी व चौकशी करण्यात आली चौकशी दरम्यान सैफन रशीद पठान रा. केम यांनी दिलेल्या अक्षेप अर्जाची चौकशी करण्यात आली त्या वेळेस सैफन रशीद पठान हे चौकशीच्या वेळी उपस्थित नव्हते. घटना स्थळी स्थळ पाहणीचा पंचनामा करण्यात आला त्याची प्रत त्यांनी हवाला सह दाखल केलेली आहे. तसेच घटना ठिकाणी त्यांनी फोटो काढलेले आहे. तरी नियमानुसार व्यवस्थापकीय समितीचा फेरबदल अर्ज मंजुर करावा असे नमुद केले आहे.

अर्जदारांने सादर केलेल्या व्यवस्थापकीय विश्वस्तामधील फेरफार प्रस्तावातील कागदपत्रांची काळजीपुर्वक पळताळणी केल्यानंतर सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्तांमधील फेरफार अर्ज मान्यता प्राप्त योजने प्रमाणे नवीन विश्वस्त घेण्याची रीत (Mode Of Succession) प्रमाणे फेरफार अर्ज विश्वस्तांनी सादर केला असल्यामुळे मा. उच्च न्यायालय हैदराबाद तेलगांना आंध्राप्रदेश डिवीजन बेंच (२०१४) ३ ALD ७८ (२०१४) ALJ ६८८ याची क्र. २१३/१४ मध्ये आदेश क्र. ०४-०३-२०१४ नुसार सदरचा फेरफार अर्ज नोंद करणे अनिवार्य आहे. त्या नुसार वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची पैठक दि.०८मे व ०९मे २०१८, ठराव क्र.३६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

तदनंतर हरकतदार यांनी वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद यांचे पुढे वक्फ अर्ज क्र. ६१/१९ सादर करून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना सुनावणीची पुरेशी संधी न दिल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा आदेश रद्द करण्याची मागणी केलेली असता सुनावणी पुर्ण झाल्यानंतर मा. न्यायाधिकरण यांनी असा निर्णय दिला की,

मुस्लीम समाजातून सूचि-१ प्रमाणे नवीन विश्वस्तांची निवड ही निवडणूक प्रक्रियेने होणे आवश्यक आहे. जाफर अंबीर पठाण यांच्या निधनानंतर चालू विश्वस्तांनी सूचि-१ प्रमाणे नवीन विश्वस्तांची नेमणूक केली का १. वरील वक्फ अर्जातील सामनेवाले १ व ५ यांनी सर्व मुस्लीम समाजाला दिनांक २१.१२.२०१८ रोजी सर्वसाधरण सभेला बोलावले यांची कोणतीही नोटीस रेकॅ ार्डला नाही म्हणून त्यांनी सर्वसाधरण सभा बोलवली असे म्हणता येणार नाही. तसेच वक्फ अधिकारी यांना मुख्य कार्यकारीर अधिकारी यांनी अहवाल मागिमतला व अहवाल सादर करतांना त्यांनी सांगितले की चौकशी दरम्यान हरकतदार सैफन रशीद पठाण हा चौकशीच्या ठिकाणी जागेवर हजर नव्हता, असे कोणतेही रेकॉर्ड नाही की सैफन ला दिनांक १७.५.२०१९ रोजी चौकशी करिता बोलावले होते. जर त्यांना नोटीस पाठवलेली नासेल तर तुम्ही असे अभिप्रित किंवा ग़हित धरु शकत नाही की, सैफन रशीद पठाण यांनी चौकशीच्या वेळेस तेथे हजर राहायला पाहिजे. तसेच सदर चौकशीचा कोणताही पूराव ा नाही. वक्फ अधिकारी यांनी गांवातील लोकांचे व कोणाचे ही जबाब नोंदवलेले नाही त्यामुळे सदरील प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारीर यांनी वक्फ़ कलम ४२ चे व्यवस्थीत पालन केले नाही असे न्यायाधिकरणाचे मत आहे. सबब झ ालेले आदेश हे बेकायदेशीर असून सदरचे प्रकरण परत मुख्य कायर्कारी अधिकारी यांचे

कडे पूनश्च; चौकशी करिता पाठविणेत येत आहे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित पक्षकारांना नोटीसा काढाव्या व त्याप्रमाणे चौकशी करुन पुढील आदेश पारीत करावे.

त्यानंतर हरकतदारांना नोटीस काढण्यात आली. तसेच दि. १८/०८/२०२१ रोजी मंडळाचे पत्र जा.क्र. मरावमं/चौकशी/५६२९/२१ अन्वये सर्व संबंधीतांना नोटीसा काढून दि. ०२/०९/२०२१ रोजी हजर होऊन लेखी म्हणणे देण्यास सांगण्यात आले. त्यानंतर दि. ०२.०९.२०२१ चौकशी झाल्यानंतर पुढील चौकशी दि. ०७.१०.२०२१ रोजी ठेवण्यात आली त्याचौकशी मध्ये मुसा अब्दुल मोमीन यांचे वकील रियाज अहमद हे हजर होते. तसेच अर्जदार क्रं. २ ते ५ व १० करीता व सर्व अर्जदारा करिता निसार अहमद हे वकिल हजर होते.

ठराव क्रमांक ६:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार व हकरतदार यांचे म्हणणे, तसेच दोन्ही बाजुंचा युक्तीवाद व वरील नमुद न्यायधिकरणाचा निष्कर्ष, या बाबी विचारात घेता खालील बाबी स्पष्ट होतात.

मुस्लीम समाजाच्या सदस्यामधून मुतवल्ली/व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या नेमणूकी करिता नियमानूसार व धर्मादाय आयूक्त यांच्या अनुसूचि-१ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची निवड ही मतदान पध्दतीने होणे आवश्यक आहे, अशाप्रकारे निवड पध्दतीचे व्यवस्थापकीय मंडळ अस्तित्वात आले तर कोणाचाही आक्षेप असणार नाही. पारदर्शक व सर्वसमावेशक पध्दतीने या बाबत कार्यवाही करण्यांत येईल त्याकरिता प्रादेशीक वक्फ अधिकारी, पुणे विभाग पुणे यांना सूचित करण्यांत यावे की त्यांनी वकिलाची नियुक्ती करुन निवडणूक प्रक्रिया योग्य त-हेने पारदर्शक पध्दतीने पार पाडावी जेणे करून कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत घ्यायला वाव मिळू नये. निवडणूकी प्रक्रियेसाठी आवश्यक सर्व बाबी पूर्ण कराव्या. संबंधितांना नोटीसा देणे त्यांची पोहोच घेणे व तत्सम बाबी ज्याचा नंतर उहापोह होण्याची शक्यता आहे त्या सर्व बाबी पूर्ण कराव्यात. तसेच निवडणूकी सबंधी गांवात व सार्वजनिक ठिकाणी तसेच नोटीस बोर्डावर मतदानाबाबत प्रसिध्दी द्यावी तसेच जे कोणी इच्छूक असतील ते व पुर्वीचे समिती सदस्य व हरकतदार तसेच अर्जदार या सर्वांना निवडणूक/मतदानाच्या नोटीसा द्याव्यात, तसेच सर्व मोक्याच्या ठिकाणी मतदानाबाबत नोटीसा डकवाव्यात व नोटीसा डकवले बाबत तसा संबंधितांचा अहवाल घ्यावा व सर्व कागदपत्राची पूर्तता करून तसे रेकॉर्ड तयार करावे.

निवडणूक प्रक्रिया पुर्ण झाल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे अहवाल सादर करावा. प्रादेशीक वक्फ अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निवडून आलेल्या सदस्यामधून व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी आदर्श स्किम (मॉडेल स्कीम) प्रमाणे सदर वक्फच्या व्यवस्थापनासाठी सर्वसमावेशक योजना सादर करणेबाबत त्यांना आदेश देण्यात यावेत व ३ महिन्यामध्ये सदरील सर्वसमावेशक योजना सादर करणेबाबत कळविण्यात यावे. सदरील योजना प्राप्त झाल्यानंतर योजना मंजूरी बाबत वक्फ मंडळाकडून स्वतंत्र कार्यवाही करण्यात येईल.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक ७:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश
संचिका क्र. चौकशी/४२/३५५/२०१२

सय्यद युनुस मोहियोद्दीन व इतर ११.
रा. लोटनपुरा बालापुर ता. बालापुर जि. अकोला. ----अर्जदार

शेख चांद रहेमान
रा. लोटनपुरा बालापुर ता. बालापुर जि. अकोला.

------- गैरअर्जदार

प्रकरण - लोटनपुरा मस्जिद ट्रस्ट बालापुर ता. बालापुर जि. अकोला या संस्थेचे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार व्यवस्थापन समितीची फेरफार अर्ज मंजुर करणे बाबत. नोंदणी क्रमांक. MSBW/AKL/१०३/२००९ दि.०९/१०/२००९

प्रारंभिक -

लोटनपुरा मस्जिद ट्रस्ट बालापुर ता. बालापुर जि. अकोला ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून तीचा नोंदणी क्र. MSBW/AKL/१०३/२००९ असा आहे.

सदर संस्थेची मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

दि.१४/०९/२०१२ रोजी सय्यद युनुस मोहियोद्दीन व इतर ११, रा. लोटनपुरा बालापुर, ता. बालापुर, जि. अकोला यांनी अर्ज देऊन विनंती केली की वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ अन्वये सदर संस्थेची व्यवस्थापकीय समिती मधील विश्वस्तांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या विश्वस्तांच्या जागी नविन विश्वस्त बदलास मान्यता मिळावी व तसा अर्ज मंजुर करण्यात यावा.

सदरच्या अर्जदार सय्यद युनुस मोहियोद्दीन व इतर ११, रा. लोटनपुरा बालापुर, ता. बालापुर, जि. अकोला यांनी दिलेल्या अर्जावर कोणीही आक्षेप दाखल केलेला नाही.

त्यानंतर म.रा.व.मं.औरंगाबाद यांचे पत्र क्र. मरावमं/चौकशी/५१७/४०६/२१३ दि.२६/०३/२०१३ अन्वये जाहिरप्रगटन प्रसिध्द करून वरील प्रमाणे फेरफार अर्ज मंजुर करण्यास कोणाची हरकत/आक्षेप/तक्रार असल्यास त्यांनी नोटीस मिळाल्यापासुन १५ दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तसे लेखी सादर करावे तसेच मुदतीनंतर सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल असे नमुद केले होते.

त्या अनुषंगाने प्रादेशिक वक्फ अधिकारी अमरावती विभाग अमरावती यांना सुचना देवुन कळविण्यात आले की श्री.सय्यद युनुस मोहियोद्दीन व इतर ११, रा. लोटनपुरा बालापुर ता. बालापुर जि. अकोला.यांनी दिलेल्या अर्जावर सखोल चौकशी करुन तसा अहवाल अभिप्रायासह सादर करावा.

दिलेल्या कालावधी मध्ये कोणीही आक्षेप/हरकत अथवा तक्रार केली नसलेने दि.०६/०६/२०१३ रोजी जा.क्र. म.रा.व.मं./चौकशी/९६४/४९४०/१३ अन्वये सूचना पारित करण्यात आली व त्यामध्ये नमुद करण्यात आले की वक्फ अधिनियम १९९५ चे ४२ व म.रा.व.मं.चे ठराव क्रं.०५/११ दि.१०/०६/२०११ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून लोटनपुरा मस्जिद ट्रस्ट बालापुर च्या व्यवस्थापकीय विश्वस्तामध्ये फेरफार अर्ज योजनेमधील तरतुदीनुसार स्विकृत करुन नोंदवीण्याचे आदेश देण्यात आले.

तदनंतर गैरअर्जदार शेख चांद रहेमान रा. लोटनपुरा बालापुर ता. बालापुर जि. अकोला. यांनी वक्फ न्यायाधिकर औरंगाबाद यांचे पुढे वक्फ अर्ज क्र. ०९/१४ सादर करून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा आदेश रद्द करण्याची मागणी केलेली असता सुनावणी पुर्ण झालेनंतर मा. न्यायाधिकरण यांनी दि. १८/१०/२०१७ रोजी असा निर्णय दिला की, अर्ज अशंत मजुर करण्यात येत आहे. दि.०६/०६/२०१३ रोजी अर्जदार क्रं २ ते १२ यांनी दाखक केलेले फेर रद्द करण्यात येत असुन प्रकरण पुन्हा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे पाठविण्यात येत असुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ मंडळ यांच्या कडे पूनश्च चौकशीसाठी पाठवीण्यात यावे. तसेच पक्षकारांना नोटीसा काढून त्यांचे म्हणणे ऐकावे असे नमुद केले आहे.

त्यानंतर गैरअर्जदार ज्यांनी न्यायाधिकरणापुढे अर्ज दिला होता त्यांना त्यांची बाजु मांडण्याकरीता वेळोवेळी मुदती देण्यात आले मंडळाचे पत्र क्रं. चौकशी/१७/२०/ दि.०१/०१/२०२० अन्वये पत्र पाठवुन दि.०९/०१/२०२० रोजी चौकशी करीता हजर राहण्यास सांगण्यात आले. अंतिम चौकशी दिनांक ७/१०/२०२१ रोजी ठेवण्यांत आली.

हरकतदार(गैरअर्जदार) शेख चांद शेख रहेमान यांचे म्हणणे-

गैरअर्जदार हरकदार यांनी त्यांच्या हरकतीमध्ये असे नमुद केले आहे की, ते वक्फ संस्थेचे ट्रस्टी आहेत व अर्जदार यांनी ब-याच महत्त्वाच्या बाबी मंडळापुढे न आणता फेरफारचा अर्ज दिलेला आहे. त्यांना मशिदीमध्ये नमाज पठणाचा तसेच सेवा करण्याचा अधिकार आहे. तसेच त्यांचे नावची नोंद सार्वजनिक ट्रस्टंच्या नोंदणीसाठीच्या रजिस्टरमध्ये विश्वस्त म्हणुन आहे. सुरूवातीस BPT Act. १९५० च्या कलम १८ अन्वये नोंदणी क्रं. B-१०५ दि. २७/०९/१९६२ अन्वये धर्मदाय आयुक्त अकोला यांच्या पुढे दिलेला आहे. त्यानंतर २००९ साली वक्फ मंडळात नोंदणी झालेली आहे. वक्फ संस्थाची व्यवस्था अर्जदार ट्रस्टी हे मोहोल्यातील लोकांच्या मदतीने करीत होते तसेच इतर लोक मस्जिद ट्रस्टमध्ये ढवळाढवळ करीत नव्हते संस्थेसाठी कोणतीही योजना मंजूर नाही तसेच अनुसुचित १ मध्ये विश्वस्तांची निवड निवडणुक घेऊन. करावी व सदरची निवडणूक ही मोहोल्यातील लोकांमधुन व्हावी असे नमुद आहे. पुढे असे नमुद केले की सुरूवातीला संस्था नोंदणी करताना चार ट्रस्टी होते. सन १९८० साली दि. २९/०९/१९८० रोजी मोहोल्यातील जनरल बॉडीच्या निवडणुकीतुन त्यांची ट्रस्टी म्हणुन निवड करण्यात आली तसेच हरकत दार यांची निवड सुरूवातीचे ट्रस्टी मयत झालेनंतर करण्यात आली. ते सन १९८० पासुन मस्जिद ट्रस्ट विना अडथडयाचे चालवत होते. मशिदीचे ऑडीट, विदयुत बिल, इमामचा पगार तसेच सर्व रेकॉड ते ठेवत होते. हरकतदार स्वता: मशीदीमध्ये पेशइमाम आहे. तसेच ते चदां, जुमा चदां व देणगी मशीदीच्या नावाने जमा करत होते.

<u>अर्जदार ३ ते ७,१०,११ तर्फे जवाब-</u>

वरील अर्जदार ३ ते ७,१०,११ यांनी असे नमुद केले आहे की गैरअर्जदार यांनी आजपावेत त्यांच्या बांजूने असलेली व त्यांनी त्यांच्या हक्काचा दावा असणारी कोणतेही अधिप्रमाणित व कायदेशीर कागद पत्रे व प्रमाणपत्रे अभिलेखावर दाखल केलेले नाही. न्यायाधिकरणाने म्हटले आहे की वक्फ संस्थेच्या परिशिष्ट १ वर दि.२९/०९/१९८० पासुन शेख चांद यांचे नाव समाविष्ट आहे परंतु प्रत्यक्षात दाखल केलेल्या नि. ३० वरील दस्ताऐवज म्हणजेच सदर वक्फ संस्थेच्या परिशिष्ट १ चे अवलोकन केले असता कोठेही हरकतदार यांचे नाव नमुद असल्याचे दिसून येत नाही.

न्यायाधिकरणाने पॅरा १३ मध्ये अर्जदारांने वक्फ बोर्डाकढे जो बदल अर्ज दाखल केला त्यामध्ये विश्वस्त म्हणुन श्री. शेख चांद रहेमान यांच्या नावाचा उल्लेख असल्याचे नमुद केले आहे. परंतु प्रत्येक्षात दि.१४/०९/२०१२ रोजी जो फेर अर्ज दाखल केला आहे त्यामध्ये कोठेही हरकतदार यांचे नावाचा उल्लेख नाही यावरून हरकतदार यांनी न्यायाधिकरणाची दिशाभुल केल्याचे स्पष्ट होते.

सबब वक्फ बोर्डाने चौकशी अंती पारीत केलेला आदेश बरोबर असुन हरकदाराचे हरकत चुकीचे आहे सबब अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

ठराव क्रमांक ७: - उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार व गैरअर्जदार तसेच संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर तसेच दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर असे स्पष्ट होते की, लोटनपुरा मस्जिद ट्रस्ट, बालापुर, ता.बालापुर, जि. अकोला या संस्थेवर मुस्लीम समाजाच्या सदस्यांमधून व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची निवड होणे आवश्यक आहे. याकरिता नियमानुसार व धर्मादाय आयूक्त यांच्या सूचि-१ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची निवड ही मतदान पध्दतीने होणे आवश्यक आहे. अशाप्रकारे निवड पध्दतीने व्यवस्थापकीय मंडळ अस्तित्वात आले तर मतभेद संपूष्टात येतील. त्याकरिता प्रादेशीक वक्फ अधिकारी, अमरावती विभाग अमरावती यांना सूचित करण्यांत यावे की, त्यांनी निवडणूक प्रक्रिया योग्य त-हेने पारदर्शक पध्दतीने पार पाडावी जेणे करून कोणासही कोणत्याही

प्रकारची हरकत घ्यायला वाव मिळू नये. निवडणूकी प्रक्रियासाठी आवश्यक सर्व बाबी पूर्ण कराव्या. संबंधितांना नोटीसा देणे त्यांची पोहोच घेणे व तत्सम बाबी ज्याचा नंतर उहापोह होण्याची शक्यता आहे ते सर्व बाबी पूर्ण कराव्या तसेच निवडणूकी सबंधी गांवात व सार्वजनिक ठिकाणी मतदाना बाबत प्रसिध्दी द्यावी, तसेच जे कोणी इच्छूक असतील ते व पुर्वीचे समिती सदस्य व हरकतदार तसेच अर्जदार या सर्वांना निवडणूक/मतदाना बाबतच्या नोटीसा द्याव्यात, तसेच सर्व मोक्याच्या ठिकाणी मतदानाबाबतच्या नोटीसा डकवाव्यात व नोटीसा डकवले बाबत तसा संबंधितांचा अहवाल घ्यावा व सर्व कागदपत्राची पूर्तता करून तसे रेकॉर्ड तयार करावे.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण करुन मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचे कडे अहवाल सादर करावा. सदरील वक्फ अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निवडून आलेल्या सदस्यांमधून व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी मॉडेल स्कीम प्रमाणे सदर वक्फच्या व्यवस्थापनासाठी ३ महिन्यामध्ये सर्वसमावेशक योजना सादर करणेबाबत कळविण्यात यावे. सदरील योजना प्राप्त झाल्यानंतर योजना मंजूरी बाबत वक्फ मंडळाकडून स्वतंत्र कार्यवाही करण्यांत यावी.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक ८:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ (१) (सी) अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/१४५/२०११

शेख जाहिद मुख्तार,
रा. नारपोळी ता. भिंवडी जि. ठाणे

----- अर्जदार

विरूध्द

१) खालीद असलम सय्यद रा. मुसाफीर खाना, भिवंडी.जि. ठाणे
२) सय्यद असदअली खान मोहमदअली पिरजादे, रा. भिवंडी, जि.ठाणे
३) सय्यद मुजीब अहमद महेमुदूज्जमा, रा. भिवंडी जि.ठाणे

---- गैरअर्जदार

प्रकरण -दर्गा हजरत दिवान शाह ट्रस्ट, ता. भिंवडी जि. ठाणे
दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५(एस) नुसार_प्रशासक नियूक्तीस मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र. MSBW/THN/१२६/२००९

प्रारंभिक - (विवेचन)

दर्गा हजरत दिवान शाह ट्रस्ट, ता. भिंवडी जि. ठाणे ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/THN/१२६/२००९ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५(सी)च्या अधिकाराचा वापर करून संस्था ताब्यात घेवून प्रशासक नियूक्त करणेबाबत अर्जदार शेख जाहिद मुख्तार यांनी

दिनांक ३०.१०.२०१९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्य कडे अर्ज सादर करून प्रशासक नेमणूकीची मागणी केलेली आहे.

सदर प्रकरणासंबंधी अर्जदार यांनी सादर केलेल्या दस्तऐवजांची पाडताळणी करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे सदर वक्फ संस्थेशी संबंधीत अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत की, दर्गाह हजरत दिवानशाह ट्रस्ट, भिवंडी या संस्थेचे विश्वस्त, पदाचा गैरवापर करतात, तसेच वक्फ मिळकतीवर बेकायदेशीर बांधकाम होत आहे ते पाडावे म्हणून मा. उच्च न्यायालयाने आदेश पारीत केले आहे. तसेच संस्थेच्य दैनंदिन व्यवस्थापनासंबंधी व दर्गाह संबंधीत असलेल्या वक्फ मिळकती संबंधी अनेक प्रकरणे वक्फ मंडळात विविध न्यायालयात प्रंलबित आहे. सदरच्या प्रकरणात पाठपूरावा करणे. दर्गेचे दैनंदिन व्यवस्थापन, अनेक अडचणी व आव्हाने असून वक्फ मिळकतीच्या संरक्षणासाठी विविध न्यायालयात पैरवी करण्यासाठी केअर टेकर म्हणून तात्पूरत्या स्वरूपात प्रशासकीय पातळीवर प्रशासकाची नियूक्ती करावी अशा मागणी असे तक्रारदार श्री मोहंमद यूसूफ खान रा. भिवंडी यांनी केली आहे. तसेच श्री मोमीन मोहंमद फैजी यांनी दिनांक १८.३.२०१९ रोजी अर्ज/हरकत देवून असे कथन केले आहे की, हजरत दिवानशाहच्य मिळकती बाबत व्हॉटसअप वर उलट सूलट चर्चा शहरात वायरल होत आहे, तरी सूचि १ मध्ये वक्फ मिळकतीची नोंद रितसर व्हावी. तसेच दिनांक २९.१२.२०१८ रोजी दिवानशाह सेवा संस्थान तर्फे पत्र आले आहे त्यात नमुद केले आहे की श्री सय्यद खालीद असलम व चिफ ट्रस्टी यांनी दर्गाह चे १००० वार जागेवर कब्जा करुन पत्रा पार्टीशन करुन रुम बांधलेले आहे ते रुम ते भाडयाने देतात व आलेले भाडे देखील ते स्वत: वापरतात. तसेच दानपेटया च्या ठिकाणी एक व्यक्तीची नेमणूक सय्यद खालीद असलम यांनी केलेली आहे. ती व्यक्ती त्या दानपेटया कधीही उघडते व त्यातील असलेले दान स्वत:करिता वापरते. अश्या प्रकारे दान पेटयातील दान हे ट्रस्टचे उपयोगाकरिता वापरण्यात येत नाही.

तसेच दिवान शाह सेवा संस्था कडून एक पत्र आलेले आहे त्यात कथन केले आहे की दर्गाहतील मुसाफीरखाना मध्ये सय्यद खालीद असलम कोणाही मुसाफीरला येवू देत नाही तो स्वत: तेथे राहतो व त्याने त्या ठिकाणी कब्जा केलेला आहे. तसेच श्री इफतेखार नझरउल्लाह अन्सारी यांनी दिनांक ७.२.२०१७ रोजी अर्ज देवून कथन केले आहे की सय्यद असद अली मोहंमद अली पीरजादे व सय्यद असलम यांच्यावर पूष्कळ गून्हे दाखल असून त्यांच्यावर एफ आय आर क्र ३६/१५ व २१/१२ अन्वये ४१० ४२० भा.द.वि.अन्वये गून्हे दाखल असून त्यांना अटक झाली होती तसेच त्यांनी वक्फच्या जागेवर बांधकाम करून नूकसान केले आहे तसेच सय्यद खालीद असलम हा दर्गाहच्या बाहेर लावण्यात आलेल्या देणगी पेटीतील रक्कम परस्पर काढून घेतो. तरी अशा गून्हेगांरांना ट्रस्टवर ठेवू नये व त्यांना त्या पदावरून काढून टाकावे. तसेच इन्तेजामिया कमेटी भिवंडी यांनी दिनांक २३.६.२०१६ रोजी पत्र पाठवून दर्गाहचही एकूण ५७ एकर जागा चिफ ट्रस्टीने विकली आहे अशी तक्रार केली असुन दानपेटीचा वापर ते ट्रस्टी करतात तरी त्यांना तेथून काढावे अशी विनंती आहे.

वरील सर्व अर्जांचा व हरकतींचा विचार करुन सदर प्रकरण हे वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५ (एस) अन्वये मंजूर करण्यापूर्वी प्रादेशिक वक्फ अधिकारी कोकण विभाग मुंबई कडून वक्फ संस्था दिवानशाह ट्रस्टच्या संदर्भात दिनांक ११/०२/२०२० रोजी अर्जदाराच्या अर्जासंबंधी चौकशी करुन सविस्तर अहवाल आभिप्रयासह सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते

त्या नुसार प्रादेशिक वक्फ अधिकारी, श्री.खूसरो खान, कोकण विभाग, मुंबई यांनी दिनांक २५.२.२०१६ रोजी त्यांचे पत्र क्रमांक /चौकशी/२०/२०१६ अन्वये अहवाल सादर केला आहे की, संस्थेच्या योजनेमधील कलम ४ अनूसार सदर वक्फ संस्था चीफ ट्रस्टी दर्गाह चे सज्जादा चे परीवार पैकी /अनूसार असा उल्लेख आहे जीव्यक्ती चीफट्रस्टी राहणार व ती अजीवन ट्रस्टी राहणार व उर्वरित मॅनेजींग ट्रस्टी तीन वर्षाकरिता असतील असा उल्लेख आहे. सदर योजनेच्या अनूषंगाने सज्जादानशीन म्हणून असद पिरजादे यांची नियूक्ती करण्यात आली होती व उर्वरित लोकांना असद पिरजादे यांनी सय्यद मुजीब व हारुन यांना मॅनेजींग ट्रस्टी म्हणून नियूक्ती केली होती सध्या असद पिरजादे यांनी कोर्टाच्या दिनांक २०.३.२०१२ च्या निर्णय अनुसार वय जास्त झाल्याच्या कारणास्तव त्यांचा मुलगा सय्यद अब्दूल

अलीखान पिरजादे याची नियूक्ती चीफ ट्रस्टी म्हणून करण्यांत आली व सध्या ते चीफ ट्रस्टी म्हणून कार्यरत आहे.

दर्गाह हजरत दिवानशाहच्या वक्फ मिळकतीवर बेकायदेशीर ताबे होत आहेत दर्गाहच्या दैनंदिन सेवेसाठी चीफट्रस्टी कडून कोणतीही व्यवस्था करण्यांत आलेली नाही. सदरवक्फ संस्था नोंदणीक्त असून ही असद पिरजादे यांनी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ७० अन्वये वार्षीक हिशोब अनेक वर्षापासून सादर केलेले नाही. स्थानिक लोकांच्या तक्रारी वरून वक्फ मंडळाच्या वतीने बेकायदेशीर बांधकाम करणा-या लोकांच्या विरूध्द कायदेशीर कायर्वाही करण्यांत आली आहे. वक्फ मिळकतीच्या संरक्षणासाठी अनेक उपाय करण्यांत आले आहे परंतु चीफ ट्रस्टी या नात्यांनी सय्यद अलीखान पीरजादे यांनी कोणतेही प्रयत्न केले नाही व भिवंडी येथे राहून दर्गाह व त्याची वक्फ मिळकतीचे संरक्षण करण्याऐवजी ते हैद्राबाद येथे राहात आहेत व त्यामुळे दर्गाह दिवानशाह भिवंडीच्या वक्फ मिळकतीचे कधीही भरून न येणारे नूकसान होत आहे. तरी संस्थाचे व्यवस्थापन व संरक्षणासाठी योग्य उपाय करणे आवश्यक आहे तसेच दैनंदिन काम पाहण्यासाठी पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे आहे अशा स्वरुपाचा त्यांनी सविस्तर अबहवाल सादर केलेला आहे.

त्यानूसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगबाद यांनी दिनांक ५.११.२०१८ रोजी आदेश निर्गमित करून दर्गाह हजरत दिवानशाह ट्रस्ट भिवंडी च्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी वक्फ मिळकतीचे संरक्षण करणेसाठी तसेच विविध न्यायालयातील प्रकरणात पाठपूरावा करणेसाठी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५ (सी) नूसार प्राप्त अधिकाराचा वापर करून तात्पूरत्या स्वरूपात प्रशासक म्हणून गूलाम अहमद मोहंमद हनीफ रा. भिवंडी व फिरोज मकसूद अलीखान रा. भिवंडी यांची नियुक्ती केली होती.

सदरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, मरावंम. औरंगाबाद यांच्या आदेशाला गैरअर्जदार खालीद असलम सय्यद यांनी मा.वक्फ न्यायाधिकरणापूढे आव्हान देवून सदर आदेशाला स्थगिती मागितली होती तसेच विश्वास्तांना कलम ७० अन्वये चौकशी शिवाय पदावरून काढून टाकू नये अशी विनंती केली होती.

संपूर्ण सूनावणी झालेनंतर मा. न्यायाधिकरण यांनी त्यात असा आदेश दिला की, मुख्य कार्यकारी अधिकारी, मरावंम, यांनी पारीत केलेले दिनांक ५.११.२०१८ चे आदेश रद्द बातळ करण्यात येत आहे, तसेच महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला निर्देश देण्यांत येते की त्यांनी ब-याच दिवसापासून प्रलंबित असलेली अर्जाची चौकशी त्वरित घ्यावी व त्यात दोन्ही पक्षकारांना एकून त्यांना बाजू मांडण्याची संधी देवून पूढील आदेश पारीत करावा.

मा. न्यायाधिकरणाच्य आदेशावरून या प्रकरणाची सूनावणी ठेवण्यांत आली.

<u>सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -</u>

या कर्यालयाचे पत्र जा.क्र.मरावंम/चौकशी/६३६९/१९ दिनांक ३०/९/२०२१ अन्वये दि. ०७/१०/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली . सूनावणीमध्ये अर्जदार शेख जाहीर मुख्तार करिता ॲड सरफराज अन्सारी हे हजर होते. या प्रकरणात ज्यांनी पहिल्यांदा कलम ६९ अन्वये योजना दाखल केली होती त्या अर्जदाराकरिता ॲड सरफराज अन्सारी हजर होत पहिले हरकतदार व गैरअर्जदार सय्यद असदअली मोहंमद अलीखान पिरजादे जे महाराष्ट्रात राहात नाहीत, ते हैद्राबाद मध्ये राहतात ते गैरहजर होते. हरकतदार/गैरअर्जदार सय्यद मुजीब अहमद महेमुदूज्जमा हे सन २०१४ च्या सुमारास मयत झाले आहेत. अर्जदाराचे वकिल यांनी यूक्तीवाद केला व मंडळाला विनंती केली की अर्जात काही दूरूस्त्या करणे आहे, त्यांची विनंती मान्य करून त्यांना अर्जाच्या स्वरुपात बदल न करता दूरूस्त प्रत दाखल करण्यास सांगण्यांत आले. प्रकरण आदेशाकरिता प्रलंबित ठेवून तसेच पक्षकारांना निर्देश देण्यांत आले की आदेश त्यांना कळविण्यांत येईल.

<u>अर्जदाराचा युक्तीवाद :-</u>

अर्जदाराने असे कथन केले आहे की चीफ ट्रस्टी व रेकॉर्डवर असलेले ट्रस्टी कोणतेही कार्य करीत नाही, तसेच मॅनेजींग ट्रस्टी मोठया देणग्याचे आपसांत संगनमत करून गबन करून ट्रस्टला नूकसान पोहोचवित आहेत. कोणीही ट्रस्टी कायदेशीर कार्यरत नसून फक्त कागदावर कार्यरत आहे. तसेच चेंज रिपोर्ट, स्कीम, व सेक्शन ७० याबाबत निकाल होत नाही तो पर्यंत संस्था आपल्या ताब्यात घेवून त्यावर प्रशासकाची नियूक्ती करावी.

<u>गैरअर्जदार (हरकतदार यांचा युक्तीवाद)</u> -

हरकतदार मोमीन गूलाम मुस्तफा रा. भिवंडी ज्यांना गैरअर्जदार असदअली खान मोहंमद अली पिरजादे यांनी मुतवल्ली म्हणून ठेवलेले आहे यांनी असे कथन केलेले आहे की, शेख जाहीद व इतर ४ लोक बेकायदेशीररित्या लोकांकडून देणग्या गोळा करतात व त्यांना धमकी देतात, तरी त्यांच्या वर गून्हा दाखल करावा तसेच ते बेकायदेशीर कृत्ये करतात या बाबत वक्फ अधिकारी यांच्यकडून अहवाल मागवून कार्यवाही व्हावी.

वरील विवेचनावरून व संचिकेतील कागदपत्रांची तसेच अहवालाची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, सदर वक्फ संस्थेच्या देखभाली मध्ये सध्याच्या व्यवस्थापकीय समितीने अत्यंत बेजबाबदारपणा दाखविलेला आहे. संस्थेची देखभाल करणारी व्यक्ती/समिती कोणत्या पध्दतीने नियुक्त झाली याबाबत खुलासा समितीचे सदस्य करु शकले नाहीत. या संस्थेच्या बाबतीत अनेक वर्षापासुन तक्रारी होत असल्याने वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम २५ (१) (सी) नुसार दिनांक ५.११.२०१८ रोजी प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. त्याविरुध्द श्री.खालीद असलम सय्यद यांनी वक्फ न्यायाधिकरणामध्ये क्रमांक २५/२०१८ अन्वये अर्ज दाखल केला होता त्यावरील दिनांक २/२२/२०१९ रोजी न्यायाधिकरणाने निर्णय देवून दोन्ही पक्षकारांची बाजु एकुण घेवून निर्णय घेण्याबाबत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास आदेश दिले होते.

ठराव क्रमांक ८:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार व गैरअर्जदार तसेच संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर तसेच दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर असे स्पष्ट होते की, सदर प्रकरणी वक्फ अधिनियम १९९५ कलम २५(१)(सी) अंतर्गत सदर संस्थेवर नियंत्रण ठेवणे, देखरेख ठेवणे, याबाबत निर्णय घेण्याच्या अनूषंगाने तसेच वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६४ अन्वये सदर वक्फ संस्थेच्या मुतवल्लीस काढून टाकण्याबाबत, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६५ अन्वये सदर संस्था वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत घेणेबाबत व वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ७० अन्वये सदर संस्थेविरूध्दच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करणेबाबत वक्फ मंडळापूढे झालेल्या सुनावणीत सविस्तरपणे चौकशी करण्यात आली. या चौकशीअंती महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास असे आढळून आले की, या वक्फ संस्थेवर प्रशासक नियूक्त करणे किंवा मुतवल्लीला काढून टाकणे किंवा सदर वक्फ संस्था थेट नियंत्रणाखाली घेणे किंवा सदर वक्फ संस्थेच्या गैरव्यवस्थापनाबाबत वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ७० अन्वये चौकशी करणे या सर्व बाबीपेक्षा वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये या वक्फ संस्थेसाठी नव्याने योजना मंजूर करणे व त्याअनुषंगाने संस्थेचे व्यवस्थापन करणे हे अधिक व्यवहार्य व सुयोग्य ठरेल. या वक्फ संस्थेची शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी फार मोठया प्रमाणावर मालमत्ता असून त्यावर आता पर्यंत अनेक अतिक्रमणे झाली आहे, होत आहे, भविष्यात ही अतिक्रमणे होण्याची मोठया प्रमाणावर शक्यता असल्याने

सदर वक्फ संस्थेचा कार्यभार सर्वसमावेशक स्थानिक व्यक्तींच्या समावेशनाने व्यवस्थानाससाठी योजना तयार करुन त्याद्वारे करणे हे अधिक संयूक्तिक ठरेल.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक ९:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/१८७/२०१९

मजीद खान इस्माईल खान पठाण व इतर,
रा. कर्जत ता. कर्जत जि. अहमदनगर.

----- अर्जदार

विरूध्द

१. शेख जहांगीर इब्राहीम
२. शेख परवेज युसुफ मुजावर
३. शोराब युसुफ शेख
सर्व रा. कर्जत ता. कर्जत जि. अहमदनगर.

----- गैरअर्जदार

प्रकरण - पीर हजरत दावल मलीक कर्जत ता. कर्जत जि. अहमदनगरच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र.. MSBW/ADR/४९८/२०१९

प्रारंभिक -

पीर हजरत दावल मलीक कर्जत ता. कर्जत जि. अहमदनगर ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/ADR/४९८/२०१९ असा आहे. पुर्वी सदर संस्थेची नोंदणी धर्मादाय आयुक्त अहमदनगर मार्फत करण्यात आली होती. त्याचा नोंदणी क्र. PTR No. E-६६ असा होता. सदरील संस्थेच्या मिळकतीची नोंद ग्रामपंचात कार्यालय तसेच ७X१२ उता-याची नोंद तलाठी कार्यलयात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेची मिळकत १०२ एकर २ गुंठे असुन या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता अर्जदार मजीद खान ईस्माइल खान पठाण व इतर रा. कर्जत यानी दिनांक २५/०१/२०१९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे योजना सादर केली आहे.

त्या अनुषंगाने प्रादेशिक वक्फ अधिकारी, नाशिक विभाग नाशिक यांना दिनांक ०७/०१/२०२० रोजी जावक्र क्र.१३१/११९ अन्वये पत्र पाठवुन सविस्तर अहवाल आभिप्रयासह सादर करण्याचे आदेश करण्यात आले होते.

त्या नुसार प्रादेशिक वक्फ अधिकारी, नाशिक विभाग नाशिक, यांनी त्यांचे पत्र जावक .१५५/२१ दि. ०९/०६/२०२१ अन्वये अहवाल सादर केला आहे. त्यांनी त्यांच्या अहवालासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१. संबंधीत लिपीक नाशिक विभाग, नाशिक यांचा दिनांक ३१/०५/२०२१ चा अहवाल.

२. स्थळ पाहणीचा पंचनामा दि. ०६/०८/०२०२०
३. इमरान युसुफ शेख, परवेज युसुफ शेख, शोहराब युसुफ शेख. गैरअर्जदार १ ते ३ यांचा एकत्रित जवाब.
४. प्रादेशिक वक्फ अधिकारी नाशिक यांनी मुख्य विश्वस्त पीर हजरत दावल मलीक कर्जत यांना पाठविलेले पत्र.
५. मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार कर्जत यांच्या पुढील गट नं.७४९, ७५२ व ७५० चे साठेखत व पावत्या.
६. ९ वर्षाकरिता केलेल्या करारनाम्याची झेरॉक्स प्रत (नोटरी कर्जत यांच्या पुढे).
७. ताबा पावती.

प्रादेशिक अधिकारी वक्फ अधिकारी नाशिक यांनी त्यांच्या अहवालात असे नमुद केले आहे की, त्यांनी वक्फ स्थळाची पाहणी केली असता त्या ठिकाणी माजिद खान इस्माईल खान पठाण व इतरांकडे विचारणा केली असता त्यांनी असा जवाब नोंदविला की सदरील वक्फ संस्थेचे १. शेख युसुफ इब्राहीम २. शेख जहागीर इब्राहीम या दोन व्यक्ती वशंपरंपरागत विश्वस्त आहेत. सदरील वक्फ संस्थेच्या जुन्या विश्वस्तांनी बहुतांशी वक्फ जमीन ही काही शैक्षणिक संस्था व व्यक्तींना नोटरीव्दारे दिल्या असल्याने वक्फचे कायमस्वरूपी नुकसान झालेले आहे. त्याकरिता गांवक-यांनी दिनांक. २६/१२/२०१८ रोजी दर्गाच्या ठिकाणी संपुर्ण गांवाची विश्वस्त व्यवस्थापकीय समिती गठित करण्यात यावी, या करिता सभा घेतली त्या मध्ये वरील अर्जदार क्र १ ते ११ च्या व्यक्तींची विश्वस्त म्हणुन निवड करण्यात आलेली आहे. जुन्या विश्वस्तापैकी १.युसुफ इब्राहीम शेख हे सन २००४ मध्ये २. जहागीर इब्राहिम शेख यांचे दि. २६/०६/२०२० निधन झाले आहे. सदरील दोंन्ही विश्वस्तांच्या मुत्यु नंतर वक्फ मंडळात त्यांनी कोणताही फेराफार दाखल केलेला नाही. त्यानंतर दर्गाचे जुने विश्वसत शेख युसुफ इब्राहिम यांचे वंशज यांची भेट घेऊन त्यांचा जवाब घेतला असता त्यांनी सांगीतले की वक्फ मंडळाकडुन मागीतलेली सर्व माहिती १५ दिवसात देऊ परंतु त्यानी त्यानंतर कोणतेही कागदपत्र सादर केले नाही.

दर्गाचे जुने विश्वस्त शेख जहांगीर यांनी श्री. जयसिंगराव फाळके व इतर यांना गट क्र.७४९ क्षेत्र १ हे २० आर गट क्र.७५२ क्षेत्र ० हे ४८ आर गट क्र ७५० क्षेत्र ० हे १४ आर असे एकुण क्षेत्र १ हे ८२ आर म्हणजेच ४ एकर २२ गुंठे जमिन संबंधीताला रु ९१,००,०००/- घेवून साठे खत केले आहे. त्याची प्रत त्यांनी सोबत जोडलेली आहे तसेच बळीराम मारूती व इतर यांना गट क्र. ७५७/१ चे क्षेत्र १०.८८ हे. आर पैकी ०.१२ आर हे प्रति गुंठा १,५०,०००/- प्रमाणे ९ वर्षा करिता जागेचा करारनामा लिहून दिलेला आहे. त्याची ही प्रत त्यांनी सोबत जोडलेली आहे. त्याच प्रमाणे युसुफ इब्राहिम व शेख जहागीर इब्राहिम यांनी श्री. जहीर शरीफ खान पठाण यांना गट क्र. ७५७ चे एकुण क्षेत्र १४.८८ हे आर पैकी, एक हेक्टर जमीन कायमस्वरूपी खरेदी खत म्हणुन लिहून दिलेली आहे त्याची ही प्रत सोबत जोडलेली आहे.

सदर योजनेच्या अर्जाविरूध्द गैरअर्जदार १ श्री. शेख जहागीर इब्राहीम रा. कर्जत यांनी दि.१८/०७/२०१९ रोजी आक्षेप नोंदवुन तसा आक्षपे अर्ज सादर केला असुन त्यात त्यांनी नमुद केले आहे, की सदर संस्थेचे ते वंशपंरपराने वहिवाटदार असुन ते सदर संस्थेचे मुतवल्ली आहेत. तसेच अर्जदाराचा दैनंदिन व्यवस्थापनासाठी सादर केलेला योजना अर्ज नामजुंर करावा.

गैरअर्जदार क्र.२ श्री. शेख परवेज युसुफ रा. कर्जत यांनी दि. ०२/११/२०२० रोजी आक्षेप नोंदवुन तसा आक्षेप अर्ज सादर केला असुन त्यात त्यांनी नमुद केले आहे. की पुर्वीचे कामरान युसुफ शेख रा. कर्जत हे मयत असुन ते त्यांचे वारस आहे. सदर संस्थेचे ते वंशपंरपराने वहिवाटदार आहे.

सदर संस्था पीर हजरत दावल मलिक कर्जतच्या, व्यवस्थापनासाठी व योग्य प्रशानासाठी अर्जदार श्री. मजीद खान इस्माईल खान पठान व इतर यांनी योजना दाखल केली आहे.

प्रकरणात गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी योजना मान्यतेस अक्षेप नोंदवल्याने अर्जदार व गैरअर्जदार क्र १ ते ३ यांना सुनावणी करिता दि.१८/०८/२०२१ रोजी नोटीसा काढुन दि. ०२/०९/२०२१ रोजी सुनावणी करिता कागदपत्रासह पाचारण करण्यात आले तसेच त्यांना लेखी म्हणणे सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -

दि. ०२/०९/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली त्यावेळेस अर्जदार मजिद खान इस्माईल खान पठाण हे हजर होते गैरअर्जदार क्र १ हे मयत असल्याने त्यांच्या वारसाचा अर्ज रेकॉडला ठेवण्यात आलेला आहे. तो पुराव्याचा भाग आहे. गैरअर्जदार क्र २ शेख परवेज युसुफ मुजावर हे हजर होते. तसेच गैरअर्जदार क्र ३ चे वकील एम.बी. खान हे हजर होते.

अर्जदाराचा युक्तीवाद -

अर्जदारांनी त्याच्या अर्जात व युक्तीवादात असे नमुद केले आहे की ते सध्या वरील वक्फ संस्थेची देखभाल करतात. धर्मादाय आयुक्त अहमदनगरच्या रेकॉर्डला सर्व मुतवल्लीची सुची - १ मध्ये नोंद आहे तसेच त्यांनी सदर संस्थेच्या तदर्थ (Adhoc) समितीच्या मंजुरीसाठी अर्ज दिलेला आहे त्यांनी सादर केलेल्या व्यवस्थापनासाठीच्या योजनेस मान्यता दयावी असे त्यांनी नमुद केले आहे.

गैरअर्जदार क्र १ चा युक्तीवाद

गैरअर्जदार क्र-१ यांनी असे नमुद केले आहे की ते वंशपंरपरागत संस्थेचे मुतवल्ली असुन त्यांनी अर्जदारच्या अर्जाला सक्तरितीने अक्षेप घेतलेला आहे. अर्जदार नं १ ते ११ यांना योजना दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही तसेच त्यांचा योजना दाखल करण्याचा हेतु उचित स्वरूपाचा नसुन त्यांना संस्थेच्या प्रशासनाच्या कामकाजात ढवळाढवळ करण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यांनी महत्त्वाच्या बाबी वक्फ मंडळापासुन लपविल्यामुळे त्यांचा योजनेचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे.

अर्जदारांने संस्थेच्या मिळकतीवर अतिक्रमण होत असल्यासाचा गाजावाजा गावात केला आहे त्या मागील त्यांचा उद्देश मिळकत हडप करण्याचा आहे तसेच काही अर्जदार यांनी तैसीफ शेख नावाच्या इसमास त्यांचे नातेवाईकांना कब्रस्तानमध्ये दफन न करता वक्फ संस्थेच्या मिळकतीमध्ये दफन करण्यास सांगितले व त्यानुसार त्यांचे थडगे तेथे उभारण्याचा प्रयत्न केला परंतु गैरअर्जदार क्र.१ यांनी न्यायायलयाकडून सदरी कृत्यास मनाई हूकुम घेऊन संस्थेचे मिळकत वाचविण्याचा प्रयत्न केला.

धर्मादाय आयुक्त यांच्या सुची १ मध्ये असे नमुद केले आहे की गैरअर्जदार क्र.१ च्या परिवाराला दर्गा पीर दावल शाहाचा कारभार चालविण्याचा हक्क आहे. मुतवल्ली व व्यवस्थापन हे सुरूवातीपासुन म्हणजे दि. १९/१२/१८५३ पासुन वंशंपरपंरेने मुतवल्ली यांना वारसाने मिळालेले आहे त्यामुळे अर्जदार योजने द्वारे वारस हक्क बदलु शकत नाही.

गैरअर्जदार १ हे दोन ट्रस्टी (मुतवल्ली) पैकी दि. ०५/०७/१९५६ पासून व नंतर दि.०२/०७/२००९ पासून इतर मुतवल्लीच्या मूत्युमुळे मुख्य ट्रस्टी होते म्हणुन जर मुतवल्ली हयात असेल तर इतर लोकांना योजनेसाठी अर्ज दाखल करण्याचा अधिकार रहात नाही. तसेच मुतवल्लीच्या सल्ला मसलती शिवाय योजना दाखल करू शकत नाही.

संस्थेच्या कर्जतमध्ये ब-याच ठिकाणी मिळकती आहेत. संस्थेचे एकुण १०२ एकर २ गुंठे जागा आहे. त्या पैकी २५ एकर ३५ गुंठे वरिष्ठांची परवानगी घेऊन १९९५ साली विकण्यात आलेली आहे सदरची मिळकत रस्ता रुंदीकरण पोलीस फायरिग रेंज, सदनिका करिता सरकाने ताब्यात घेतली परंतू अर्जदाराने सदरील जागेचे सरकारी अतिक्रमण काढण्याकरिता कोणतेही प्रयत्न केले नाही कारण की त्याचा हेतू बरोबर नव्हता या उलट गैरअर्जदार १ याने सरकारी अतिक्रमणे काढण्याकरिता कित्येक दावे/केसेस, फिर्यादी वेगवेगळया संस्थाकडे केल्या आहे वरील सर्व बाबी विचारात घेता अर्जदाराचा हेतू संस्थेची मिळकत हडप करण्याचा आहे सबब अर्जदाराचा योजनेचा अर्ज नामजुंर करावा.

गैरअर्जदार क्र २ चा यूक्तीवाद:

गैरअर्जदार क्रमांक २ यांचे असे म्हणणे आहे की ते वंशपरंपरेने सदर संस्थेचे पूजारी (मुजावर) आहे. सदरची मिळकत ही निजामशाहीने देवस्थानाला इनाम दिलेली आहे. हे इनाम मुजावरांच्या उपजिविकेसाठी कायमस्वरूपी दिले आहे तसेच त्यांनी कथन केले आहे की अर्जदारांचा संस्थेची जमीन बळकावण्यासाठी ट्रस्ट बनविण्याचा प्रस्ताव व प्रयत्न असल्यामुळे त्यांनी खोटी योजना दाखल केली आहे. तसेच त्यांनी मिळकतीचे खातेदार संबंधी वंशावळ दाखल केली आहे.

गैरअर्जदार क्र ३चा यूक्तीवाद:

गैरअर्जदार क्र. ३ यांनी असे नमुद केले आहे की, सदर संस्थेचे मुतवल्ली हे वंश परंपरेने होत असतात. शेख युसुफ इब्राहीम व शेख जहांगीर इब्राहीम हे दोन्ही ट्रस्टी मयत झाले नंतर अहमदनगरच्या धर्मादाय आयूक्त पुढे चेंज रिपोर्ट दाखल करण्यात आला नाही. त्यानंतर माहिती मिळाल्यानंतर गैरअर्जदार हे धर्मादाय आयुक्त अहमदनगर यांचे कडे चेंज रिपोर्ट दाखल करण्यासाठी गेले परंतु चेंज रिपोर्ट दाखल करण्यासाठी उशिर झाल्यामुळे त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात आला. त्यानंतर सदरच्या आदेशाविरुध्द पुणे येथे धर्मादाय आयुक्त यांच्या पुढे प्रकरण आज पर्यंत प्रलंबित आहे. याचा आधार घेऊन अर्जदार यांने न्यायालय व वक्फ संस्थे मध्ये गैरअर्जदार यांना माहिती तसेच नोटीस न देता वक्फ संस्थेकडुन नोंदणी करुन घेतली व नोंदणी झाले नंतर योजना दाखल केली असे नमुद केले आहे. तसेच संस्थेची शेती मिळकत त्यांच्या ताब्यात आहे व ते मिळकतीची देखभाल करतात. त्यांनी असा आक्षेप घेतला आहे की अर्जदाराचा या संस्थेशी कुठलाही संबंध नाही तसेच मिळकतीशी देखील काही संबंध नाही. अर्जदार कधीही संस्थेमध्ये येत नाही तसेच दर्गाहमध्ये दर्शनाकरीता येत नाहीत. गैरअर्जदार क्र. ३ स्वत:रोजच्या रोज दर्गाहची देखभाल करतात तसेच प्रत्येक वर्षी ते स्वत: दर्गाहला पांढरा रंग देतात. अर्जदार यांने चूकीचे प्रतिज्ञापत्र दाखल करुन योजना दाखल करण्याच्या प्रयत्न केलेला आहे. ते नियमाला धरुन नाही. तसेच गैरअर्जदार क्र. ३ म्हणजेच शेवटचे मुतवल्लीचे वारस हे स्वत: विदयुत बिल व पाणीपट्टी बिल वगैरे सरकारी नियमाप्रमाणे भरतात. वरील सर्व कारणास्तव अर्जदाराचा योजनेचा अर्ज नमंजूर करण्यात यावा.

ठराव क्रमांक ९:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार व गैरअर्जदार तसेच संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर तसेच दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर असे स्पष्ट होते की, पीर हजरत दावल मलीक, कर्जत, ता.कर्जत जि. अहमदनगर या संस्थेच्या पुर्वीच्या विश्वस्तांकडून संस्थेच्या मालमत्तेचे संरक्षण व संवर्धन योग्यरित्या होत नाही. वक्फ संस्थेची जमीन विकण्यात आलेली आहे व ते विश्वस्तांनी त्यांच्या म्हणण्यांमध्ये नाकारलेले नाही. वक्फ संस्थेचे विश्वस्त वंशपरंपरागत असल्याचा दावा करतात व धर्मदाय आयुक्तांच्या शेडयुल-१ मध्ये विश्वस्त वंशपरंपरागत असतील अशा स्वरूपाची नोंद आढळुन येते. तथापि सदर वक्फ संस्थेच्या देखभालीकडे, वक्फ मिळकतीच्या संरक्षणाकडे विश्वस्तांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. सदर वक्फ संस्थेकडे सुमारे १०२ एकर २ गुंठे इतकी जमीन आहे. वक्फ मालमत्तेचे संरक्षण व संवर्धन करण्यात विश्वस्त अपयशी ठरल्याने तसेच वक्फ जमीन विकण्याचे गैरकृत्य त्यांच्याकडून झाले असल्याने सध्याच्या वकफ संस्थेच्य दस्तऐवजावरील नोंदीनुसार असलेल्या या विश्वस्तांना दुर करणे क्रमप्राप्त आहे. अशा प्रकारची कार्यवाही करण्यास वक्फ मंडळ, वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ६९ (१) व (२) नुसार सक्षम आहे.

अर्जदार श्री. मजीद खान इस्माईल खान पठाण व इतर यांनी सादर केलेली व्यवस्थापन योजना योग्य व पारदर्शी व सर्वसमावेशक असुन याद्वारे सदर वक्फ संस्थेचा कारभार पारदर्शीपणे करता येवु शकेल. सदर व्यवस्थापन योजनेत आवश्यक किरकोळ, तांत्रिक स्वरूपाचे फेरबदल करून योजना मंजुर करण्यात यावी.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक १०:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्रमांक. ६९/१८९/२०१९

मोहम्मद अशफाक मोहम्मद जुसैफ व इतर ११,
वय- ५८, रा. इकबाल चौक, जि. बुलढाणा.

.....अर्जदार

विरुध्द

प्रणय देवी दत्ता शुकला व इतर २,
रा. सुदामानगर इन्दौर, (मध्येप्रदेश)

.....गैरअर्जदार

शब्बीर हुसेन मोहम्मद हूसेन ..... हरकतदार

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ मधील तरतुदीनुसार अर्ज

प्रकरण- हजरत मोहम्मद हनीफ मस्तान रहेमान सैलानी, अनसिंग ता. वाशिम, जि.वाशिम.
नोंदणी क्र. MSBW/WSM/१०८/२०१७

प्रस्तावना :-

श्री . मोहम्मद अशफाक मोहम्मद जुसैफ व इतर ११, वय- ५८, रा. इकबाल चौक, जि. बुलढाणा. यांनी दि. २९.०४.२०१९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ मधील तरतुदीनूसार अर्ज दाखल करून त्यांत त्यात पुढील प्रमाणे मुद्दे मांडले होते -

(१) हजरत मोहम्मद हनीफ मसतान रहेमान सैलानी अनसिंग ता. वाशिम, जि.वाशिम. ही संस्था महाराष्ट्र सार्वजानिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतूदीनुसार नोंदणीकृत संस्था आहे.

वक्फ अधिनियम, १९९५ हा केंद्रिय कायदा दि.०१.०१.२०१६ पासून संपूर्ण देशात लागू करण्यांत आलेला असून सदर कायद्यातील कलम ४३ मधील तरतुदींनुसार उपरोक्त संस्था ही मानीव नोंदणीकृत वक्फ संस्था असून कालांतराने नोंदणी क्र. MSBW/WSM/१०८/२०१७ असा आहे.

(२) दि. २३/०८/२०१७ अन्वये सदर संस्थेची महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ अंतर्गत रितसर नोंदणी करण्यांत आलेली आहे.

(३) हजरत मोहम्मद हनीफ मस्तान रहेमान सैलानी अनसिंग ता. वाशिम, जि.वाशिम मध्ये उल्लेखित सदर संस्थेच्या मालकीच्या वक्फ मिळकतीची वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ३७ मधील तरतुदींनुसार वक्फ मंडळाच्या अभिलेखात नोंद घेण्यांत आलेली आहे.

तसेच वक्फ संस्थेच्या दुस-या प्रस्तावीत योजनेचा अर्ज श्री. प्रणय देवी देत्त शुक्ला रा. अनसिंग ता. वाशिम, जि. वाशिम दि. १९/११/२०१९ रोजी वक्फ कार्यालयात मजुरीसाठी दाखल केला आहे.

सदर शुक्ला यांचे अर्जावर शबीर हुसैन मोहम्मद हुसैन रा. अनसिंग यांनी दि. ०८/०१/२०२० रोजी अक्षेप अर्ज दाखल केलेला आहे.

सदरचे प्रकरण वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ अन्वये असल्याने यामध्ये संबंधीत वक्फ अधिकारी वाशिम यांना पत्र क्र. म.रा.व.मं./चौकशी/४८०/२०२० दि. २४/०१/२०२० रोजी पाठवुन सविस्तर अहवाल मागविण्यात आला.

जाहीर प्रगटन

महाराष्ट्र राज्य वक्फ मडंळ औरंगाबाद यांच्या वतीने दि. १६/१२/२०२० रोजी जाहीर प्रगटन प्रसिध्द करून दाखल केलेल्या योजनेबद्दल हरकती मागविण्यात आल्या.

श्री. अमीनउज्जमा खलीखूउज्जमा प्रादेशिक वक्फ अधिकारी अमरावती विभाग अमरावती यांनी त्यांचे पत्र जा.क्र. प्र.व.अका/अतियाद-२०/२०४/२० दि. ०५/०३/२०२० अन्वये अहवाल सादर करुन असे नमुद केले आहे की, दि. २७/०२/२०२० रोजी घटनास्थळी जाऊन तेथील पहाणी केली तसेच घटने ठिकाणचा पंचनामा केला.

सदर योजनेच्या अर्जाविरूध्द श्री. शबीर हुसैन मोहम्मद हुसैन यांनी दि. ०६/०१/२०२० रोजी आक्षेप सादर केला आहे.

प्रकरणात गैरअर्जदार यांनी योजना मान्यतेस नोंदवल्याने अर्जदार व गैरअर्जदार यांना सुनावणी करीता दि. २३/०९/२०२१ रोजी पत्र क्र.म.रा.व.मं./चौकशी/६२६३/२०२१ पाठवुन दि. ०८/१०/२०२१ रोजी सुनावणी करीता कागदपत्रासह पाचारण करण्यात आले तसेच त्यांना लेखी म्हणणे सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

सूनावणी व संबंधीचातां यूक्तीवाद

दि. ०८/१०/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली त्यावेळेस शब्बीर हुसैन हे हजर होते. श्री. शुक्ला ज्यांनी योजना दाखल केली ते गैरहजर होते. तसेच एस.डी. रोठे वकील हे शबीर हुसैन करिता हजर होते. त्यानी म्हणणे दाखल केले सर्व पक्षकाराना दि. २१/१०/२०२१ पुर्वी लेखी युक्तीवाद दाखल करण्यास सांगण्यात आले.

अर्जदार मोहम्मद अशफाक जुसैफ यांचा जवाब -

त्यांनी अर्जात असे नमुद केले आहे की वक्फ संस्थेच्या उत्तम व्यवस्थापनासाठी त्यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. सर्व अर्जदारांची दर्गा हजरत मोहम्मद हनिफ मस्तान या संस्थेवर श्रध्दा असुन ते ब-याच कालावधी पासुन संस्थेशी जवळीक साधुन आहे. अर्जदार त्यांचे भक्त आहे. मसतान रहेमान मयत झाल्यापासुन दर्गाची देखभालसाठी कमेटी स्थापन करण्यात आली परंतु त्या कमेटीने कोणतेही भरीव काम केले नाही त्यामुळे दर्गाचे मोठे नुकसान झाले आहे. आज पावेतो दर्गाची कोणत्याही प्रकारची प्रगती झाली नाही. सर्व अर्जदार समाजसेवक असुन ते दर्गासाठी सामाजिक कार्य करू इच्छीतात. सर्व अर्जदार त्यांच्या जिल्हयात सामाजिक, शैक्षणिक काम करण्यास सक्षम आहे. तसेच ते दर्गाची प्रगती करु इच्छितात. व्यवस्थापकीय मंडळ स्थापन झाले नंतर २०१६ मध्ये मंडळाने दर्गाचे बांधकाम, भक्तांना राहण्याची सोय, गरीबांना आर्थिक मदत तसेच लंगर चालु केले. अर्जदाराचा अता हॉस्पिटल बांधण्याचा तसेच सर्व विदयाथ्यांना शाळा कॉलेजची सोय उपलब्ध करुन देण्याचा तसेच पाण्याची टाकी, दर्गाला संरक्षणभिंत तसेच कमी पैसात अन्न पुरविणे, महिला व पुरुष यांना वेगवेगळे मोफत संडास, बाथरूम बांधणे तसेच अर्जदार हे दर्गा हजरत मोहम्मद हनिफला शेगावचे गजान्नमहाराज व शिर्डीचे साई बाब यांच्या धरतीवरच बनविण्याचा प्रयत्न करणार आहे.

वरील सर्व कारणास्तव अर्जदाराचा योजना मान्यतेचा अर्ज मंजुर करावा.

अर्जदार मोहम्मद अशफाक मोहम्मद जुसैफ यांचे अर्जावर प्रनय दत्त शुकला व अरशद कलीम सिदिकी यांचा अक्षेप अर्ज

त्यांनी असे नमुद केले आहे की वक्फ कार्यालयमध्ये बनावट कागदपत्राच्या आधारे हजरत मोहम्मद हनिफ मस्तान सैलानी या संस्थेची नोंदणी करण्यात आली आहे. वक्फ जमीन ही अरशद सिदीकी व श्री. प्रणय दत्त शुकला यांच्या मालकीची आहे. अर्जदार क्रं.२ मोसीन खान अजीज खान रा. अनसिंग यांच्या वर अनेक गुन्हे दाखल आहे. त्याने गावात भितीचे वातावरण निर्माण केले आहे. त्यामुळे कलम ६९ (१) नुसार कुठल्याही व्यक्तीची या कलमाखाली किंवा ॲडव्हाक कमिटी म्हणुन नियुक्त करू नये.

अर्जदार मोहम्मद अशफाक मोहम्मद जुसैफ यांचे अर्जावर शबीर हुसैन मोहम्मद हुसैन यांचा लेखी तक्रार अर्ज :-

दि.२४/०९/२०२० रोजी शबीर हुसैन यांनी अर्ज देऊन असे कथन केले आहे की ते व इतर लोक मिळुन दर्गा हजरत मोहम्मद हनिफ मस्तान सैलानी यांचे पुर्वी पासुन दैनंदिन व्यवस्थापन करीत आहेत. तसेंच अशफाक मोहम्मद जुसैफ यांनी दि. ०७/०६/२०१६ रोजी कलम ३६ अन्वये अर्ज देऊन असे कथन केले आहे की त्यांनी दिलेल्या अर्जातील कमेटी शिवाय कोणतीही कमेटी अस्तित्वात नाही. श्री. अशफाक यांचे वरील म्हणणे खोटे असुन सदर संस्थेचे व्यवस्थापना तेच करित असतात अशफाक यानी ही माहिती लपवुन दिशाभुल केली आहे तसेच दि.१६/०४/२०१८ च्या प्रादेशिक वक्फ अधिकारी अमरावती यांचा स्थळ पाहणीचा व चौकशी अहवालाचे अवलोकन केल्यास ते त्यांचे सहकारी दर्गाचे व्यवस्थापन करित आहे हे दिसुन येते त्यामुळे अशफाक यांनी खोटी माहिती वक्फ मंडळाला दिलेली आहे.

प्रणय दत्त शुकला यांचा कलम ६९ (१) प्रमाणे योजना प्रस्ताव

त्यांनी प्रस्ताव अर्जात असे नमुद केले आहे की हजरत मोहम्मद हनिफ सैलानी ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार नोंदणीकृत संस्था आहे त्याप्रमाणे त्यांची वक्फ संस्थेची नविन योजना कलम ६९ (१) प्रमाणे मंजुर करण्यात यावे.

प्रणय देवीदास दत्त यांच्या योजनेला शब्बीर हुसैन यांचे आक्षेप -

हजरत मोहम्मद हनिफ हे धार्मीक बुजूर्ग होते व शब्बीर हुसैन हे त्यांचे खिदमतगार होते व त्यांच्या सहवासात मागील २० वर्षापासुन होते. सदर बुजूर्ग यांनी स्वत: हरकतदार यांना मिळकतीवर घेऊन गेले होते व त्यांची नियोजीत समाधिची जागा दाखवली होती. हरकतदार यांनी बाबाच्या इच्छेनुसार गट नं ३६३ मध्ये दफन विधि केले तसेच हरकतदार हे संस्थाचे व्यवस्थापन तसेच संदल ऊरूस दैनंदिन धार्मीक काम करत आहे. गट नं. ३६३ ही मिळकत चंदा करून व बाबाने स्वत:ची रक्कम टाकुन विकत घेतलेली आहे. आज देखील मजार व बारगाह अस्थित्वात आहे व हरकतदार व्यवस्थापना, देखरेख व धार्मीक विधि करीत आहे. अर्जदार हे फक्त सिलसिलेचे लोक असुन त्यांचा व्यवस्थापनामध्ये त्यांचा कोणताही हक्क संबंध नाही तसेच त्यांनी कधीही समाधीची व्यवस्था व व्यवस्थापना केलेली नाही व त्यांचा त्यामध्ये सहभाग ही नाही. अर्जदार यांची योजना व त्यामधील व्यवस्थापना समिती बनावटी आहे ते अनसिंग गावाचे नाही त्यामुळे ते तेथे कधीही आलेले नाही वरील सर्व कारणास्तव अर्जदाराचा योजना अर्ज नामंजुर करण्यात यावा.

ठराव क्रमांक १०:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार, गैरअर्जदार तसेच हरकतदार यांनी दाखल केलेले सर्व लेखी युक्तीवाद तसेच तोंडी युक्तीवाद आणि वक्फ मंडळापुढे सादर करण्यांत आलेल्या २ व्यवस्थापन योजनांची पडताळणी केली असता श्री. मोहम्मद अशफाक मोहम्मद जुसैफ यांनी दाखल केलेली योजना ही अधिक परिपुर्ण व पारदर्शी असल्याचे आढळून आले आहे त्यामध्ये खुली निवडणुक घेवून सदस्यांची नियुक्ती करण्याची पध्दत विहित केलेली आहे. या मुळे सदर वक्फचे व्यवस्थापन सुयोग्यरित्या होवू शकेल. प्रत्येक ५ वर्षानंतर निवडणुकीने सदस्य नियूक्ती होईल व त्यापुढे पारदर्शकपणे वक्फ संस्थेचा कारभार चालेल. प्रणयदेवी शूक्ला हे महाराष्ट्राबाहेरील रहिवाशी आहेत. प्रणय देवी शुक्ला व इतरांनी दिलेल्या व्यवस्थापन योजने मध्ये उपरोक्त प्रमाणे पारदर्शकता नसल्याने त्यांच्या ऐवजी श्री. मोहंम्मद अशफाक मोहम्मद जुसैफ यांनी सादर केलेली योजना स्विकारार्ह आहे. हरकतदार शब्बीर हुसेन मोहम्मद हुसेन यांनी दाखल केलेल्या हरकतीमध्ये अनसिंगच्या बाहेरील लोकांनी योजना दाखल केलेली असल्याने मुख्यत: हरकत घेतली आहे. ते स्वत:दर्गाची देखभाल करतात असे त्यांच्या निवेदनावरुन दिसून येते. तथापि, त्यांनी स्वत: कोणतीही योजना दाखल केलेली नाही, असे असल्याने त्यांचा हरकतीचा मुद्दा निकाली निघतो.

श्री. मोहम्मद अशफाक मोहम्मद जुसैफ यांनी दाखल केलेली योजना दुरुस्तीसह मान्य करण्यात येत आहे.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक ११:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/१९३/२०२०

खान अफजल खान एकबाल व इतर ७,
रा. नई बसती जुना बाजार औरंगाबाद.

----- अर्जदार

विरूध्द

१. मोहम्मद उमर बाहदर खान व इतर
रा. जुना बाजार औरंगाबाद.
२. खुर्रम अहमद गुलाम गौस खान

----- गैरअर्जदार

विरुध्द

इसहाक फारुक सिद्दिकी -----हरकदार

प्रकरण :- मस्जिद एकखाना कबरसह, जुना बाजार औरंगाबादच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र.. MSBW/ABD/२२२/२०११

प्रारंभिक (विवेचन) -

मस्जिद एकखाना कबरसह, जुना बाजार औरंगाबाद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/ABD/२२२/२०११ असा आहे. ही संस्था महाराष्ट्र शासन राजपत्रात अनुक्रमांक. २३२ पार्ट अ दि. ०३/०५/१९७३ अन्वये औरंगाबादमध्ये नोंद आहे.

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता अर्जदार खान अफजल खान एकबाल व इतर ७, रा. नई बसती जुना बाजार औरंगाबाद. यानी दिनांक २७/१०/२०२० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे योजना सादर केली आहे.

तसेच याच प्रकरणात श्री. मोहम्मद उमर बहादर खान व इतर रा. औरंगाबाद यांनी दि.०२/११/२०२० रोजी दुसरी योजना सादर केला आहे.

मस्जिद एकखाना कबरसह, जुना बाजार औरंगाबादच्या अनूक्रमणिक १८ वर असून दिनांक ३ मे १९७३ मध्ये आहे. ही संस्था व संस्थेशी निगडीत मालमत्ता जंगम व स्थावर मालमत्ता प्लॉट घर, दुकान, ही संस्था लाउडस्पिकर व इतर याचा स्वतंत्र तक्ता अर्जदार यांनी योजनेच्या कागदपत्रात दाखल केली आहे मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ अन्वये वक्फ नोंद पुस्तक अनुसुची १ मध्ये घेण्यात आली आहे.

सदर प्रकरणात या कार्यालयाचे पत्र क्र. म.रा.व.मं./चौकशी/योजना/४६०३/२०२० दि.१५/१२/२०२० अन्वये जाहीर प्रगटन निर्गमीत करून आक्षेप/तक्रार/हरकत मागविण्यात आले होते. याच प्रकरणात अर्जदार अफजल खान इकबाल खान व इतर यांनी दि. ०९/०८/२०२१ योजना मंजुर होई प्रयत तदर्थ समिती ची नियुक्ती वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(५) अन्वये करावी असे अर्ज दाखल केला होता.

जाहिर प्रगटनाच्या आधारे जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांनी जावक्र क्र.जिवअ/चौकशी/विभाग-१२/१८४/२१ दि. २८/०१/२०२१ अन्वये अहवाल सादर केलेला आहे की त्यांनी सदरची नोटीस वक्फ संस्था मस्जिद एकखाना यांच्या नोटीस बोर्डावर डकविली आहे. सदर मस्जिदच्या व्यवस्थापनाबाबत यापुर्वी शेख नवाब शेख अमीन विरूध्द मोहम्मद उमर खान (फाईल क्र. ७१९४) मध्ये वाद होऊन सुनावणी झाली दि. ०२/०५/२०१२ रोजी निकाल झाला की रितसर निवडणुक प्रकीया पुर्ण करून अहवाल सादर करावा. परंतु कमेटीची नियुक्ती कलम १८ अन्वये नाकारत कलम ६९ अन्वये योजना मंजुर करण्याचे कार्य सुरू झाले त्यामुळे सदर वक्फ संस्थेच्या समिती मंजुरीसाठी निवडणुक झाली नाही. सदर वक्फ अधिकारी पाहणी केली संस्थेची एकुण नऊ दुकाने आहे. त्यांनी नऊ दुकानाचा अहवाल सादर केला आहे. वरील नऊ दुकाने सोडुन इतर सर्व भाडेकरी यांच्याकडुन कमेटीचे अध्यक्ष उमर खान बाहादुर खान हे भाडे वसुल करतात व त्यामधुन ईमाम, बांगी याचा हदिया, विदयूत बिल, पाणीपटी इत्यादी. दैनंदिन कार्य त्यांच्या तर्फे होत आहे असे स्थांनीक लोकांनी चौकशीच्या वेळी सांगितले आहे. आता कलम ६९ अन्वये सदर संस्थास दोन गटाने योजना दाखल केलेली आहे व एकमेकांनी त्यास आक्षेप घेतलेला आहे.

प्रकरणात श्री. मोहम्मद उमर बहादुर खान व इतर रा. औरंगाबाद यांनी दि. ०२/११/२०२० रोजी योजनेसाठी दुसरा अर्ज दिल्यावर खान अफजल व इतर रा. औरंगाबाद यांनी दि. ११/०५/२०२१ रोजी आक्षेप अर्ज दाखल केलेला आहे. तसेच श्री. इसाक फारूक सिदीकी रा. औरंगाबाद दि. २१/०५/२०२१ रोजी आक्षेप अर्ज दाखल केलेला आहे.

सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -

दि. ०२/०९/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली त्यावेळेस अर्जदार खान अफजल खान एकबाल व इतर ७,रा. नई बसती जुना बाजार औरंगाबाद. हे हजर होते तसेच त्यांचे वकील आता

मुस्तफा हजर होऊन वकील पत्र दाखल केले तसेच श्री मोहम्मद उमर बाहदर खान रा. जुना बाजार औरंगाबाद. गैरअर्जदार हे हजर होते तसेच एम.जेड.ए. खान यांनी खान अफजलच्या वतीने वकील पत्र दाखल केले दोन्ही पक्षकारांना असे आदेशीत करण्यात आले की त्यांनी त्यांची लेखी म्हणणे दि.२१/१०/२०२१ पुर्वी सादर करावे.

अर्जदार खान अफजल खान एकबाल यांचा युक्तीवाद -

अर्जदारांनी त्याच्या अर्जात व युक्तीवादात असे नमुद केले आहे की ते व इतर सर्व अर्जदार मस्जिद एकखाना कब्रसह औरंगाबाद या वक्फ संस्थेची देखभाल करतात तसेच योजना मंजुर होई पावेतो तात्पुरत्या समितीची नियुक्ती करण्यात यावी व त्यांचा योजनेचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती केली आहे.

अर्जदाराच्या अर्जावर हरकतदार श्री मोहम्मद उमर खान यांचा आक्षेप

आक्षेप कर्ता अर्जदार मोहम्मद उमर खान यांनी दि. २८/०१/२०२१ रोजी आक्षेप अर्ज सादर करून असे नमुद केले आहे की ते व त्यांची सहकारी हे वरील वक्फ संस्थेच्या रोजच्या रोज देखभाल व इतर कार्य करीत आहे तसेच श्री. अफजल अहमद व इतर हे तरुण मंडळी काही कारणासाठी वक्फ संस्थेत ढवळाढवळ करीत आहे. तसेच त्यांनी आक्षेप दिल्यानंतर देखील वृत्तपत्रात जाहिर प्रगटन दिल्याबद्दल नाराजी दर्शवली आहे तसेच ठरावीक वृत्तपत्रात जाहिर प्रगटन दिल्याबद्दल त्यांनी नमुद केले की त्यामुळे सर्वांना आक्षेप नोदविण्यात येणार नाही तसेच उर्दू पेपरमध्ये जाहीरप्रगटन न देता मराठी वृत्तापत्रात दिलेले आहे. तसेच श्री. खान इकबाल यांचे कृत्य पहाता ते वक्फ संस्था मस्जिद एकखानाची सर्व व्यवस्था कश्याही पध्दतीने का असे ना दंडेलशाहीने आपल्या हाती घेवु इच्छितात.

सबब श्री. खान अफजल यांचा योजनेचा अर्ज रद्द करण्यात यावा

मोहम्मद उमर बाहादुर खान यांचा योजना अर्ज

मोहम्मद उमर बाहादुर खान यांनी दि. २८/१०/२०२० रोजी योजनेचा अर्ज सादर करून असे कथन केले आहे की ते व इतर अर्जदार हे सुमारे पाच वर्षापासुन वरील वक्फ संस्थेचे व्यवस्थापनाचे कार्य करीत आहे. आज पर्यंत वक्फ संस्थेला कोणत्याही प्रकारची योजना नसल्याने सदरची योजना त्यांनी ती दाखल केली आहे. सबब त्यांचा योजनेचा अर्ज मंजुर करावा.

श्री. मोहम्मद उमर बाहादुर खान यांचा योजना अर्जावर श्री. अफजल खान यांचा आक्षेप अर्ज

श्री. अफजल खान यांनी असे कथन केले आहे की सर्व आक्षेप कर्ता अर्जदार हे संस्थेचे मुतवल्लीयान आहेत. मोहम्मद उमर व इतर अर्जदार हे सर्व नातेवाईक असुन त्यांनी एकमेकांच्या सल्ला मसलतीने योजना दाखल केली आहे. तसेच त्या मोहल्यातील लोकांना विश्वासात न घेता त्यांची सम्मती न घेता योजना दाखल केली आहे तसेच ते वंशपरंपरेने विश्वस्त नाही.

अर्जदार क्र.११ कारी शकील अहमद याने वक्फ संस्थेच्या मिळकतीत अतिक्रमण केले असुन १५X८१ स्के.फु. एवढया जागेचा अनाधिकृत ताबा घेतलेला आहे सध्या तोच फक्त तेथे राहतो. सर्व अर्जदार हे वादगृस्त व्यक्ती असुन मिळकत हडप करणे करीता त्यांनी योजना दाखल केलेली आहे व त्यातील सर्व मजकुर बोगस व काल्पनिक आहे त्यांनी ऑडीट व अकौंट मंडळाला सादर केलेला नाही. वक्फ संस्थेचे बैंक अकौंट आहे परंतु अर्जदार ते वापरत नाही. फक्त उमर खान व एकबाल खान संस्थेची देखभाल करतात बाकीचे सर्व डमी अर्जदार आहे. तथापि ते नमाजला देखील मशीदीत येत नाही अर्जदार १ व२ हे दोन्ही मुतवल्ली ३५ वर्षापासुन संस्था चालवतात परंतु ते वयस्कर झालेले आहे व ते उचित स्वरूपात संस्था चालवु शकत नाही ८ दुकाने आहेत ते बेकायदेशीर चालवतात व त्यांनी वक्फ मंडळाची मान्यता घेतलेली नाही तसेच करारनाम्याप्रमाणे भाडे देत नाही. अर्जदार १ व २ यांनी मशीदीची जागा एक

अरबी शाळा ज्याचे नाव "बशीरूल उलुम" आहे यांना मोफत दिली आहे परंतु शाळा विदयाथ्याकडून नियमित फी आकारुन पैसा वसुल करीत आहे.

वरिल सर्व कारणास्तव अर्जदार योजनेचा अर्ज नामंजुर करावा

तिसरे अर्जदार खुर्रम अहमद गुलामगैस खान यांचा योजना मंजुरीचा अर्ज

अर्जदाराने दि. २४/०२/२०२० रोजी योजना मंजुरीला अर्ज दाखल केला होता परंतु दि.२८/१०/२०२० रोजी त्यांनी पुन्हा अर्ज देऊन सदर योजनेचा अर्ज माघार घेत असल्याबाबत व सदरचा अर्ज फाईल करण्याबाबत विनंती केली आहे.

ठराव क्रमांक ११:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार, गैरअर्जदार तसेच हरकतदार यांनी दाखल केलेले सर्व लेखी युक्तीवाद तसेच तोंडी युक्तीवाद व संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, मस्जिद एकखाना कबरसह, जुना बाजार, औरंगाबाद या वक्फ संस्थेचे व्यवस्थापन सुमारे ३५ वर्षापासुन मोहम्मद उमर खान व इतर यांच्या कडुन करण्यात येत आहे. या कालावधीत मस्दिच्या व्यवस्थापनासाठी कोणतीही योजना मंजुर करण्यात आल्याचे दिसुन येत नाही. ते नियमितपणे ऑडिट दाखल करित नाहीत त्यामुळे नियमित वक्फ फंडचा भरणा होत नाही. वक्फ संस्थेच्या दुकानांचे भाडे अल्प असून ते लीज रुल्स २०१४ प्रमाणे वसूल केले जात नाही असे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. सदर संस्था औरंगाबाद शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असुन संस्थेच्या मालमत्तेचे सुयोग्य संरक्षण व संवर्धन होणे आवश्यक आहे, तसेच मस्जिदमध्ये योग्य सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे दोन्ही पक्षकारांनी सादर केलेल्या योजना विचारात घेता अर्जदार खान अफजल खान इक्बाल यांनी सादर केलेली योजना अधिक सुयोग्य व स्विकारार्ह आहे.

अर्जदार खान अफजल खान एकबाल व इतर ७,रा. नई बसती, जुना बाजार, औरंगाबाद. इतर यांनी सादर केलेल्या व्यवस्थापन योजनेमध्ये आवश्यक बदल करुन मस्जिद एकखाना कब्रसह, जुना बाजार, औरंगाबाद या वक्फ संस्थेची योजना मंजुर करण्यात येत आहे.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक १२:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/१६९/२०१४

शेख कमरूद्दीन हाजी शेर मोहम्मद व इतर १३,
वय- ७६, पेन्शनर रा. नंदनवन कॉलोनी, औरंगाबाद.

----- अर्जदार

विरूध्द

शेख फैसल मोहम्मद इकबाल
रा. अन्सार कॉलोनी पडेगाव, औरंगाबाद

----- गैरअर्जदार

प्रकरण - बिबीका मकबरा जवळील कब्रस्तान व दर्गा, औरंगाबादच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र.. MSBW/ABD/२९५/२०१२

प्रारंभिक (विवेचन) -

बिबीका मकबरा जवळील कब्रस्तान व दर्गा, औरंगाबाद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/ABD/२९५/२०१२ असा आहे.

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी व योग्य प्रशासनाकरिता अर्जदार शेख कमरूद्दीन हाजी शेर मोहम्मद वंय- ७६, पेन्शनर व इतर १३, रा. नंदनवन कॉलोनी, औरंगाबाद. यानी दिनांक १३/०३/२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे योजना सादर केली आहे.

वक्फ संस्था कब्रस्तान व दर्गाह बीबीका मकबरा जवळ औरंगाबाद ता.औरंगाबाद जि.औरंगाबाद ही संस्था गॅझेटच्या अ.क्र. १८ वर असून दिनांक ३ मे १९७३ मध्ये नोंदणीकृत आहे.

तसेच संस्था व संस्थेशी निगडीत मालमत्ता/मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ अन्वये वक्फ नोंद पुस्तक अनुसुची १ मध्ये घेण्यात आली आहे.

सदर संस्थेच्या योजना मंजुरीच्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्रमांक मरावमं/चौकशी/नक्र/६९/१६९/२०१४/१७८८/१४ दिनांक २१/०३/२०१४ रोजी जाहिर प्रगटन निर्गमित करून आक्षेप/तक्रार /हरकत मागविण्यांत आले होते.

तसेच जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना दिनांक ०७/०१/२०२० रोजी जावक्र क्र.१३१/११९ अन्वये पत्र पाठवुन सविस्तर अहवाल आभिप्रयासह सादर करण्याचे आदेश करण्यात आले होते.

त्या अनूषंगाने जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र २७६ दिनांक ७.७.२०२१ अन्वये असा अहवाल दिला आहे की, सदर संस्थेच्या ॲडहाक समितीची नियूक्ती दिनांक ५.५.२०१४ रोजी काही अटीवर करण्यांत आली होती सदर कमिटीने नियमितपणे दरवर्षी सदर संस्थाच्या बजेट, हिशोब व वक्फ फंड वक्फ मंडळात जमा करावे असे आदेश दिले होते परंतु ॲडहाक कमिटीने नियुक्ती पासून आज पर्यंत बजेट, हिशोब व वक्फ फंडाची रक्कम जमा केलेली नाही. कमिटीचे अध्यक्ष शेख कमरोददीन याचा मुत्यू झालेला आहे व कमिटी मध्ये एकूण सर्व सदरस्य व सचिव एकाच घराचे नातेवाईक आहे अशी माहिती दिली आहे. श्री शेख फैसल मोहंमद एकबाल यांनी सदर ॲडहाक कमिटी व योजनेमध्ये आक्षेप घेतलेला असून सदर कमिटीच्या विरूध्द रोष असल्याने तात्काळ कमिटी रदद करून सदर कब्रस्तान वक्फ मंडळाच्या ताब्यात घेण्याचे आदेश व्हावे असे म्हटले आहे. सदर प्रकरणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्याने कमिटी रदद करणे बाबत विनंत केली आहे.

सदरची ॲडहोक कमिटीचे आदेश रदद करणे बाबत वक्फ अधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/चौकशी/एमएन/६९/१६९/१४/२५०३/१४ दिनांक ५.५.२०१४ अन्वये सदर संसथेच्या दैनंदिन कामकाजासाठी १३ लोकांची तात्पुरत्या समितीची नियूक्ती योजना मंजूर होईपर्यंत करण्यांत आलेली होती.

श्री. शेख फैसल मोहंमद इक्बाल रा अन्सार कॉलनी पडेगांव, औरंगाबाद यांनी दिनांक १६.११.२०१५ रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या योजना अर्ज दाखल केला होता तसेच

गैरअर्जदार १ शेख फैसल मोहम्मद इकबाल रा. अनसार कॉलोनी पडेगाव, औरंगाबाद यांनी दि.२९/१२/२०१५ च्या पत्रा अन्वये अर्जदार शेख कमरूदीन हाजी शेर मोहम्मद वय- ७६, पेन्शनर रा. नंदनवन कॉलोनी, औरंगाबाद. यानी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे सादर केलेल्या योजनेमध्ये आक्षेप नोंदवुन तसा आक्षपे अर्ज सादर केला आहे

प्रकरणात श्री फैसल मोहंमद इक्बाल व यासेर खान यांनी योजना मान्यतेस अक्षेप नोंदवल्याने अर्जदार व गैरअर्जदार यांना सुनावणी करिता नोटीसा काढुन दि. ०८/१०/२०२१ रोजी सुनावणी करिता कागदपत्रासह पाचारण करण्यात आले तसेच त्यांना लेखी म्हणणे सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -

दि. ०८/१०/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली त्यावेळेस अर्जदार कमरूदीन हाजी शेर मोहम्मद वय- ७६, पेन्शनर रा. नंदनवन कॉलोनी, औरंगाबाद. हे हजर होते तसेच श्री मोहंमद इस्माइल अर्जदार क्रमांक ५, व यासीर खान, आक्षेप घेणारे परंतु गैरअर्जदार म्हणुन सामील नसलेले हे देखील हजर होते.

अर्जदाराचा युक्तीवाद -

अर्जदारांनी त्यांच्या अर्जात व युक्तीवादात असे नमुद केले आहे की ते सध्या वरील वक्फ संस्थेची देखभाल करतात. धर्मादाय आयुक्त अहमदनगरच्या रेकॉर्डला सर्व मुतवल्लीची सुची - १ मध्ये नोंद आहे तसेच त्यांनी सदर संस्थेच्या तदर्थ (Adhoc) समितीच्या मंजुरीसाठी अर्ज दिलेला आहे त्यांनी सादर केलेल्या व्यवस्थापनासाठीच्या योजनेस मान्यता दयावी असे नमुद केले आहे.

अर्जदाराच्या अर्जावर हरकतदार श्री फैसल मोहंमद इक्बाल यांची हरकत

हरकदार यांनी असे नमुद केले आहे, की सदर कब्रस्तान व दर्गा बीबीका मकबरा जवळ औरंगाबाद सदरची संस्था राबीया दुरानी इनामी जमीनीवर असुन बिबीका मकबरा व दर्गाच्या मुतवल्ली म्हणुन त्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच सदरील वक्फ संस्था अर्थात कब्रस्तानात फक्त त्यांच्या वशपंरपरेनुसार मृत्यू झालेले व्यक्तींनाच दफन (तत्फीन) करतात. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की श्री. मोहम्मद खान इस्माईल खान, समशेर खान यांनी नोटरी आधारे दि. १२/०३/२०१४ रोजी शपथपत्र दिले की, सदर संस्थेचे ते मुतवल्ली आहे. पंरतु प्रत्यक्षात ते कुठल्याही प्रकारचे मुवतल्ली नाहीत तसेच ते लोक मुस्लीम रितीरिवाजा प्रमाणे दर्गा व कब्रस्तानात विना परवागी कुठल्याही लोकांची दफनविधि करतात तसेच बनावट कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात योजनेचा प्रस्ताव दाखल केलेला आहे, तो प्रस्ताव रद्द करावा. हरकदारांची वंशपंरपरागत योजना मंजुर करावी. संस्थेचे ते वंशपंरपराने वहिवाटदार असुन ते सदर संस्थेचे मुतवल्ली आहेत.

गैरअर्जदार क्र १ फैसल मोहम्मद यांचा युक्तीवाद

गैरअर्जदार क्र-१ यांनी असे नमुद केले आहे की, ते वंशपंरपरागत संस्थेचे मुतवल्ली असुन त्यांनी अर्जदारच्या अर्जाला सक्तरितीने अक्षेप घेतलेला आहे. अर्जदार नं १ ते ११ यांना योजना दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही तसेच त्यांचा योजना दाखल करण्याचा हेतु उचित स्वरूपाचा नसुन त्यांना संस्थेच्या प्रशासनाच्या कामकाजात ढवळाढवळ करण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यांनी महत्त्वाच्या बाबी वक्फ मंडळापासुन लपविल्यामुळे त्यांचा योजनेचा अर्ज रद्द होणेस पात्र आहे.

ठराव क्रमांक १२:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार, गैरअर्जदार यांनी दाखल केलेले सर्व लेखी युक्तीवाद तसेच तोंडी युक्तीवाद व संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की मुस्लीम समाजाच्या सदस्यामधून मुतवल्ली/व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या नेमणूकी करिता व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची निवड ही मतदान पध्दतीने होणे आवश्यक आहे, अशाप्रकारे निवड पध्दतीचे व्यवस्थापकीय समिती अस्तित्वात आली तर कोणालाही शंका घ्यायला जागा राहणार नाही. त्याकरिता जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांनी निवडणूक प्रक्रिया योग्य त-हेने पारदर्शक पध्दतीने पार पाडावी जेणे करून कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत घ्यायला वाव मिळू नये. निवडणूकी प्रक्रियासाठी आवश्यक सर्व बाबी पूर्ण कराव्या. संबंधितांना नोटीसा देणे त्यांची पोहोच घेणे व तत्सम बाबी ज्याचा नंतर उहापोह होण्याची शक्यता आहे ते सर्व बाबी पूर्ण कराव्या, तसेच निवडणूकी संबंधी गांवात व सार्वजनिक ठिकाणी तशी नोटीस बोर्डावर मतदाना बाबत प्रसिध्दी द्यावी. तसेच जे कोणी इच्छूक असतील ते व पुर्वीचे समिती सदस्य व हरकतदार तसेच अर्जदार या सर्वांना निवडणूक/मतदानाच्या नोटीसा द्याव्यात सर्व मोक्याच्या ठिकाणी मतदानाबाबत नोटीसा डकवावे व नोटीसा डकवले बाबत तसा संबंधितांचा अहवाल घ्यावा व सर्व कागदपत्राची पूर्तता करून तसे रेकॉर्ड तयार करावे व निवडणुक पार पाडावी त्यानंतर निवडणुकी बाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांचे कडे सादर करावा.

सदरील वक्फ अधिकाऱ्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निवडून आलेल्या सदस्यामधून व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी मॉडेल स्कीम प्रमाणे सदर वक्फच्या व्यवस्थापनासाठी सर्वसमावेशक योजना सादर करणेबाबत या कार्यालयाकडून आदेशित करणेत येवून ३ महिन्या मध्ये सदरील सर्वसमावेशक योजना सादर करणेबाबत कळविणेत यावे. सदरील योजना प्राप्त झाल्यानंतर योजना मंजूरी बाबत वक्फ मंडळाकडून स्वतंत्र कार्यवाही करणेत येईल.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक १३:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/१५४/२०१६

योजना ..

१. असीर नजीर अन्सारी व इतर ९, राहणार, देवळापार ता.रामटेक जि.नागपूर
२. गूलजार उस्मान कूरेशी व इतर ७, रा.डोंगरतळा ता.रामटेक जि. नागपूर
३. मोहंमद अकीबखान सिददीक खान व इतर ७, रा मोरफाटा.मनेगांव ता.रामटेक जि.नागपूर
४. इरशादखान पठाण व इतर वगैरे ५, रा.रामटेक जि.नागपूर
५. अहमद करीम व इतर ५, रा.बूटी बोरी, नागपूर. जि. नागपूर
६. खलील अहमद व इतर ९ , तलकनगर , बँगलोर (कर्नाटक)
७. यूनूस इस्माईल मन्सूरी व इतर ६, ठिळकवार्ड, रामटेक जि.नागपूर

----- अर्जदार

प्रकरण : हजरत सय्यद सखी पीर बाबा ट्रस्ट, रहेमतनगर ,मोरफाटा ता. रामटेक, जि.नागपूर च्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार वरिल ७ प्रस्तावीत योजनांपैकी एका योजनेस मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र. MSBW/NGP/६२/२००९

प्रारंभिक (विवेचन) -

हजरत सय्यद सखी पीर बाबा ट्रस्ट, रहेमतनगर , मोरफाटा ता. रामटेक जि. नागपूर ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/NGP/६२/२००९असा आहे.

संस्थेची मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या दैंनदिन व्यवस्थापनासाठी व योग्य प्रशासनासाठी वरील योजना क्र १ ते ७ मधील अर्जदारांनी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्याकडे स्वतंत्र योजना सादर केली आहे.

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे पत्र (जाहिर प्रगटन) दि. २३/०१/२०२० प्रमाणे प्रादेशिक वक्फ अधिकारी नागपुर विभाग नागपुर यांना पत्र देऊन आदेशीत करण्यात आले होते की, सदरील संस्थेच्या नोटीस बोर्ड वर जाहिर प्रगटनची प्रत चिटकवुन स्थळपाहणी व चौकशी करुन सविस्तर अहवाल अपल्या अभिप्रायसह या कार्यालयास सादर करावा.

त्या अनूषंगाने प्रादेशिक वक्फ अधिकारी, नागपुर विभाग, नागपुर यांनी पत्र क्र. विवका/नापु/०३/२०२० दिनांक ०१/०२/२०२० अन्वये कथन केले आहे की त्यांनी सदर संस्थेच्या नोटीस बोर्डावर दोन्ही प्रती दि. ०३/०१/२०२० रोजी प्रत्येक्ष ठिकाणी पंचासमक्ष चिटकवले आहे त त्यांचा पंचनामा करुन फोटो ही घेतले आहे मुळ पंचनामा, फोटो आणि दैंनिक भास्कर वृत्तपत्र नागपुरची प्रत त्यांनी सोबत जोडलेली आहे. मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर यांचे दि. ०५/१२/२०१९ चे दिलेले आदेशाची अमंलबजावणी व्हावी असे त्यांनी नमुद केले आहे. सदर संस्थेच्या व्यवस्थापनासाठी सादर झालेल्या योजनांचा संक्षिप्त तपशील खालील प्रमाणे आहे.

योजना क्र.१

असीर नजीर अनसारी व इतर ९ रा. देवलापुर ता. रामटेक, जि. नागपुर ----अर्जदार

विरूध्द

१. आसीफ रफीक खान पठाण
२. अलीम खान सलीम खान पठाण दोन्ही रा. देवलापुर, ता, रामटेक, जि. नागपुर

----मध्यस्ती हरकतदार

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता वरील अर्जदार यांनी दि.०७/०२/२०२० रोजी योजना अर्ज सादर केलेली आहे. त्यात नमुद केले आहे की मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर यांचे रिट पिटीशन क्र. ६८२८/२०१८ दि. ०५/१२/२०१९ नुसार नवनिर्मित समिती नोंदणी करीता वक्फ मंडळाचे जाहिर प्रगटना नुसार स्थार्या समिती करीता त्यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

वरील अर्जदाराच्या अर्जाला मध्यस्ती हरकतदार श्री. असीफ रफीक खान पठान व अलीम खान सलीम खान पठाण रा. देवलापुर, ता. रामटेक यांनी रोजी मध्यस्थी हरतक देऊन नमुद केले आहे की ते हजरत सय्यद सखी पीर बाबा ट्रस्ट, रहेमतनगर , मोरफाटा ता. रामटेक जि. नागपुर यांचे अनुयायी असुन नेहमी दर्गाचे दर्शन घेणे चादर चढवीने व फातीया देणे हे कार्य करीत असतात. तसेच वक्फ संस्थेमध्ये त्यांना रस आहे. तसेच त्यांनी नमुद केले आहे की, गैरअर्जदार महेरून्नीसाबेगम उर्फ अम्मा व इतर यांना ते मदत करतात महेरून्नीसाबेगम यांनी वक्फ फंडातु रु १९००००/- रु बैंक ऑफ इंडीया देवलापुर शाखेच्या बैंकेतुन चेकबुक द्वारे काढुन पैशाचा अपहार केला होता व त्यांना वरील अर्जदारने पाठीबा दिला होता सबब त्यांचे हे कृत्यामुळे ते योजना मंजुरी मध्ये बसु शकत नाही. सबब हरकतदार मध्यस्थी यानां ६९ (४) च्या कलमानुसार मुख्य अर्जामध्ये पक्षकार म्हणुन सामिल करून घ्यावे.

योजना क्र.२

गूलजार उस्मान कूरेशी .७ रा.डोंगरतळा ता.रामटेक जि. नागपूर -----अर्जदार

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता वरील अर्जदार क्र.२ यांनी दि.१५/०३/२०१६ रोजी योजना अर्ज सादर केलेली आहे. मंडळाचे जाहिर प्रगटनानुसार स्थायी समिती करीता त्यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

वरील अर्जाला मध्यस्ती हरकतदार श्री. असीफ रफीक खान पठान व अलीम खान सलीम खान पठान रा. देवलापुर, ता. रामटेक मध्यस्ती हरकदार तसेच अशफाक अली रमजान अली व इतर ७, यांनी तसेच आकीब खान यांनी दि २७/०९/२०१८ रोजी हरकत देऊन नमुद केले आहे की ते हजरत सय्यद सखी पीर बाबा ट्रस्ट, रहेमतनगर , मोरफाटा ता. रामटेक जि. नागपुरचे भक्त असुन नेहमी दर्गाचे दर्शन घेणे चादर चडवीने व फातीया देणे हे कार्य करीत असतात. तसेच वक्फ संस्थेमध्ये त्यांना रस आहे. तसेच त्यांनी नमुद केले आहे की गैरअर्जदार महेरूम नीसाबेगम उर्फ अमा व इतर यांना ते मदत करतात महेरूम नीसाबेगम यांनी वक्फ फंडातु रु १९००००/- रु बैंक ऑफ इंडीया देवलापुर शाखेच्या बैंकेतुन चेकबुक द्वारे काढुन पैशाचा अपहार केला होता व त्यांना वरील अर्जदारने पाठीबा दिला होता सबब त्यांचे हे कृत्यामुळे ते योजना मंजुरी मध्ये बसु शकत नाही सबब हरकतदार मध्यस्थी यानां ६९ (४) च्या कलमानुसार मुख्य अर्जामध्ये पक्षकार म्हणुन सामिल करून घ्यावे.

तसेच दुसरे हरकतदार अकरम अब्बास व महेरून्नीसा बेगम उर्फ अम्मा यांनी दि. १४/०२/२०२० रोजी हरकत देऊन असे कथन केले आहे की अर्जदार यांनी खोटे कागदपत्र बनवुन इतर अर्जदारांच्या सहया घेतलेल्या आहे. वक्फ संस्थेचा व अर्जदाराचा काही संबंध नाही. तसेच अर्जदाराने हे अर्जदेण्यापुर्वी कलम ४२अन्वये कोणताही फेर अर्ज दिलेला नाही. धर्मादाय आयुक्त नागपुर यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या आगोदर कोणताही सुची १ अर्जदाराचा नावावर दिलेला नाही अर्जदारांनी वक्फची मिळकतमध्ये गैरव्यवस्थापन केलेले आहे तसेच वक्फ फडांमध्ये घेटाळा केलेला आहे तसेच वक्फ फडांची महिती कित्येक वर्षापासुन दिलेली नाही. संस्थेचे अकाँट बैंकेत आहे परंतु गुलजार ऊसमान कुरैशी व महेरुन्नीसा बेगम यांनी दर्गाच्या नावाने देणघी गोळा करुन देणगी तसेच सोने चांदी तसेच जंगल मालमत्तेची ते चोरी करीत आहे तसेच वक्फ मंडळात चुकीची माहिती देऊन नोंदणी करीत आहे.

सबब सर्व मुतवल्ली यानच्या वतीने अर्जदाराचे म्हणणे आहे की वरील सर्व कारणास्तव त्यांचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

तसेच सोहेल अहेमद अन्नसारी यांनी दि. ०७/०१/२०२० रोजी आक्षेप नोंदवुन कथन केले आहे की गुलजार उसमान कुरैशी व इतर ६ हे वक्फच्या व्यवस्थापनामध्ये रोज भांडण करीत आहे. तसेच ते गैरव्यवस्थापना व वक्फच्या देणगीत घोटाळा करीत आहे त्यामुळे त्यांच्या विरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच योजने मध्ये वयसकर लोक घेऊ नये सदरची प्रक्रिया नागपुर येथुन करावी तसेच जाहीर प्रगटन स्थानीक वृत्तपत्रात न देता दुस-या वृत्तपत्रात दिले आहे अशा प्रकारचे आक्षेप घेतलेले आहे.

श्री. शेख सलीम अब्दुल करीम खान व इतर यांची हरकतीत त्यांनी असे नमुद केलेले आहे ते स्थानीक रहिवासी असुन दर्गाचे भक्त आहे. श्री. गुलजार कुरैशी व इतर ६ हे रोज आपसामध्ये व्यवस्थापनाच्या माध्यमातुन भांडण करीत आहे तसेच त्यांची व्यवस्थापना हे बरोबर नसुन त्यांनी वक्फ संस्थेच्या पैश्याच्या गैरव्यवहार तसेच अपहार केलेला आहे सबब त्यांची चौकशी करण्यास आवश्यक आहे

योजना क्र.३

मोहम्मद आकीब खान इतर ७ रा.मोरफाटा मनेगांव ता.रामटेक जि.नागपूर ----अर्जदार

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता वरील अर्जदार यांनी दि.२७/०९/२०१८ रोजी योजना अर्ज सादर केलेली आहे. त्यात नमुद केले आहे की जाहिर प्रगटनानुसार स्थायी समिती करीता त्यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा. तसेच त्यांनी असे नमुद केले आहे की ते वक्फ संस्थेचे भक्त असुन ते कायम संस्थेला भेट देत असतात तसेच हजरत सय्यद सखी पीर बाबा ट्रस्ट,

रहेमतनगर , मोरफाटा ता. रामटेक जि. नागपुरचे भक्त असुन नेहमी दर्गाचे दर्शन घेणे चादचढवीने व फातीया देणे हे कार्य करीत असतात. तसेच ते वक्फ संस्थेमध्ये त्यांना रस आहे. तसेच त्यांनी नमुद केले आहे की ते हजरत सखी पिर यांच्या शिकवणीवर चालतात तसेच त्यांनी दिलेल्या उपदेशाचे अमलंबजावणी करतात.

मोहम्मद रिजवान खान व शेख रिजवान कुरैशी यांनी दि. १४/०२/२०२० रोजी हरकत नोंदवुन असे कथन केले आहे की अर्जदाराचा वक्फ संस्थेशी कोणताही संबंध नाही तसेच नजीर अहमद बेलारी यांची कब्र त्यांनी मुदाम वक्फ ट्रस्टच्या मिळकतीत केली आहे. सदरची संस्था ७ एकर वर असुन ती फॉरेस्टच्या क्षेत्रात आहे. अर्जदरांनी बेकादेशीर कृत्य चालुच ठेवलेले आहे. तसेच दैनिक भास्कर मध्ये दि. ०१/०२/२०२० रोजी जाहिरनोटीस दिलेली आहे ती कायदेशीर नाही वरील सर्व कारणस्तव अर्जदारचा अर्ज नामंजुर करावा

योजना क्र.४

इरशाद खान पठाण व इतर ५, रा. रामटेक, ता. रामटेक, जि. नागपुर ----अर्जदार

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता वरील अर्जदार यांनी दि.२७/०९/२०१८ रोजी योजना अर्ज सादर केलेली आहे. त्यात नमुद केले आहे की त्यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा. तसेच त्यांनी असे नमुद केले आहे की ते वक्फ संस्थेचे भक्त असुन ते कायम संस्थेला भेट देत असतात तसेच हजरत सय्यद सखी पीर बाबा ट्रस्ट, रहेमतनगर , मोरफाटा ता. रामटेक जि. नागपुरचे भक्त असुन नेहमी दर्गाचे दर्शन घेणे चादचढवीने व फातीया देणे हे कार्य करीत असतात. तसेच वक्फ संस्थेमध्ये त्यांना रस आहे. तसेच त्यांनी नमुद केले आहे की ते हजरत सखी पिर यांच्या शिकवणीवर चालतात तसेच त्यांनी दिलेल्या उपदेशाचे अमलंबजावणी करतात.

तरी त्यांनी दिलेला अर्ज मंजुर करण्यात यावा.

योजना क्र.५

अहेमद करीम व इतर ७ रा. नागपुर ता. नागपुर, जि. नागपुर ------अर्जदार

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता वरील अर्जदार यांनी दि.२७/०९/२०१८ रोजी योजना अर्ज सादर केलेली आहे. त्यात नमुद केले आहे की मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर यांचे रित पीठीशीन क्र. ६८२८/२०१८ दि. ०५/१२/२०१९ नुसार नवनिर्मीत समिती नोंदणी करीता वक्फ मंडळाचे जाहिर प्रगटनानुसार स्थाई समिती करीता त्यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा. तसेच त्यांनी असे नमुद केले आहे की ते वक्फ संस्थेचे भक्त असुन ते कायम संस्थेला भेट देत असतात तसेच हजरत सय्यद सखी पीर बाबा ट्रस्ट, रहेमतनगर , मोरफाटा ता. रामटेक जि. नागपुरचे भक्त असुन नेहमी दर्गाचे दर्शन घेणे चादर चढवीने व फातीया देणे हे कार्य करीत असतात. तसेच वक्फ संस्थेमध्ये त्यांना रस आहे. तसेच त्यांनी नमुद केले आहे की ते हजरत सखी पिर यांच्या शिकवणीवर चालतात तसेच त्यांनी दिलेल्या उपदेशाचे अमलंबजावणी करतात.

तरी त्यांनी दिलेला अर्ज मंजुर करण्यात यावा.

श्री. माहेम्मद अकीब खान व इतर हरकतदार यांनी दि. ०३/०८/२०२१ रोजी अर्ज देऊन असे नमुद केले आहे की विश्वस्तांची निवड ही दर पाच वर्षाला घ्यावी या मुदयावर त्यांनी असा आक्षेप घेतलेला आहे की विश्वस्तांची निवड गुप्त मतदानाने घेण्यात यावी तसेच विश्वस्तांची निवड करताना रामटेक या गावाच्या हदित राहणारे परिवारामधुन लोकशाही पध्दतीने गुप्त मतदानाने घेण्यात यावी. अहमद करीम यांनी दाखल केलेली योजना रद्द करावी. अहमद करीम हे दर्गापासुन १०० कि.मी. लांब राहतात सबब त्यांचा व नागपुर, कामठी, शहरामध्ये जे लोक राहतात त्यांना निवडणुकी पासुन दुर ठेवावे अहमद करीम यांनी वक्फ मिळकतीची बेकादेशीर विल्हेवाट लावली आहे. न्यायालयाचे आदेश असताना देखील त्यांनी त्यांची पर्वा केलेली नाही सबब त्यांचा योजना मंजुरीचा अर्ज नामंजुर करवा ही विनंती.

योजना क्र.६

खलील अहमद इतर ९, रा. रामटका. ता.जि. नागपुर ----अर्जदार

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता वरील अर्जदार यांनी दि.१४/०२/२०२० रोजी योजना अर्ज सादर केलेली आहे. त्यात नमुद केले आहे की मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर यांचे रित पीठीशीन क्र. ६८२८/२०१८ दि. ०५/१२/२०१९ नुसार नवनिर्मीत समिती नोंदणी करीता वक्फ मंडळाचे जाहिरप्र गटनानुसार स्थाई समिती करीता त्यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा. तसेच त्यांनी असे नमुद केले आहे की ते वक्फ संस्थेचे भक्त असुन ते कायम संस्थेला भेट देत असतात तसेच हजरत सय्यद सखी पीर बाबा ट्रस्ट, रहेमतनगर , मोरफाटा ता. रामटेक जि. नागपुरचे भक्त असुन नेहमी दर्गाचे दर्शन घेणे हे कार्य करीत असतात. तसेच ते वक्फ संस्थेमध्ये त्यांना रस आहे. तसेच त्यांनी नमुद केले आहे की संस्थाचे उत्तम व्यवस्थापनासाठी त्यांचा अर्ज मजुर कराव. सदरच्या अर्जा मध्ये श्रीमती. महेरुन्नीसा यांनी अर्जदारम्हणुन अर्जाच्या सर्वात शेवटी सही केलेली आहे परंतु अर्जदाराच्यां यादीत त्यांचे नाव समाविष्ट केले नाही.

हरकदार अशफाक अली रमजान अली व इतर यांनी अर्ज देऊन असे कथन केले आहे की अर्जदार यांनी खोटे कागदपत्र बवुन इतर अर्जदारांच्या सहया घेतलेल्या आहे. वक्फ संस्थेचा व अर्जदाराचा काही संबंध नाही. तसेच अर्जदाराने हे अर्ज देण्यापुर्वी कलम ४२अन्वये कोणताही फेर अर्ज दिलेला नाही. धर्मादाय आयुक्त नागपुर यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या आगोदर कोणताही सुची १ अर्जदाराचा नावावर दिलेला नाही. सबब अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

योजना क्र.७

युनुस इस्माईल मनसुरी व इतर ५, रा. टिळकवार्ड ता. रामटेक, जि. नागपुर. ----अर्जदार

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता वरील अर्जदार यांनी दि.०६/०७/२०१८ रोजी योजना अर्ज सादर केलेली आहे. अर्ज मंजुर करण्यात यावा. तसेच त्यांनी असे नमुद केले आहे की ते वक्फ संस्थेचे भक्त असुन ते कायम संस्थेला भेट देत असतात तसेच ते तेथील रहिवाशी असुन हजरत सय्यद सखी पीर बाबा ट्रस्ट, रहेमतनगर , मोरफाटा ता. रामटेक जि. नागपुरचे भक्त असुन नेहमी दर्गाचे दर्शन घेणे चादर चढवीने व फातीया देणे हे कार्य करीत असतात. तसेच वक्फ संस्थेमध्ये त्यांना रस आहे. तसेच त्यांनी नमुद केले आहे.

<u>सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद</u>

दि. ०७/१०/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली त्यावेळेस अर्जदार मोहम्मद अकीब खान हे अर्जदार क्र. २,४,५ यांच्या वतीने हजर होते. ॲड मोहम्मद शेख हे अतीकच्या वतीने हजर होते. ॲड लईक हे असीर नजीर अन्नसारी यांच्या वतीने हजर होते तसेच ॲड. एस.आए. हाशमी हे अहमद करीम भाई शेख यांच्या वतीने हजर होते.सर्व पक्षकारांना असे निर्देश देण्यात आले की, त्यांनी त्यांचा अखेरचा युक्तीवाद दि. २१/१०/२०२१ पुर्वी सादर करावा.

ठराव क्रमांक १३:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार, हरकतदार यांनी दाखल केलेले सर्व लेखी युक्तीवाद तसेच तोंडी युक्तीवाद व संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी करण्यात आली. प्राप्त योजना व त्यासोबतच्या कागदपत्राची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर तसेच सन्माननीय सदस्य श्री. हसनैन शाकीर यांचा अहवाल व सुनावणीच्या वेळेस सादर झलेले सर्व दस्तावेज व तोंडी युक्तीवाद यांचा विचार करता खालील वस्तुस्थिती वक्फ मंडळाच्या निदर्शनास आली आहे.

हजरत सय्यद सखी पीर बाबा दर्गा रहेमतनगर, मोरफाटा, ता. रामटेक, जि. नागपूर ही दर्गाह ग्रामिण भागाच्या लोकवस्ती पासून सूमारे ४ किलोमिटरच्या अंतरावर एकांत स्थळी व एकाकी ठिकाणी आहे. या दर्गाहच्या जवळून राष्ट्रीय महामार्ग गेलेले आहेत. या महामार्गावरुन ये जा करणाऱ्या व्यक्ती या दर्गाहसाठी श्रध्देने दानपेटी मध्ये रक्कम जमा करताता. रामटेक या तालूक्याच्या ठिकाणापासून ही दर्गाह सूमारे ३० किलोमीटर अंतरावर आहे. जवळपास लोकवस्ती नसल्यामुळे व जंगलाचा भाग व पर्वत, टेकडया जवळपास असल्याने या दर्गाहची देखभाल रांत्रदिवस करण्यासाठी काही विशिष्ठ व्यक्ती तेथे कायमस्वरुपी अदलाबदलीने राहणे आवश्यक आहे.

या करिता जवळपासच्या लोकवस्तीमधील काही व्यक्तींचा समावेश करून तसेच रामटेक परिसरातील प्रतिष्ठीत (प्रोमिनंट) व्यक्तींचा समावेश करुन एक सर्वसमावेशक व्यवस्थापकीय योजनेस मंजूरी देणे योग्य होईल यासाठी वक्फ मंडळाची आदर्श व्यवस्थापकीय योजना (माडेल स्किम) प्रमाणे एक योजना तयार करुन त्यावर सर्वसमावेशक पध्दतीने उपरोक्त प्रमाणे व्यक्तींची नियूक्ती करण्यांत यावी ही कार्यवाही पूर्ण होईपावेतो प्रादेशिक वक्फ अधिकारी, नागपूर यांच्या नियत्रंणाखाली एकगट तयार करुन त्यागटाद्वारे सदर वक्फ संस्थेचे दैनंदिन कामकाज चालविण्यांत यावे.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक १४:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/५१३/२०१४

अताउल्लाह सनाउल्लाह खान,
रा. एम.जी. कॉलोनी, वि.बी. नगर, कुर्ला, मुंबई ७०

----- अर्जदार

विरूध्द

शफीक अहमद पीर मोहम्मद शेख व इतर
रा. उनवाला कम्पाऊड, पाईप रोड, कुर्ला पश्चिम, मुंबई

----- गैरअर्जदार

प्रकरण - शेख रमजान शेख चांद ट्रस्ट, कुर्ला, मुंबई (खाचर पाईप रोड,मसजिद) दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र.. MSBW/MUM/१०७/२००९

प्रारंभिक - (विवेचन)

शेख रमजान शेख चांद ट्रस्ट, कुर्ला, मुंबई ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/MUM/१०७/२००९ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता अर्जदार अताउल्लाह सनाउल्लाह खान, रा. एम.जी. कॉलोनी, वि.बी. नगर, कुर्ला, मुंबई ७०, यानी दिनांक ०७/०८/२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे योजना सादर केली आहे. व असे कथन केले आहे की, वरील संस्था

ही वक्फ मंडळात नोंदणीकृत संस्था असुन त्यांनी प्रस्तावीत योजना मंजुरीसाठी या कार्यलयास अर्ज सादर केला आहे.

सदर प्रकरणासंबंधी अर्जदार यांनी सर्व कागदपत्राची पुर्तता केली आहे अर्जदारांने सादर केलेल्या योजना अर्जाची व प्रस्तावीत योजनेची पडताळणी करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्ये व्यवस्थापन समितीची प्रस्तावीत योजना मंजुर करण्यापुर्वी प्रादेशिक वक्फ अधिकारी, कोकण विभाग, मुबंई, यांचेकडुन वक्फ संस्था शेख रमजान शेख चांद ट्रस्ट कुर्ला मुंबईच्या संदर्भात दिनांक ०१/०८/२०१८ च्या पत्रान्वये अर्जदाराच्या अर्जासंबंधी चौकशी करुन सविस्तर अहवाल आभिप्रयासह सादर करण्याचे आदेश करण्यात आले होते.

त्या नुसार प्रादेशिक वक्फ अधिकारी, कोकण विभाग, मुंबई , यांनी त्यांचे पत्र जावक क्र. वक्फ/चौकशी-४१/१८९/२०१८ दि. १९/१२/२०१८ अन्वये अहवाल सादर केला आहे. त्यांनी त्यांच्या अहवालामध्ये खालील प्रमाणे कथन केले आहे की,

त्यांना चौकशीच्या वेळेस असे निर्दशनास आले की संस्थेच्या तरतुदीनुसार विश्वस्त निवडीचे पध्दती अन्वये दि. १२/०६/२०१४ रोजी मस्जिद मध्ये सभा घेऊन विश्वस्त मंडळासंबंधी तसेच घटनेच्या मसुदा संबंधी सर्व संमंतीने प्रस्ताव मंजुर करण्यात आलेला आहे. त्यानुसार वक्फ संस्थेचे व्यवस्थापन संबंधीत लोक करीत आहे तसेच कलम ६९ अन्वये सर्व अटीचे पालन केले आहे. सदर वक्फ संस्थेचे घटने संबंधीत त्यांना लेखी स्वरुपात कोणताही आक्षेप व हरकत अर्ज प्राप्त झालेला नाही. तसेच त्यांनी घटनेठिकाणी केलेल्या पंचनामाची प्रत दाखल केलेली आहे व योजनेचे पुढील कायर्वाहीसाठी अहवाल सादर केलेला आहे.

<u>अर्जदाराचा युक्तीवाद -</u>

अर्जदार हे व्यवस्थापन समितीचे मुतवल्ली असुन वरील वक्फ संस्थेचे जसे घटनेत नमुद केलेले आहे त्या प्रमाणे रोजच्या रोज सेवा करतात. सुरुवाती पासुन वरील वक्फ संस्थेस योजना नव्हती अर्जदाराने योजनेचा अर्ज दाखल केला आहे. तसेच त्यांनी सदर संस्थेच्या तदर्थ (Adhoc) समितीच्या मंजुरीसाठी अर्ज दिलेला आहे त्यांनी सादर केलेल्या व्यवस्थापनासाठीच्या योजनेस मान्यता दयावी असे त्यांनी नमुद केले आहे.

<u>गैरअर्जदार (हरकतदार यांचा युक्तीवाद) -</u>

शफीक अहमद पीर मोहम्मद तसेच हाफीज मुन्नवर नुर मोहम्मद व इतर ६, रा. कुर्ला, मुंबई यांनी दि. १३/०३/२०१९ व दिनांक १८.४.२०१८ रोजी हरकत देऊन असे कथन केले आहे की, स्थानिक मुस्लीम लोकामधुन विश्वस्तांची निवड केलेली नाही. जुम्मा नमाज नंतर लाखो रुपयची देणगी जमा करण्यात येत आहे परंतु त्यांचा कोणताही जमा खर्च ठेवण्यात आलेला नाही. तसेच संस्थेचे ऑडीट करण्यात आलेले नाही. भविष्यात १५०००००/- ची जमीन संस्था वक्फ मंडळाची परवानगी न घेता विकत घेणार आहे. सध्याच्या विश्वस्तांनी इमाम व इतर कर्मचा-याना दुस-या विश्वस्तांना विश्वासात न घेता कामावरुन काढून टाकण्यात आले आहे.

हाफीज मुन्नवर यांनी वक्फ कलम ७० अन्वये अर्ज दिलेला आहे की, काही मुतवल्ली बेकादेशीर रित्या वरील वक्फ संस्था चालवीत आहे. सदरचा अर्ज मंडळात प्रलंबीत आहे तसेच मा. उच्च न्यायालय याच्या समोर चालु आहे. त्यामध्ये देखील गैरव्यवहार व मतदान हे मुद्दे माडण्यात आलेले आहे. काही संस्थेच्या नावाने रक्कम जमा करुन त्याचे कोणतेही प्रकारचे जमा खर्च ठेवत नाही. तसेच ॲडीट जमा करत नाही. सध्याच्या आस्तित्वात असलेल्या विश्वस्तांनी बेकादेशीर रित्या योजना दाखल केली आहे त्याच्या विरुध्द हरकतदारांने हरकत दाखल केली आहे. सध्याच्या विश्वस्तांनी गेल्या २५ वर्षापासुन कोणतेही प्रकारची निवडणुक घेतलेली नाही. तसेच वक्फ संस्थेचे ऑडीट केलेले नाही व वक्फ संस्थेच्या

पैश्याचा व मिळकतीचा अपहार केलेला आहे. सदर हरकत दाखल करण्यास त्यांच्या बरोबर भरपुर लोक असुन त्यांनी अर्जावर सहया केलेल्या आहे सबब अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येऊ नये .

सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -

या कर्यालयाचे पत्र जा.क्र.मरावंम/चौकशी/५६४३/२१ दिनांक १८.८.२०२१ अन्वये दि.०२/०९/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली, त्यावेळेस अर्जदार अताउल्ला सनाउल्ला खान यांचे करिता ॲड अमजद पठाण हजर होवून त्यांनी वकिलपत्र दाखल आहे. तसेच गैरअर्जदार शफीक अहमद पीर मोहंमद शेख करिता ॲड.तबरेज मुस्तफा हजर होते. हरकतदारास लेखी यूक्तीवाद दिनांक १५.९.२०२१ पूर्वी दाखल करण्यास परवानगी देण्यांत आली. तसेच निकालाची तारीख वेगळी कळविणेत येईल असे सांगण्यांत आले

ठराव क्रमांक १४:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार, गैरअर्जदार यांनी दाखल केलेले सर्व लेखी युक्तीवाद तसेच तोंडी युक्तीवाद व संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, शेख रमजान शेख चांद ट्रस्ट, कुर्ला, मुंबई ही वक्फ संस्था धर्मदाय आयूक्त यांच्याकडे शेख रमजान शेख चांद ट्रस्ट (कुर्ला) (known as pipe road or khachare masjid maintenance waqf) या नांवाने अनूक्रमांक बी-३८ नुसार नोंद झलेली वक्फ संस्था आहे व या वक्फ संस्थेच्या सदस्य नियूक्तीची रीत *The settlor during his life time and after him continuing or surviving trustees to appoint new Trustees* अशी आहे. या वक्फ संस्थेव्यक्तिरिक्त खाचर पाई रोड मस्जिद, १९४, न्यू मिल वॉर्ड, कुर्ला अशी दुसरी वक्फ संस्था धर्मदाय आयूक्त यांच्याकडे क्रमांक बी-६९१ अन्वये नोंदणी झालेली आहे, या वक्फ संस्थेच्या सदस्य नियूक्तीची रीत *by election by Jamat* अशी आहे. शेख रमजान शेख चांद ट्रस्ट, कूर्ला, मुंबई व खाचर पाईप रोड मस्जिद, कूर्ला, मुंबई या दोन्हीही स्वतंत्र वक्फ संस्था असून या वक्फ संस्था धर्मादाय आयूक्त येथे नोंदणी करताना त्यामध्ये असे स्पष्ट करण्यांत आले आहे की, शेख रमजान ट्रस्टच्या रहिवासी चाळीचे उत्पन्न खाचर पाईप रोड मस्जिद, कूर्ला या मस्जिदच्या खर्चासाठी उपयोगात आणण्यात येईल या दोन्ही वक्फ संस्था एक दूसऱ्याच्या शेजारी असून या वक्फ संस्थेची मालमत्ता म्हणजे एक मस्जिद व त्या सोबतची रहिवासी चाळ अशी आहे, असे असल्याने या प्रकरणी प्राप्त झालेली योजना व त्यावरील आक्षेप हे परस्पर विरोधी स्वरुपाचे असून सदर वक्फ संस्थेच्या धर्मदाय आयूक्ताकडे दाखल करण्यांत आलेल्या दिनांक २३.१२.१९४४ व दिनांक १९.८.१९५२ रोजीच्या दस्तावेजावरुन सदर वक्फ संस्थच्या बाबतीत निर्णय घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे *Shaikh Ramjan Shaikh Chand Trust (Known as Pipe road) or khachar masjid maintenance waqf, Pipe road, Kurla, Mumbai या नावाने दिनांक १४.०९.२००९ रोजी या वक्फ संस्थेची नोंदणी करण्यांत आलेली आहे.

सदर वक्फ संस्थेबाबत दाखल झलेली योजना व त्यावरील आक्षेप हे भिन्न स्वरुपाचे असून त्याबाबत सर्वसमावेशकपणे एकत्रित विचार करणे क्रमप्राप्त आहे, या वक्फ संस्थेची धर्मदाय आयूक्ताकडील मुळ कागदपत्रे विचारात घेवून या संस्थेशी संबंधित आपआपसातील वाद व संघर्ष टाळण्यासाठी प्रादेशिक वक्फ अधिकारी, मुंबई यांना वकिलाच्या मदतीने या वक्फ संस्थेच्या परिसरातील रहिवाशांमधुन निवडणुकीने व्यवस्थापकीय समितीच्या ११ सदस्यांची प्रथमत: निवड करण्याबाबत आदेश देण्यांत यावेत. व्यवस्थापकीय समितीची निवड झाल्यानंतर यास समितीने या वक्फ संस्थेच्या धर्मादाय आयुक्तांकडे असलेल्या दस्तऐवजा मधील उद्दिष्टांशी सुसंगत अशी व्यवस्थापन योजना ३ महिन्याच्या आंत महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे सादर करावी. त्यावर वक्फ मंडळाने विहित कार्यपध्दतीनुसार व्यवस्थापन योजना मंजूर करण्याबाबत कार्यवाही करावी. अशी योजना तयार करतांना महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडील आदर्श योजना (Model scheme) चा आधार घेण्यांत यावा.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक १५:-

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर
वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/८४/२०१६

मोहंमद हनीफ मोहम्मद शाफी शेख
रा.कादिवली पूर्व मुंबई ----- अर्जदार

विरूध्द

महेमुद खूर्शीद खान
रा. अक्रोली रोड, कांदेवली पूर्व, मुंबई

----- गैरअर्जदार

प्रकरण - आझाद हिंद इत्तेहादूल मुसलिमिन कमेटी अक्रोली रोड कांदेवली मुंबईच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र. MSBW/एमयूएम/८०/२००८

प्रारंभिक - (विवेचन)

आझाद हिंद इत्तेहादूल मुसलिमिन कमेटी, अक्रोली रोड, कांदेवली, मुंबइ ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBWएमयूएम/८०/२००८असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देणे करिता अर्जादार मोहंमद हनीफ मोहम्मद शाफी शेख रा.कादेंवली पूर्व मुंबई यांनी दिनांक १२.२.२०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्य कडे अर्ज सादर केलेला आहे.

तसेच सदर वक्फ संस्थेच्या दूसरा प्रस्तावीत योजनाअर्ज श्री महेमुद खूर्शीद खान व इतर रा. अक्रोली रोड, कांदिवली, मुंबई यांनी दिनांक १७..५.२०१६ रोजी वक्फ कार्यालयात मंजूरीसाठी दाखल केले आहे.

सदर प्रकरणासंबंधी अर्जदारांनी सर्व कागदपत्राची पुर्तता केली आहे अर्जदारांनी सादर केलेल्या अर्जाची पडताळणी करण्यात आली आहे.

सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -

या कर्यालयाचे पत्र जा.क्र.मरावंम/चौकशी/६४४२/२१ दिनांक ४/१०९/२०२१ अन्वये दि.०८/१०/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली . सूनावणीमध्ये मोहंमद हनीफ मोहंमद शफी हे हजर होते तसेच ॲड. आता मुजतबा हे मोहंमद खूशीर्दखान यांच्या करिता हजर होते. तसेच त्यांनी पत्रासोबत काही कागदपत्र हजर केले. सर्व पक्षकारांना आदेशित करणेत आले की त्यांनी त्यांचा लेखी

यूक्तीवाद ३१.१०.२०२१ पूर्वी सादर करावा.. प्रकरण आदेशाकरिता प्रलंबित ठेवून तसेच पक्षकारांना निर्देश् देण्यांत आले की आदेश त्यांना कळविण्यांत येईल.

अर्जदाराचा युक्तीवाद :-

अर्जदाराने असे कथन केले आहे की या पूर्वी सदर संस्थेची कोणतीही योजना मंजूर झालेली नाही करिता त्यांनी नवीन योजना दाखल केलेली आहे ती मंजूर करणेत यावी.

गैरअर्जदार (हरकतदार यांचा युक्तीवाद) -

हरकतदार गैरअर्जदार यांनी असे कथन केले आहे की, हरकतदार हे सध्या मॅनेजिंग कमेटीचे मेंबर आहे तसेच ते नियमानूसार निवडणूकीतून निवडून आलेले आहे तसेच त्यांनी फेर अर्ज देखील दाखल केलेला आहे . त्यांनी अर्जदारानी दाखल केलेल्या योजनेस आक्षेप घेतलेला आहे व कथन केले आहे की मोहंमद हनीफ यांनी वक्फ मिळकत हडप करणेकरिता योजना दाखल केलेली आहे. त्यांना योजना दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही सबब त्यांचा योजनेचा अर्ज रदद करणेत यावा. तसेच अर्जदार हे संस्थेशी निगडीत नाही तसेच निवडून आलेले नाही.तसेच त्यांनी योजनेमध्ये कोणत्या आधार योजना दाखल केलेली आहे त्याबाबत काहीही कथन केलेले नाही. सबब त्यांचा अर्ज रदद करण्यात यावा. तसेच शफी यांच्या भांवाचे दाऊद इब्रहीमचे साथीदार सायमनशी संबंध आहे तसेच हनीफ यांचे विरूध्द चॅप्टर गून्हे नोंद आहे तसेच हनीफ यांनी संस्थेस वेळोवेळी त्रास देवून मस्जिद पाडण्यासाठी प्रयत्न करूनही त्यात त्यांना यश न मिळाल्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयामध्ये पीआयएल दाखल कलेली आहे सबब ते गून्हेगारी पार्श्वभूमी असलेले असल्याने त्यांचा अर्ज रदद करावा.

गैरअर्जदार श्री महेमुद खूर्शीदखान यांची योजना बददल यूक्तीवाद:

श्री महेमुद खूर्शीदखान यांना दिनांक १७.५.२०१६ रोजी योजना दाखल करून असे कथन केले आहे की, संस्थेच्या उज्वल भवितव्यासाठी तसेच उत्तम प्रगती करिता व उत्तम व्यवस्थापनासाठी त्यांचा योजनेचा अर्ज मंजूर करावा. तसेच सदर वक्फ संस्थेचे ते अनूयायी असून नेहमी त्या ठिकाणी नमाज अदा करतात तसेच ते ट्रस्ट चे अध्यक्ष असून वक्फ संस्थेचे उ-तम रित्या मॅनेज करतात. तरी त्यांचा अर्ज मंजूर व्हावा.

ठराव क्रमांक १५:- उपरोक्त प्रकरणी खालील प्रमाणे एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

अर्जदार, गैरअर्जदार यांनी दाखल केलेले सर्व लेखी युक्तीवाद तसेच तोंडी युक्तीवाद व संचिकेतील कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केल्यानंतर असे स्पष्ट होते की, मुस्लीम समाजाच्या सदस्यामधून मुतवल्ली/व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या नेमणूकी करिता धर्मादाय आयूक्त यांच्या अनुसूचि-१ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची निवड ही मतदान पध्दतीने होणे आवश्यक आहें, अशप्रकारे निवड पध्दतीचे व्यवस्थापकीय मंडळ अस्तित्वात आले तर कोणाचाही आक्षेप असणार नाही. पारदर्शक व सर्वसमावेशक पध्दतीने या बाबत कार्यवाही करण्यांत येईल. त्यानुसार खालील प्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

प्रादेशिक वक्फ अधिकारी, मुंबई यांनी वकिलाची नियुक्ती करुन निवडणूक प्रक्रिया योग्य त-हेने पारदर्शक पध्दतीने पार पाडावी जेणे करून कोणासही कोणत्याही प्रकारची हरकत घ्यायला वाव मिळू नये. निवडणूकी प्रक्रियेसाठी आवश्यक सर्व बाबी पूर्ण कराव्यात, संबंधितांना नोटीसा देणे त्यांची पोहोच घेणे व तत्सम बाबी ज्याचा नंतर उहापोह होण्याची शक्यता आहे त्या सर्व बाबी पूर्ण कराव्यात. तसेच निवडणूकी सबंधी गांवात व सार्वजनिक ठिकाणी तसेच नोटीस बोर्डावर मतदानाबाबत प्रसिध्दी द्यावी

तसेच जे कोणी इच्छूक असतील ते व पुर्वीचे समिती सदस्य व हरकतदार तसेच अर्जदार या सर्वांना निवडणूक/मतदानाच्या नोटीसा दयाव्यात, तसेच सर्व मोक्याच्या ठिकाणी मतदानाबाबत नोटीसा डकवाव्यात व नोटीसा डकवले बाबत तसा संबंधितांचा अहवाल घ्यावा व सर्व कागदपत्राची पूर्तता करून तसे रेकॉर्ड तयार करावे.

निवडणूक प्रक्रिया पुर्ण झाल्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे अहवाल सादर करावा. सदरील वक्फ अधिकाऱ्यांचा आहवाल प्राप्त झाल्यानंतर निवडून आलेल्या सदस्यामधून व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी मॉडेल स्कीम प्रमाणे सदर वक्फच्या व्यवस्थापनासाठी सर्वसमावेशक योजना सादर करणेबाबत त्यांना आदेशित करणेत येवून ३ महिन्यामध्ये सदरील सर्वसमावेशक योजना सादर करणेबाबत कळविण्यात यावे. सदरील योजना प्राप्त झाल्यानंतर योजना मंजूरी बाबत वक्फ मंडळाकडून स्वतंत्र कार्यवाही करणेत येईल.

या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

(नोंदणी विभाग)

विषय क्रमांक १६:- वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार नोंदणी प्रस्तावांना मान्यता देणे बाबत.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या नोंदणीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकूण (२८) प्रस्तावांची यादी खालील प्रमाणे आहे. प्रस्तावांच्या छाननीची कार्यवाही सतत सूरूअसून बैठकीच्या प्रत्यक्ष दिनांकापर्यंत आणखी जेवढे प्रस्ताव परिपूर्ण आढळून येतील, त्या सर्व प्रस्तावांची पुरवणी यादी वक्फ मंडळाच्या बैठकी पुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

Statement showing the list of registration u/s 36 of the Waqf Act 1995 proposal for final approval of the Board.

Sr. No.	File No.	Name of Waqf Instituion	Address	Village	Taluka	District	If Any case pending in the court Yes /No	Any court order Yes/No
1	ABD/161/2014	Masjid E Ismail	At Satara	Aurangabad	Aurangabad	Aurangabad	No	No
2	ABD/829/2018	Noorani Masjid	At Post Biloni	Biloni	Vaijapur	Aurangabad	No	No
3	ABD/54/2019	Muslim Kabrastan	Gutt No 43, Biloni	Biloni	Vaijapur	Aurangabad	No	No
4	ABD/101/2021	Masjid E Abu Bakar Maktar Madarsa	At Nanegaon	Sillod	Sillod	Aurangabad	No	No
5	ABD/730/2018	Madina Masjid	Near Bus Stand	Bidkin	Paithan	Aurangabad	No	No
6	BED/510/2019	Madarsa Omar Bin Khattab, Taalim -Ul-	Somthana	Somthana	Majalgaon	Beed	No	No

		Quran Masjid Sohaba						
7	PBN/52/2019	Iddgah	At Gaur	Gaur	Purna	Parbhani	No	No
8	HNG/508/2019	Jama Masjid	At.Warkheda	Warkheda	Sengaon	Hingoli	No	No
9	HNG/119/2020	Mohammadiya Arbi Madarsa Wo Masjid	Kendra Bk.	Kendra Bk.	Sengaon	Hingoli	No	No
10	MUM/19/2021	Noor -E-Mohammadi Madarsa and Masjid	At Gokhle Road, Plot No.240	Vile parle (e)	Mumbai	Mumbai	No	No
11	RTG/274/2018	Adyaksha Jama Masjid Nivsar Mala	At Nivsar	Nivasar	Lanja	Ratnagiri	No	No
12	NSK/256/2021	Khankah Peer Mohammed Wakf and Idgah		Manoor	Kalwan	Nashik	No	No
13	NSK/277/2021	Hazrat Sayed Baba Dargah	Bagwan pura	Nashik	Nashik	Nashik	No	No
14	NSK/353/2021	Fakir Inam Deosthan, At. G.No. 91, Lohoner, Tq. Deola, Dist. Nashik		Deola	Deola	Nashik	No	No
15	NSK/92/2021	Masjid -o-Madarsa Fatima Atiya Daregaon	P.No. 29, Daregaon,	Daregaon	Malegaon	Nashik	No	No
16	ADR/110/2018	Ahle Sunnat Wal Jamat Karbala Masjid Muslim Jamat Panch Committee	Haldi Mohalla	Baragaon-Nandur	Rahuri	Ahmed nagar	No	No
17	ADR/475/2017	Masjid	Loni khurd	Loni Khurd	Rahta	Ahmed nagar	No	No
18	PUN/16/2016	Masjid-A-Kuba	S. No. 15/3/A/6, Plot No. 38, Sainagar,Dehu Road	Mamurdi	Haveli	Pune	No	No
19	SLR/143/2018	Dawal Malik Dargah	Situated at Old Survey No. 382	Boramani	S.Solapur	Solapur	No	No
20	SLR/183/2021	Millat Arbi Madarsa Wa Masjid Trust	260 Muslim Pacha Peth	Solapur	Solapur	Solapur	No	No
21	SLR/29/2021	Noman Bin Sabit (Rah.) Masjid Va Arbi Madarasa	1385 A, Garibi Hatav Zopadpatti No. 02, Vijapur Road	Solapur	Solapur	Solapur	No	No

22	SLR/243/2021	Imam Tirmizi Ahle Hadees Arbi Madarsa Va Masjid	Plot No. 31, Patil Nagar	Majrewadi	Solapur	Solapur	No	No
23	SLR/242/2021	Imam Bukhari Ahle Hadees Arbi Madarsa Va Masjid	Plot No. 244 B, 245, Swagat Nagar, Part 2	Majrewadi	Solapur	Solapur	No	No
24	KPR/515/2019	Samast Muslim Samaj Sunni Raza Masjid	At.Bandarwadi	Tekoli	Shahuwadi	Kolhapur	No	No
25	AKL/274/2020	Masjid Rabiya and Madarsa	Plot No 173/19, sheet no. 38	Akot	Akot	Akola	No	No
26	BLD/170/2019	Jama Masjid	At post Rajur	Rajur	Motala	Buldhana	No	No
27	WSM/667/2018	Nagina Masjid Lawana	At Lawana, Dabha	Lawna	Mangrulpir	Washim	No	No
28	WSM/612/2019	Makka Masjid wo Madrasa	Gowlipura, Ward No.2	Mangrulpir	Mangrulpir	Washim	No	No

वरील प्रकरणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासली असून मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत.

(अनिस शेख)
मुख्य कार्यकारी अधिकारी

ठराव क्रमांक १६:-

अ) वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार उपरोक्त एकुण (२८) नोंदणी च्या प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असुन उपरोक्त (२८) नोंदणीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात येत आहे. या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

ब) अंजुमन ए इस्लाम अब्दुल करीम चॅरिटेबल भोस चॅरिटी ट्रस्ट मुंबई, या वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ४३ मधील तरतुदीनुसार मानिव नोंदणी असलेल्या ट्रस्टची वक्फ अधिनियमाखाली करण्यात आलेली नोंदणी रद्द करण्या बाबत दि. २५/१२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावावर पुर्नविचार करण्यात येवुन सदर वक्फ संस्थेची नोंदणी रद्द करण्यात येवु नये व ही नोंदणी कायम ठेवण्याबाबत एकमताने ठराव मंजूर करण्यात आला.

(चौकशी विभाग)

विषय क्रमांक. १७: -

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९(ए) नुसार योजना मंजूरीसाठीच्या प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फ संस्थांच्या योजना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकूण (०९) प्रस्तावांची यादी खालील प्रमाणे आहे. प्रस्तावांच्या छाननीची कार्यवाही सतत सूरू असून बैठकीच्या प्रत्यक्ष दिनांकापर्यंत आणखी जेवढे प्रस्ताव परिपूर्ण आढळून येतील, त्या सर्व प्रस्तावांची पुरवणी यादी वक्फ मंडळाच्या बैठकी पुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

Sr. No.	File No	District	Name of Institution	If Any case pending in the court Yes /No	Any court order Yes/No

1.	69/102/2015	Nashik	Daxini Musalman Punchache Kabrastan Malegaon, Tq. Malegaon, Dist. Nashik	No	No
2.	69/103/2015	Nashik	Dakshini Musalman Lokanche Kabrastan at CTS No. 1494C, Islampura Ward, Malegaon, Tq. Malegaon, Dist. Nashik	No	No
3.	69/70/2019	Jalna	Masjid, Station Jalna	No	No
4.	69/116/2019	Jalna	Masjid, Palaskheda, Tq. Bhokardan, Dist. Jalna	No	No
5.	69/31/2021	Latur	Idgah and Kabrastan, Bamni, Tq. & Dist. Latur	No	No
6.	69/342/2021	Ahmednagar	Jama Masjid Ahle Sunnat wal Jamat Kabrastan Eidgah & Muslim Panch Committee Village. At Baragaon Nandur, Tq. Rahuri, Dist. Ahmednagar	No	No
7.	69/337/2020	Beed	Masjid Munde ki and Graveyard, Ambajogai, Tq. Ambajogai, Dist. Beed	No	No
8.	69/02/2021	Yeotmal	Anjuman Islam Committee Jama Masjid, Ghatanji, Tq. Ghatanji, Dist. Yeotmal	No	No
9.	69/65/2021	Pune	Pir pait Pir Gaibi Dargah, Chakan, Tq. Khed, Dist. Pune	No	No
10.	69/73/2018	Aurangabad	Masjid E Tuba and Arbi Madarsa, at Priyadarshan Colony, Padegaon, Aurangabad	No	No
11.	69/408/2021	Aurangabad	Masjid, at Yesgaon, Tq. Khuldabad Dist Aurangabad	No	No
12.	69/409/2021	Aurangabad	Masjid and Idgah, at Yesgaon Tq. Khuldabad Dist Aurangabad	No	No

वरील प्रकरणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासली असून मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत.

(अनिस शेख)
मुख्य कार्यकारी अधिकारी

ठराव क्रमांक १७:-

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार उपरोक्त एकुण (१२) योजना च्या प्रस्तावांची तपासणी करण्यात आली आहे उपरोक्त (१२) योजनांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात येत आहे. या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

विषय क्रमांक. १८: -वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्रस्तावांना मान्यता देणेबाबत.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार राज्यात अस्तित्वात असलेल्या वक्फा संस्थांच्या बदलाबाबत प्रस्तावांना मंजूरीच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करण्यात येऊन सर्व बाबीची पुर्तता करणा-या एकूण (०७) प्रस्तावांची यादी खालील प्रमाणे आहे. प्रस्तावांच्या छाननीची कार्यवाही सतत सूरू असून बैठकीच्या प्रत्यक्ष दिनांका पर्यंत आणखी जेवढे प्रस्ताव परिपूर्ण आढळून येतील, त्या सर्व प्रस्तावांची पुरवणी यादी वक्फ मंडळाच्या बैठकी पुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल.

Sr. No.	File No	District	Name of Institution	If Any case pending in the court Yes /No	Any court order Yes/No
1.	42/769/2015	Jalgaon	Razzakiya Masjid v.o. Dhar, Tq. Amalner, Dist. Jalgaon	No	No
2.	42/128/2021	Jalgaon	Abbasiya Masjid, At Baherpura, Tq. Amalner, Dist. Jalgaon	No	No
3.	42/192/2021	Thane	Jumma Masjid, Nizampur, Village. Bhiwandi, Tq. Bhiwandi, Dist. Thane	No	No
4.	42/308/2021	Thane	Airola Masjid E Aqsa Trust, At Plot No. 21, Sectar 17, Airola,		

			Navi Mumbai, Tq. Navi Mumbai, Dist. Thane		
5.	42/451/2016 42/336/2017	Palghar	Jumma Masjid Trust, Vasai, Tq. Vasai, Dist. Palghar	No	No
6.	42/528/2018	Pune	Pait Masjid Deosthan, Village. Pait, Tq. Khed, Dist. Pune	No	No
7.	42/496/2021	Kolhapur	Sarwajanik Masjid, Vathar Tarf Vadgaon, Tq. Hatkanagale, Dist. Kolhapur	No	No
8.	42/151/2021	Solapur	Anjuman Islahul Muslimeen, Thergaon, Tq. Dist Solapur	No	No
9.	42/543/2014	Amravati	Idgah, Masjid Talegaon Mohna, Tq. Chandur Bazar, Dist Amravati	No	No

वरील प्रकरणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासली असून मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत.

(अनिस शेख)
मुख्य कार्यकारी अधिकारी

ठराव क्रमांक. १८: -

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार व्यवस्थापन बदलाबाबत प्राप्त झालेल्या उपरोक्त (०९) प्रस्तावांची तपासणी करण्यात आली असून उपरोक्त (०९) प्रस्तावांना मान्यता देण्यात येत आहे. या बाबतचे आदेश, प्रस्तूत बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता, निर्गमित करण्यात यावेत.

(सियानत विभाग)

(दि. २५/१२/२०२१ च्या बैठकीत पुढे ढकलण्यात आलेली विषय)

विषय क्रमांक. १९: - काली मस्जीद आणि सराय मीर आलम, जालनाशी संबंधित मिळकत मधील अंजुमन इशाते तालीम, जालना या शैक्षणिक संस्थेच्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण करणे बाबत.

काली मस्जीद जालनाच्या मालकीच्या CTS No. ७४११ क्षेत्र ३००x३०० फुट (९०,००० चौ.फुट) म्हणजे ८३६१.२७ चौ.मि. जागा तसेच सराय मीर आलम या वक्फ संस्थेच्या मालकीच्या CTS No.७४०६ क्षेत्र १५०x९०० फुट (१३५००० चौ.फुट) म्हणजे १२५४१.९१ चौ.मि. जागा अंजुमन इशाते तालीम, जालना या शिक्षण संस्थेस वर्ष १९६७ मध्ये ५१ वर्षासाठी मासिक भाडे नाममात्र १/- रुपया प्रमाणे भाडेपट्टावर देण्यात आली होती. सन २०१० मध्ये त्यांना नवीन दराने भाडेकरार करण्यास नोटीस देण्यात आली होती परंतु त्यांनी नव्याने करार केलेला नाही. सन २०१२ मध्ये शिक्षण संस्थेने स्थानिक विकास निधीतून क्लास रुम बांधकाम परवानगी मिळणेस विनंती केली होती या कार्यालयाने त्यांना दि.२८/०६/२०१२ रोजी आदेश देवून प्रती चौ.फुट ५० पैसे प्रमाणे भाडे आकारुन ना हरकत प्रमाणपत्र दिले होते परंतु त्यांनी त्या प्रमाणेही करार केलेला नाही. सदर प्रकरणांत सय्यद लतिफोद्दिन, यांनी दि.२/४/२०१२ रोजी आक्षेप दाखल केला होता त्यावर दि.१२/०९/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती परंतु त्यावर कोणताही निर्णय झाला नाही. सध्या श्री. सय्यद लतिफोद्दिन यांचा कोरोनामुळे निधन झालेला आहे.

अंजुमन इशात-ए-तालीम चे सचिव यांनी माहे एप्रिल १९९७ ते मार्च २००७ पर्यंत वार्षीक भाडे १८००/- प्रमाणे १८०००/- रुपये दि.१९/१/२००७ अन्वये भरणा केले आहे तसेच माहे एप्रिल २००७ ते माहे मार्च २०१४ पर्यंत मासिक भाडे रुपये ६००/- प्रमाणे एकुण रक्कम ५०४००/- रुपये दि.२९/०७/२०१९ रोजी भरणा केले आहे तसेच माहे एप्रिल २०१४ ते डिसेंबर २०२० पर्यंत मासिक भाडे रुपये ६००/- प्रमाणे एकुण

रक्कम ४८,०००/- रुपये भरणा केला आहे. ही रक्कम फार कमी आहे माहे जुन २०१४ नंतर त्यांच्याकडून नवीन दराने भाडे वसुल करणे आवश्यक आहे.

वर नमुद वक्फ मिळकतीचे सन २०१४ करीता बाजार मुल्यांनाचे ५% दराने तसेच सन २०१५ ते २०१९ करीता सुधारीत नियमानुसार बाजार मुल्यांकनाचे २% दराने तसेच वर्ष २०२० ते २०२१ साठी सुधारीत नियमानुसार बाजार मुल्यांकनाचे १% दराने वार्षीक भाडे खालील प्रमाणे होत आहे.

वर्ष	शैक्षणिक संस्थेडून भाडे वसुल करण्यासाठी बाजार मुल्यांकना प्रमाणे आरक्षित किंमत	बाजार मुल्य दरपत्रक प्रति चौरस मिटरचे दर	CTS No. ७४११ क्षेत्र ३००x३०० फुट (९०,००० चौ.फुट) म्हणजे ८३६१.२७ चौ.मि. च्या वार्षीक भाडे (१)	CTS No.७४०६ क्षेत्र १५०x९०० फुट (१३५००० चौ.फुट) म्हणजे १२५४१.९१ चौ.मि. च्या वार्षीक भाडे (२)	एकुण वार्षीक भाडे
२०१४	दि.३/६/२०१४ पासून लिज रुल्स लागु झाले त्यामधील तरतुदीनुसार माहे जुन ते डिसेंबर २०१४ पर्यंत बाजार मुल्यांकनाचे ५% प्रमाणे वार्षीक भाडे वसुली	५२००	रु.१२,६८,१२७ (७ महिन्याची रक्कम)	रु.१९,०२,१८७ (७ महिन्याची रक्कम)	रु.३१,७०,३१४ (७ महिन्याची रक्कम)
२०१५	माहे जानेवारी ते जुलै २०१५ पर्यंत मुल्यांकनाचे ५% प्रमाणे वार्षीक भाडे वसुली	५७००	रु.१३,९०,०६० (७ महिन्याची रक्कम)	रु.२०,८५,०९० (७ महिन्याची रक्कम)	रु.३४,७५,१५० (७ महिन्याची रक्कम)
२०१५	दि.२५/०८/२०१५ पासून लिज रुल्स मध्ये सुधारणा करण्यात आली त्यानुसार माहे ऑगस्ट २०१५ ते डिसेंबर २०१५ पर्यंत बाजार मुल्यांकनाचे सुधारीत दर २% प्रमाणे वार्षीक भाडे वसुली	५७००	रु.९,५३,१८५ (५ महिन्याची रक्कम)	रु.१४,२९,७७८ (५ महिन्याची रक्कम)	रु.२३,८२,९६३ (५ महिन्याची रक्कम)
२०१६	२%	६१००	रु.१०,२०,०७४	रु.१५,३०,११३	रु.२५,५०,१८७
२०१७	२%	६५५०	रु.१०,९५,३२६	रु.१६,४२,९९०	रु.२७,३८,३१६
२०१८	२%	६५५०	रु.१०,९५,३२६	रु.१६,४२,९९०	रु.२७,३८,३१६
२०१९	२%	६५५०	रु.१०,९५,३२६	रु.१६,४२,९९०	रु.२७,३८,३१६
२०२०	२%	६९००	रु.९६,१५४ (१ महिन्याची रक्कम)	रु.१,४४,२३२ (१ महिन्याची रक्कम)	रु.२,४०,३८६ (१ महिन्याची रक्कम)
२०२०	दि.१८/०२/२०२०	६९००	रु.५,२८,८५१	रु.७,९३,२७६	रु.१३,२२,१२७

	पासून लिज रुल्स मध्ये सुधारणा करण्यात आली त्यानुसार माहे फरवरी ते डिसेंबर २०२० पर्यंत बाजार मुल्यांकनाचे सुधारीत दर १% प्रमाणे वार्षीक भाडे वसुली		(११ महिन्याची रक्कम)	(११ महिन्याची रक्कम)	(११ महिन्याची रक्कम)
२०२१	१%	६९००	रु.५,७६,९२७	रु.८,६५,३९२	रु.१४,४२,३१९
			९११९३५६	१,३६,७९,०३८	**२,२७,९८,३९४**

सन २०१४ ते २०२१ पर्यंत वर नमुद बाजार मुल्यांकनानुसार वार्षीक भाडेची एकुण रक्कम रु.२,२७,९८,३९४/- (दोन कोटी सत्तावीस लाख अठ्ठयानऊ हजार तीनशे चौ-यान्वे) अंजुमन इशात-ए-तालीम, जालना या शिक्षण संस्थेकडून वसुल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रकरणात गैरअर्जदार श्री. फहीमुद्दिन देशमुख, सचिव, हुमेरा देशमुख वेलफेअर सोसायटी, सादीक किराणा स्टोअर जवळ, तेलूगु नगर, बुलडाणा यांनी दि.६/९/२०२१ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, त्यांना जालना येथे मुस्लीम अल्पसंख्याक समाजाचे विद्यार्थ्यांसाठी शाळा, कॉलेज व आय.टी.आय सुरु करावयाचे आहे तसेच मुस्लीम अल्पसंख्याक समाजाचे मतीमंद मूकबधीर आणि अंध विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा सुरु करावयाची आहे. त्यासाठी जालना येथील अंजुमन इशात-ए-तालीम या शिक्षण संस्थेस वक्फ मंडळाने लिजवर दिलेली जागा त्यांना ३० वर्षासाठी भाडेपट्टयावर देण्याची विनंती केली आहे त्यासाठी दरमहा रु.२,००,०००/- (अक्षरी दोन लाख) भाडे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळास देण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे.

वर नमुद प्रकरणांत अंजुमन इशात-ए-तालीम, जालना या शिक्षण संस्थेस काली मस्जीद जालनाच्या संबंधित जागा ५१ वर्षासाठी भाडेपट्टयावर देण्यात आली होती सदर भाडेपट्टाकराराची ५१ वर्षाची मुदत दि.१४/०९/२०१८ रोजी संपुष्टात आलेली असून पुढील ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्टयाचे नुतनीकरण करण्याची विनंती अर्जदार शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. मोहम्मदं बद्रोद्दिन यांनी केली होती परंतु दि.०५/०५/२०२१ रोजी त्यांचा निधन झाल्याने त्यांचे मृत्यूप्रमाणपत्र जोडून सध्याचे सचिव श्री.मोहम्मद इफतेखारोद्दिन यांनी दि.८/६/२०२१ व दि.१६/६/२०२१ रोजी अर्ज देवून भाडेपट्टाकराराचे नुतनीकरण त्यांचे नावाने करण्याची विनंती केली आहे.

सदरील प्रकरणात थकीत भाडे वसुल करण्यासाठी अंजुमन इशात-ए-तालीम, जालना यांना नोटीस देण्यात आली आहे त्यांच्याकडून भाडेची रक्कम प्राप्त झाल्यावर वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ मध्ये सन २०१५ व २०२० मध्ये करण्यांत आलेल्या सुधारीत नियमानुसार पुढील प्रक्रिया करता येईल.

जर अंजुमन इशात-ए-तालीम, जालना यांनी थकीत भाडेची रक्कम जमा न केल्यास त्यांच्याविरुध्द वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५४ नुसार अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येत आहे. तसेच रक्कम वसुलीसाठी कायदयातील तरतुदीनुसार कार्यवाही अपेक्षीत आहे. सदरील जागा वक्फ मंडळाने ताब्यात घेतल्यानंतर वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ मधील नियम ५ नुसार एक राष्ट्रीय व स्थानीय दैनिक वृत्तपत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द करुन जागा भाडेपट्टयावर देण्यासाठी बोली अर्ज मागविणे सुलभ होईल. दुसरा पर्याय, गैरअर्जदार श्री. फहीमुद्दिन देशमुख, सचिव, हुमेरा देशमुख वेलफेअर सोसायटी, सादीक किराणा स्टोअर जवळ, तेलूगु नगर, बुलडाणा हे वक्फ लिज रुल्स, २०१४ मधील तरतुदींनुसार व दराने सन २०१४ पासून

भाडे भरण्यास तयार असतील तर सदर नियमांतील तरतुदींनुसार, त्यांना सन २०१६ ते सन २०२६ या दहा वर्षाच्या कालावधीसाठी निविदा न मागविता भाडेपट्ट्यावर जागा देता येईल.

सदरचा विषय वक्फ मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक :- १९ सदर प्रकरणात वक्फ मंडळापुढे सुनावणी ठेवण्यात यावी असा ठराव एकमताने मंजुर करण्यात आला.

विषय क्रमांक:-२० दर्गाह हजरत कादर औलिया, जाफर गेट, मोंढा, औरंगाबाद च्या संबंधित मिळकत मधील पेट्रोलपंपचा भाडेपट्टा नुतनीकरण करणे बाबत.

दर्गाह हजरत कादर औलिया, जाफर गेट, मोंढा, औरंगाबाद ची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि. १७/०५/१९७३ भाग-क च्या अनुक्रमांक ३७ वर असुन वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३६ नुसार क्र. MSBW/ABD/६५४/२०१४ दि. १८/०९/२०१४ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे.

सदरील वक्फ संस्थेच्या संबंधित वक्फ मालमत्ता क्र. ८३९० एकुण क्षेत्र ७९५८.८ चौ.मि. पैकी क्षेत्र ४०x७० फुट म्हणजे २६०.२३ चौ.मि. जागा वर्ष १९४३ मध्ये श्रीमती हुसैनी बेगम यांनी २० वर्षाच्या करारावर इंडो बरमा पेट्रोलियम कंपनी लि. बॉम्बे यांना भाडेतत्वावर दिली होती सध्या त्या ठिकाणी मे. अशोक ब्रदर्स पेट्रोलपंप असून वेळोवेळी त्याचे भाडे नुतनीकरण केलेले आहे अंतिम भाडेपट्टा २० वर्षासाठी त्यांनी दि.१/२/१९८३ रोजी रजिस्ट्रर्ड भाडेपट्टा क्र. ३६३ अन्वये प्रतिमहा रुपये २५०/- प्रमाणे केलेला आहे त्याची मुदत वर्ष २००३ मध्ये संपलेली आहे. परंतु त्याच वर्षी श्रीमती हुसैनी बेगम यांचे निधन झाल्यामुळे पुढील भाडेपट्टाचे नुतनीकरण झाले नाही.

उपरोक्त वक्फ संस्था व या संस्थेच्या मालमत्ताची देखरेख श्री. कादर पाशा, स्वंयघोषित मुतवल्ली हे करत होते परंतु मागील दोन तीन वर्षापासून सदर दर्गाहचे वार्षीक संदल व उर्स वक्फ मंडळातर्फे करण्यांत येत आहे. तसेच वक्फ मंडळाचे अतियात विभागा मार्फत संबंधित स्वंयघोषीत मुतवल्ली यांना नोटीस देवून वक्फ मालमत्तेचे दुरुपयोग करणे, जागा भाडेवर देवून भाडे वसूल करणे, दर्गाह मध्ये येणा-या भाविकांशी दुरव्यवहार करणे, वार्षीक हिशोब सादर न करणे, लेखा परिक्षण अहवाल न देणे, वक्फ फंड न भरणे, मुतवल्लीचे आदेश नसतांना वक्फ संस्थेची मालमत्तावर काबीज होणे या बाबत विचारणा केलेली आहे. परंतु त्याचे उत्तर न मिळाल्याने सदर वक्फ संस्था व त्याचे मिळकतीचे सर्व्हेक्षण करण्यासाठी वक्फ अधिकारी (NAWADCO) यांना सुचना देण्यात आली असून वक्फ संस्था व त्याची मालमत्ता मंडळाचे ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु असल्याचे जिल्हा वक्फ अधिकारी यांनी दि.११/२/२०२० च्या अहवालात नमुद केले आहे. स्वंयघोषीत मुतवल्ली श्री. कादर पाशा, यांचे दि.२९/९/२०२१ रोजी निधन झाले आहे.

अर्जदार शेख मुनीर चौधरी रा. औरंगाबाद यांनी दि. ९/११/२०२० रोजी अर्ज देवून विनंती केली की, दर्गाह हजरत कादर औलियाचे मुतवल्ली कडून त्यांनी ४०x७० फुट जागा मासिक भाडे रुपये २५०/- प्रमाणे घेतली होती वर्ष २००३ पासुन थकीत भाडेची संपुर्ण रक्कम मासिक भाडे रुपये १०००/- प्रमाणे भरण्यास त्यांनी तयारी दर्शवली होती व त्यानंतर माहे जानेवारी २००३ ते माहे में, २०१४ पर्यंतचे थकीत भाडे प्रतिमाह रुपये २०००/- प्रमाणे वक्फ मंडळाने भरुन घेणे बाबत दि.१८/१२/२०२० रोजी अर्ज दिला होता.

या कार्यालयाचे पत्र क्र. मरावमं/एसएनटी-३१२/४७७०/२०२० दि.१८/१२/२०२० अन्वये जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांनी माहे जानेवारी २००३ ते माहे में, २०१४ पर्यंत एकुण (१३७) महिण्याची भाडेची रक्कम प्रतिमाह रुपये २०००/- प्रमाणे रु.२,७४,०००/- पावती क्र.३१०२४ दि.१८/०१/२०२१ अन्वये शेख मुनीर चौधरी यांच्याकडून वसुल केले आहे. वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार

वाणिज्यिक वापराकरीता बाजार मुल्यांकनाचे २.५% दराने पुढील कालावधीकरीता भाडे निश्चित करण्यासाठी बाजार मुल्यांकन प्रमाणपत्र सादर करणे तसेच पेट्रोलपंपचा १० वर्ष कालावधीचा भाडेपट्टा प्रस्ताव सादर करणे बाबत जिल्हा वक्फ अधिकारी औरंगाबाद यांना सुचना देण्यात आली आहे.

उपरोक्त प्रकरणात श्री. शेख मुनीर शेख मुन्नु चौधरी यांनी दि.२२/९/२०२१ रोजी अर्ज देवून जाफर गेट, औरंगाबाद येथील वक्फ मिळकत सिटीएस क्र. ८३९० शिट क्र.७६/७७ चालता नं.४० मु.नं.४-६-१६१, क्षेत्र २१.३३x१२.२० (२६०.२३ चौरस मिटर) जागा (पेट्रोल पंप) पुढील १० वर्षासाठी सन २०२० ते २०३० या कालावधीकरीता भाडेपट्टयावर मिळणेस विनंती केली आहे.

अर्जदार यांच्याकडून सन २०१४ ते २०२० पर्यंतचे थकीत भाडे बाजार मुल्यांकन प्रमाणे वसुल करुन वक्फ लिज रुल्स, २०१४ मधील तरतुदींनुसार सन २०१६ च्या पुढील १० वर्षाच्या कालावधीकरिता, म्हणजेच सन २०१६ ते २०२६ पर्यंत १० वर्षासाठी निविदा न मागविता भाडेपट्टयाचे नुतनीकरण वक्फ मंडळाची मान्यतेने व शासनाच्या मंजुरीने करता येईल.

वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ दि.३/६/२०१४ पासून लागु करण्यात आले आहे त्या मधील तरतुदीनुसार वक्फ मिळकतीचे बाजार मुल्यांकनाचे ५% प्रमाणे वार्षीक भाडे वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार वक्फ मिळकत क्षेत्र २६०.२३ चौ.मि. जागाचे वार्षीक भाडे रु.३,५१,३१०/- आणि मासिक भाडे रु.२९,२७६/- इतके आहे. अर्जदाराकडून माहे मे, २०१४ पर्यंत भाडे वसुल करण्यात आले आहे. माहे जुन २०१४ ते माहे डिसेंबर २०१४ पर्यंत एकुण ७ महिन्याची रक्कम रु.२,०४,९३२/- वसुल करणे बाकी आहे.

तसेच सुधारीत भाडेपट्टा नियम २०१४ मधील तरतुदीनुसार बाजार मुल्यांकनाचे २.५% प्रमाणे भाडे वसुल करणे आवश्यक आहे. त्यानुसार उपरोक्त मालमत्तेचे वार्षीक भाडे रु.१,९५,१७२/- होत आहे. या रक्कमेत प्रतिवर्ष ५% प्रमाणे भाडे वाढ केल्यास सन २०१५ ते २०२० पर्यंतची एकुण थकबाकी रक्कम रु.१३,१७,४२७/- इतकी होते.

वर नमुद बेरीज प्रमाणे माहे जुन २०१४ ते माहे डिसेंबर २०२० पर्यंतची एकुण थकबाकी रक्कम रु.१५,२२,३५९/- श्री. शेख मुनीर शेख मुन्नु चौधरी यांच्याकडून वसुल करुन सन २०१६ ते २०२६ पर्यंतच्या १० वर्षाच्या कालावधीसाठी सन २०१६-१७ च्या बाजार मुल्यांकनानुसार प्रतिवर्ष भाडे आकारुन अर्जदार यांचा भाडेपट्टा नुतनीकरणचा प्रस्ताव मान्यतेसाठी वक्फ मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येत आहे तसेच सदर प्रस्तावास वक्फ मंडळाची मान्यता मिळाल्यास पुढील मंजुरीसाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव पठविणे करीता सादर करण्यात येत आहे.

ठराव क्रमांक:-२० दर्गाह हजरत कादर औलिया, जाफर गेट, मोंढा, औरंगाबाद या वक्फ मिळकती मधील पेट्रोलपंपाच्या भाडेपट्टा नुतनीकरणच्या प्रकरणी संबंधीत डिलर आणि पेट्रोलियम कंपनी यांना नोटीस देवून त्यांच्या मध्ये झालेला रजिस्ट्रर्ड भाडेपट्टाकरार मागविण्यात यावा.

(सियानत विभाग)

विषय क्रमांक. २१: -

दर्गाहपीर साहेब, व कब्रस्तान मौजे विरेगांव ता.जि.जालना च्या संरक्षण भिंती बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत

दर्गाहपीर साहेब, मौजे विरेगांव ता.जि.जालना ची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१/५/१९७३ भाग-अ च्या अनुक्रमांक ५६० वर क्षेत्र २०x१५ फुट आणि कब्रस्तानची नोंद अनुक्रमांक ५६१ वर क्षेत्र १२५x१५० फुट इतकी आहे. कब्रस्तानची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार क्र.

MSBW/JLN/३१२/२०१४ अन्वये करण्यात आलेली आहे. अर्जदार श्री.सुलेमान ईसाक शेख, हे दर्गाह व कब्रस्तानची देखरेख करीत असुन त्यानी वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी योजना प्रस्ताव वक्फ मंडळात दाखल केलेला आहे वक्फ संस्थेस कोणतेही उत्पन्न नसल्याने वक्फ फंड निरंक आहे.

उपरोक्त कब्रस्तानला वॉल कंपाऊंड करण्यासाठी श्री.राजेश टोपे मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण महाराष्ट्र राज्य यांनी स्थानिक विकास निधी सन २०२१-२२ मधून रक्कम रु.८.०० लक्ष इतका निधी मंजुर करण्यासाठी जिल्हाधिकारी, जालना यांना दि.९/१०/२०२१ च्या पत्रान्वये कळविले आहे. अर्जदार सुलेमान ईसाक शेख रा.विरेगांव ता.जि.जालना यांनी दि.८/९/२०२१ रोजीच्या अर्जासोबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जालना यांच्याकडील बांधकाम अंदाज पत्रकाची प्रत व ग्रामपंचायत, विरेगांव यांच्याकडील बांधकाम ना हरकत प्रमाणपत्राची प्रत सादर करुन कब्रस्तान कंपाऊंड वॉल बांधकामासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस विनंती केली आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी,जालना यांनी पत्र क्र. जिवअ/एसएनटी विभाग-१०७/२१९/२०२१ दि.१०/१२/२०२१ अन्वये अहवाल सादर केला आहे त्या सोबत १)शासन राजपत्र, २)वक्फ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र ३)प्रस्तावित जागाच्या फोटो ४)मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण महाराष्ट्र राज्य यांचे पत्र, ५)अर्जदार याचा आधार कार्ड ६)बांधकाम प्लॅन ईस्टीमेटची प्रत सादर केले आहे. सदरील वक्फ संस्थेस सध्या कोणतीही व्यवस्थापन समिती मंजुर नसल्याने जिल्हा वक्फ अधिकारी, जालना यांच्या निगराणीत कब्रस्तान कंपाऊंड वॉलच्या बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे शिफारस केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार कब्रस्तानला संरक्षण भिंती बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणात श्री. मो. लतीफोदिन, जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासला असून त्यांनी सादर केलेली कागदपत्रे योग्य आहेत.

ठराव क्रमांक २१:- दर्गाहपीर साहेब, व कब्रस्तान मौजे विरेगांव ता.जि.जालना च्या संरक्षण भिंतीच्य बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात येत आहे. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता आदेश निर्गमित करावेत.

विषय क्रमांक:-२२

मस्जीद-ए-बिस्मिल्लाह सैलानी मौजे पिंपळगाव सराय जि.बुलडाणा येथे नमाज हॉल, वजुखाना, स्वच्छतागृह, मदरसा हॉल व ४ खोल्या पेशइमाम, मौअज्जीन व कार्यालयाच्या उपयोगासाठी बांधण्यसाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत

मस्जीद-ए-बिस्मिल्लाह सैलानी मौजे पिंपळगाव सराय जि.बुलडाणा ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार क्र.MSBW/BLD/३३३/२०१८ दि.२८/११/२०१८ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. वाकिफ श्रीमती बिस्मिल्लाह बी ज. बशीर यांनी स्वतःच्या मालकीची गट क्र.३२० पैकी ५४४५ चौ.फुट (५०६.०५ चौ.मि.) जागा वक्फ करुन वक्फ मंडळात नोंदणी केलेली आहे. सदरील वक्फ संस्थेची देखरेख वाकिफच्या घरचे लोक मुलगा व जावई करीत असुन स्वतःच्या खर्चाने टिनशेड मध्ये मस्जीद बांधलेली आहे. मस्जीदचे वक्फ फंड सन २०२०-२१ पर्यंत भरणा केला आहे. वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी योजाना प्रस्ताव वक्फ मंडळाच्या चौकशी विभागात दाखल केलेली आहे.

उपरोक्त मस्जीदच्या सदस्यांनी त्यांच्या दि.१/८/२०२१ च्या सभेत ठराव घेवून मस्जीदच्या एकूण क्षेत्रापैकी ३१२.७६ चौ.मि. जागा मध्ये खालील प्रमाणे बांधाकामे करण्याचे ठरविले आहे.

१) नमाज हॉल ३०x५० फुट जागा

२) वजुखाना २०x१० फुट जागा

३) स्वच्छतागृह १२x१८ फुट

४) अरबी मदरसा हॉल १४x४२ फुट

५) १०x१० च्या ४ खोल्या (इमाम, मोअज्जीन, व कार्यालयीन उपायोगासाठी)

वर नमुद बांधकामाचा अंदाजपत्रक खर्च रु.३५,९५,१४७/- इतका असून वक्फ संस्थेच्या पदाधिकारी आणि स्थानिक लोकांच्या चंदा वर्गणी, दान यामधून करण्यात येणार असुन सदर कामासाठी या कार्यालयाचे बांधकाम नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस दि.२३/०३/२०२१ च्या अर्जान्वये विनंती केली आहे.

प्रादेशिक वक्फ अधिकारी, अमरावती यांनी पत्र क्र. वक्फ/सियानत-१३४/३७६/२०२१ दि.२०/०८/२०२१ अन्वये अहवाल सादर केला आहे त्या सोबत १)वक्फ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, जोडपत्र, आदेश २)७/१२ ३)प्रस्तावित जागाच्या फोटो ४) वक्फ संस्थेचे ठरावाची प्रत ५)वक्फ फंड पावती ६)योजन मंजुरीसाठी दाखल केल्या प्रस्तावाची फी भरणा केलेली पावती ७)शपथ पत्र ८)आधार कार्डची प्रत ९)बांधकाम प्लॅन, नकाशा, ईस्टीमेटची प्रत सादर करुन उपरोक्त बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत शिफारस केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार मस्जीद बिस्मिल्लाह च्या संबंधित उपरोक्त बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणात श्री. सय्यद अमीनुज्जमा, प्रादेशिक वक्फ अधिकारी, अमरावती यांचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासला असून त्यांनी सादर केलेली कागदपत्रे योग्य आहेत.

ठराव क्रमांक २२:- मस्जीद-ए-बिस्मिल्लाह सैलानी मौजे पिंपळगाव सराय जि.बुलडाणा येथे नमाज हॉल, वजुखाना, स्वच्छतागृह, मदरसा हॉल व ४ खोल्या पेशइमाम, मौअज्जीन व कार्यालयाच्या उपयोगासाठी बांधण्यसाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात येत आहे. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता आदेश निर्गमित करावेत.

विषय क्रमांक. २३: -

सादत मस्जीद, आजम कॉलोनी, रौशनगेट औरंगाबादच्या संबंधित प्रस्तावीत बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत

सादत मस्जीद, आजम कॉलोनी, रौशनगेट औरंगाबाद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार क्र.MSBW/ABD/४००/२०१२ दि.४/१२/२०१२ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. नगर भूमापन क्रमांक ११२०१/१ आणि ११२०२ शिट क्र.३३५ पैकी खालील प्रमाणे जागा मस्जीदच्या नावाने आहे.

१) सर द. क्र. ३९९१/१७ दि.२६/५/२०१७ अन्वये क्षेत्र ९२.९३ चौ.मि. जागा मस्जीदच्या नावाने खरेदी करण्यात आली आहे.

२) हिबा नोटरी दि.१६/९/२०१७ अन्वये क्षेत्र १६७.२२ चौ.मि. जागा श्रीमती शमीम बेगम भ्र.सय्यद अझहर यांनी हिबा करुन सादत मस्जीदच्या नावाने दिली आहे.

३) हिबा नोटरी द्वारे क्षेत्र २२७.६९ चौ.मि. जागा अथहर सय्यद मोहम्मद यांनी हिबा करुन सादात मस्जीदच्या नावाने दिली आहे.

४) हिबा नोटीरी दि.१२/०३/२०२१ क्षेत्र १०.३१ चौ.मि. जागा अरशद खान मोहम्मद खानी यांनी हिबा करुन सादात मस्जीदच्या नावाने दिली आहे.

५) मालमत्ता न.भु.क्र.११२०२ शिट क्र.३३५ पैकी ९१ चौ.मि. जागा आजम कॉलोनी मस्जीद म्हणुन नोंद आहे.

सदर मस्जीदचे एकुण क्षेत्र ५८९.१५ चौ.मि. आहे. वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी मस्जीद सादात तर्फे श्री.शेख मोहम्मद इस्माईल यांच्या अध्यक्षतेखाली योजना वक्फ मंडळाने दि.२५/०१/२०१९ च्या आदेशान्वये मंजुर केलेली आहे. सदर मस्जीद जुनी असल्याने तसेच नमाज पठणसाठी जागा कमी पडत असल्यामुळे वक्फ संस्थेच्या विश्वस्तांनी स्थानिक लोकांची आमसभा घेवून मस्जीदच्या खालील प्रमाणे बांधकामासाठी प्रस्ताव दाखल केला आहे.

अ.क्र.	मजला	प्रस्तावित बांधकाम
१	तळ मजला	अ.मस्तुरातसाठी मकतब

		ब.मुलांसाठी मकतब क.वजुखाना ड.तहारतखाना
२	ग्राऊंड फ्लोअर	अ.मस्जीद हॉल ब.वजुखाना क.पेशइमाम साठी रुम ड.अजान देण्याचा रुम
३	पहिला मजला	अ.मस्जीद हॉल ब.वजु खाना

उपरोक्त प्रस्तावित G+२ मस्जीद इमारतीच्या बांधकामाचा अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु.१,५५,८७,०००/- असुन वक्फ संस्थेकडील शिल्लक रक्कम व स्थानिक लोकांच्या वर्गणीतून सदर बांधकाम करण्यात येणार आहे. सदरील मस्जीदच्या नुतनीकरण व नवीन बांधकामासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार शेख मोहम्मद इस्माईल, अध्यक्ष सादात मस्जीद, यांनी दि.१४/९/२०२१ रोजीच्या अर्जान्वये विनंती केली आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांनी पत्र क्र.मरावमं/जि.व.अ. विभाग/एसएनटी-११६/३४९/२०२१ दि.११/११/२०२१ अन्वये अहवाल सादर केला आहे. त्या सोबत १)वक्फ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, जोडपत्र आदेश, २)वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी योजना मंजुरी आदेश, ३)मालमत्ता पत्रकाची प्रत,४)मस्जीदच्या नावाने खरेदी केलेल्या जागाचे खरदेखत व हिबानाकाची प्रत, ५)प्रस्तावित जागाची फोटो ६) वक्फ फंड भरणा केलेली पावती, ७)शपथपत्र ८)आधार कार्ड, ९)अभियंताची सर्च रिपोर्ट, १०)बांधकाम प्लॅन ईस्टीमेटची प्रत देवून मस्जीदच्या नुतनीकरण/नवीन बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याची शिफारस केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार सादत मस्जीद, च्या संबंधित उपरोक्त बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणात श्री. सय्यद फैज, जिल्हा वक्फ अधिकारी, औरंगाबाद यांचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासला असून त्यांनी सादर केलेली कागदपत्रे योग्य आहेत.

ठराव क्रमांक २३:- सादत मस्जीद, आजम कॉलोनी, रौशनगेट औरंगाबादच्या उपरोक्त प्रस्तावीत बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात येत आहे. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता आदेश निर्गमित करावेत.

विषय क्रमांक. २४: -

जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ बिलोली नगर परिषद हद्दीतील मस्जीद-ए-खुर्द येथे पेव्हर ब्लॉक बसविणे, जामा मस्जीद येथील कब्रस्तानच्या संरक्षण भिती व ईदगाह येथे ओटा बांधण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत.

मुख्याधिकारी, नगरपरिषद, बिलोली जि.नांदेड यांचे पत्र क्र.बिनप/२५ दि.७/१/२०२२ या कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्यामध्ये जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ योजनेअंतर्गत बिलोली नगर परिषद हद्दीतील महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळच्या असलेल्या खालील मालमत्ता विकसित करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस विनंती केली आहे.

अ) मुस्लीम स्मशान भूमी छोटी मस्जीद येथे नमाज पठनच्या जागी पेव्हर ब्लॉक बसविणे,

वक्फ संस्था मस्जीद-ए-खुर्द व कब्रस्तानची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२७/१/१९७५ भाग.ब च्या अनुक्रमांक १२ वर असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार क्र.MSBW/NDD/१८/२००९ दि.२८/४/२००९ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदर मस्जीदच्या

नमाज पठनच्या पेव्हर ब्लॉक बसविण्याचे कामासाठी अंदाज पत्रकिय रक्कम **रु.१९,९६,५००/-** इतक्या रकमेस तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि.नांदेड यांनी दि.१५/७/२०२१ अन्वये दिलेली आहे. सदर कामासाठी अध्यक्ष मस्जीद-ए-खुर्दच्या व्यवस्थापन समितीने दि.१४/१/२०२२ रोजी नाहरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

ब) मस्जीद कला नवाब सरफाराज खान शहीद व कब्रस्तान, बिलोली येथे संरक्षण भिंती बांधणे,

मस्जीद-ए-कलॉ मजार नवाब सरफराज खान शहीद व कब्रस्तान, बिलोली ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार क्र.MSBW/NDD/११४/२०१० दि.१०/२/२०१० अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील कब्रस्तानच्या संरक्षण भिंती बांधकामासाठी अंदाज पत्रकिय रक्कम **रु.२४,०९,१५०/-** इतक्या रकमेस तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि.नांदेड यांनी दि.१५/७/२०२१ अन्वये दिलेली आहे. सदर कामासाठी मस्जीद-ए-कलॉ मजार नवाब सरफराज खान शहीद व कब्रस्तान च्या मुतवल्लीने दि.१४/१/२०२२ रोजी अर्ज देवून नाहरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

क) बिलोली नगर परिषद हद्दीतील ईदगाह येथे नमाज पठनच्या जागी ओटा करणे,

बिलोली नगर परिषद हद्दीतील सर्वे नंबर १५९ मध्ये अस्तित्वात असलेली ईदगाह येथे नमाज पठनच्या जागी ओटा बांधकाम करण्यासाठी अंदाज पत्रकिय रक्कम **रु.८१,०५,८००/-** इतक्या रकमेस तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलूर जि.नांदेड यांनी दि.१५/७/२०२१ अन्वये दिलेली आहे.

वर नमुद प्रकरणात प्रस्तावित बांधकामास ना हरकत प्रमाणपत्र देणे बाबत जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड यांनी दि. २४/०१/२०२२ रोजी अहवाल देवुन शिफारस केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार बिलोली नगर परिषद, हद्दीतील वक्फ मिळकत मध्ये उपरोक्त प्रस्तावित बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणात श्री. मोहम्मद रियाजोद्दिन, जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासला असून त्यांनी सादर केलेली कागदपत्रे योग्य आहेत.

ठराव क्रमांक २४:- जिल्हा वार्षिक योजना सन २०२१-२२ बिलोली नगर परिषद हद्दीतील मस्जीद-ए-खुर्द येथे पेव्हर ब्लॉक बसविणे, जामा मस्जीद येथील कब्रस्तानच्या संरक्षण भिती व ईदगाह येथे ओटा बांधण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात येत आहे. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता आदेश निर्गमित करावेत.

विषय क्रमांक. २५: - दर्गाह व कब्रस्तान हजरत बाबा अब्दल्लाह शाह नौशाही कादरी रहे, अलै वली ट्रस्ट, कामठी जि.नागपुर च्या दर्गाह परिसरात जुने गेट ऐजवी नवीन गेट आणि दरबारी झेंडा (परचम) बांधकामास नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत.

दर्गाह व कब्रस्तान हजरत बाबा अब्दुल्लाह शाह वली ट्रस्ट, कामठी जि.नागपुर ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ नुसार क्र.MSBW/NGP/१११/२०१० दि.२१/१/२०१० अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. मो.आबीद ताजी पिता शेख कलाम ताजी यांच्या अध्यक्षतेखाली वक्फ संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे फेरफार अर्ज दि.१२/१२/२०१८ अन्वये मंजुर झालेले आहे तसेच वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी व प्रशासनासाठी योजना प्रस्तावास दि.२५/११/२०२१ च्या आदेशान्वये वक्फ मंडळाने मान्यता दिलेली आहे. वक्फ संस्थेची नोंद आखीव पत्रिका शिट नं.२२ संवर्ग ७६ वर असून वक्फ फंड सन २०२०-२१ पर्यंत भरणा केलेला आहे.

अर्जदार अनीस अय्युब शेख, सचिव, दर्गाह व कब्रस्तान हजरत बाबा अब्दुल्लाह शाह वली ट्रस्ट, कामठी यांनी दि.८/२/२०२१ रोजी अर्ज देवून विनंती केली आहे की, वक्फ संस्थेच्या परिसरात जुने गेट असुन ते जिर्ण झालेले आहे तसेच दर्गाहच्या आतील जागेवरील दरबारी झेंडा (परचम) अतिशय जिर्ण झाला असुन दरबारी झेंडयाचे दुरस्ती काम व नवीन गेट बांधकामासाठी वक्फ संस्थेच्या व्यवस्थापन समितीने त्यांच्या सर्वसाधारण सभेत ठराव घेवून सदरील कामासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस

विनंती केली आहे. बांधकामाचे क्षेत्र १८ चौ.मि. आहे आणि बांधकामाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.१३,६१,२००/- इतका असून वक्फ संस्थेच्या पदाधिकारी आणि स्थानिक लोकांच्या चंदा वर्गणी, यामधून करण्यात येणार आहे. सदर कामासाठी या कार्यालयाचे बांधकाम नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार यांनी विनंती केली आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत १)वक्फ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, २) आखीव पत्रिका ३)फेरफार मंजुर आदेशाची प्रत,४) वक्फ संस्थेचे ठरावाची प्रत ५)वक्फ फंड पावती ६)योजन मंजुरी आदेशाची प्रत, ७)शपथ पत्र८) प्रस्तावित जागाच्या फोटा ९)बांधकाम प्लॅन, ईस्टीमेटची प्रत सादर केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार उपरोक्त वक्फ संस्थेच्या दरबारी झेंडयाचे दुरस्ती काम व नवीन गेट बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी ठेवणे बाबत आदेशास्तव सादर.

ठराव क्रमांक २५:- दर्गाह व कब्रस्तान हजरत बाबा अब्दल्लाह शाह नौशाही कादरी रहे, अलै वली ट्रस्ट, कामठी जि.नागपुर च्या दर्गाह परिसरात जुने गेट ऐजवी नवीन गेट आणि दरबारी झेंडा (परचम) बांधकामास नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात आला. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता आदेश निर्गमित करावेत

विषय क्रमांक. २६:- कुरेशी जुम्मा मस्जीद ट्रस्ट, बारामती जि.पुणे च्या दुरुस्ती/नुतनीकरण बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबत.

कुरेशी जुम्मा मस्जीद ट्रस्ट, बारामती जि.पुणे ही संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार क्र.बी-२९ अन्वये नोंदणीकृत असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ नुसार क्र.MSBW/PUN/२५६/२०१० दि.१३/७/२०१० अन्वये नोंदणी करण्यात आली आहे. सदर मस्जीदचे मिनार, पॅरापीट व छत जिर्ण व धोकादायक झाले आहे. पावसाचे पाणी छत मधून आत शिरत आहे छत पडल्यास जिवीत व वित्त हानी होण्याची शक्यता असुन मस्जीदच्या दुरस्ती/नुतनीकरण करणे आवश्यक आहे. सदर मस्जीद सिटी सर्वे नं. २६८ मध्ये असुन त्याचे क्षेत्रफळ ४४०.६ चौ.मि. इतके आहे. त्यापैकी २४८.५ चौ.मि. मध्ये मस्जीद लोडबेरींग व पत्र्याच्या शेड मध्ये बांधलेली आहे. वक्फ संस्थेने सन २०२०-२१ पर्यंत ऑडिट रिपोर्ट सादर करुन वक्फ फंडाची रक्कम पावती क्र.४१७४० दि.११/१२/२०२१ अन्वये भरणा केली आहे. वक्फ संस्थेच्या प्रशासनासाठी योजना वक्फ मंडळात दाखल आहे. सदरील मस्जीदचे दुरुस्ती/नुतनीकरण बांधकामासाठी वक्फ संस्थेच्या सदस्यांनी त्यांच्या सर्व साधरण सभेत ठराव घेवून मस्जीदच्या दुरुस्ती व नुतनीकरण बांधकामासाठी या कार्यालयाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेस अर्जदार हाजी शब्बीर शक्करजी कुरेशी, सदस्य कुरेशी जुम्म मस्जीद ट्रस्ट, बारामती यांनी दि.२१/९/२०२१ च्या अर्जान्वये विनंती केली आहे.

मस्जीदच्या दुरुस्ती/नुतनीकरण बांधकाम ग्राऊंड फ्लोअर क्षेत्र २५१.७५ चौ.मि. आणि पाहिला मजला क्षेत्र २४८.५० चौ.मि. असे एकूण ५००.०५ चौ.मि. बांधकामाचे क्षेत्र आहे. सदरील बांधकामाचा अंदाजपत्रक खर्च रु.५५,४६,९००/- इतका असून वक्फ संस्थेच्या पदाधिकारी आणि स्थानिक लोकांच्या चंदा वर्गणी, यामधून करण्यात येणार आहे.

प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांनी पत्र क्र.पी/एसएनटी/४८९/२०२१ दि.२९/९/२०२१ अन्वये अहवाल सादर केला आहे. त्यासोबत १)वक्फ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, आदेश २) Ruled Card, टोंच नकाशाख ३) अनुसुचि-१ ची प्रत,४) वक्फ संस्थेने बांधकामासाठी घेतलेल्या ठरावाची प्रत ५)ऑडिट रिपोर्ट, वक्फ फंड पावती ६)योजन प्रस्तावाची प्रत, ७) प्रतिज्ञापत्र ८) प्रस्तावित जागाच्या फोटा ९)आधार कार्ड, १०)बांधकाम प्लॅन, ईस्टीमेटची प्रत सादर करुन मस्जीदच्या दुरुस्ती/नुतनीकरण बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याची शिफारस केली आहे.

वक्फ अधिनियम १९९५ चे कलम २५(१)क मधील तरतुदीनुसार उपरोक्त मस्जीदच्या दुरुस्ती/नुतनीकरण बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणात श्री. खुसरो खान, प्रादेशिक वक्फ अधिकारी, पुणे यांचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तपासला असून त्यांनी सादर केलेली कागदपत्रे योग्य आहेत.

ठराव क्रमांक २६:- कुरेशी जुम्मा मस्जीद ट्रस्ट, बारामती जि.पुणे च्या दुरुस्ती/नुतनीकरण बांधकामासाठी नाहरकत प्रमाणपत्र देणे बाबतचा प्रस्ताव एकमताने मंजुर करण्यात येत आहे. सदर ठराव कायम होण्याची वाट न पाहता आदेश निर्गमित करावेत.

(अतियात विभाग)

विषय क्रमांक २७: - वक्फ़ संस्था दर्गाह तकीया रोशन अली शाह कादरी निशाणे मुबारक हजरत महेबुब सुभानी शाह बाजार औरंगाबाद, या वक्फ संस्थेच्या मुतवल्ली पदाबाबत निर्णय घेणे.

वक्फ़ संस्था दर्गाह तकीया रोशन अली शाह कादरी निशाणे मुबारक हजरत महेबुब सुभानी शाह बाजार औरंगाबाद मुतवल्ली पद बाबत १) शेख नसीर शेख अब्दुल कादर २) शेख इरशाद शेख नसिम अहेमद यांना वक्फ़ मंडळाच्या ठराव क्र. ६(ब), दि. ०१/०९/२०२१ व ०३/०९/२०२१, प्रमाणे पत्र क्र.मरावम/अतियात/रजी क्र. ३९/७४५३/२०२१, दि. १८/११/२०२१, अन्वये सुचित करण्यात आले होते की, सदर वक्फ़ संस्थाच्या मुतवल्ली पदी अनुवंषिक निवड करण्याबाबत नोंद असलेला ट्रस्ट डीड मधील पुरावा सादर करावा.

१) श्री. नसिर शेख यांनी दि. ०३/१२/२०२१, रोजी उत्तर सादर करुन कळविले आहे की, सदर संस्थाचे अर्जदार यांचे मोठे काका शेख चांद शेख छब्बु हे मुतवल्ली होते ते आविवाहीत होते त्यांचा मृत्यु पश्च्यात अर्जदाराचे वडील शेख अब्दुल कादर हे २३/०८/२००७ पर्यंत सदर संस्थेच्या मुतवल्ली म्हणुन सदर संस्थेची सेवा चाकरी करीत होते. त्यांच्या मृत्यु नंतर अर्जदार सदर संस्थेची सेवा करीत होते त्यांचे पुरावे म्हणुन अर्जदाराचे नावाने निशान मुबारकची, मिरवणुकसाठी मागीतले परवानगीचे अर्ज आणि परवानगीचे कागदपत्र सादर केले आहे. सदर संस्थास कोणतेही इनामी जमीन नसल्यामुळे वारसाची कार्यवाही करण्याची तरतुद नाही. न्यायालयाने शेख चांद शेख छब्बु यांचे अर्जदार वारस असल्याने प्रमाण पत्र दिले असुन त्याची छांयाकीत प्रत सादर केली आहे.

२) श्री. शेख इरशाद पिता नसीम अहेमद यांनी या कार्यलयाचे पत्र क्र.मरावम/अतियात रजी क्र.३९/७४५३/२०२१, दि. २०/१२/२०२१, रोजी अनुवांषीक पुरावा सादर करुन विनंती केली आहे की, त्यांचे वडील नामे नसिम अहेमद पिता गुलाम दस्तगीर हे सदर संस्थाचे मुतवल्ली होते व त्यांना वक्फ़ मंडळातर्फे आदेश क्र.मरावम/एटीवाय/१५८४/९६, दि. २१ जुलै १९९६, वक्फ़ अधिनियम १९५४ चे कलम ४२ अन्वये सदर संस्थाचे मुतवल्ली म्हणुन नियुक्त करण्यात आले होते व महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडाळाची ठराव क्र. १९, दि.०१/०१/२००५, अन्वये अर्जदाराचे वडीलांना आदेश क्र.वक्फ़/अतियात/२२७४/०६, दि. २७/०४/२००६, अन्वये कायम स्वरुपी सदर संस्थेच्या मुतवल्ली पदी ठेवण्यात आलेले आहे तसेच त्यांचे आजोबा नमुना मुंन्तखब सिताबुल औकाफ़ रजी.नं.इंन्डोमेन्ट ब्रान्च १९५४ चे रकाना क्र. ११ मुतवल्ली चे रकान्यात अर्जदाराचे आजोबा नामे सय्यद हसन सय्यद जमालोद्दीन सहाब यांचे नाव आहे. प्रकरणातील अर्जदाराने मा.वक्फ़ न्यायाधीकरण येथे दाखल झालेले सुट नं. ९७/२००८ व सुट नं. ३९/२०१८ तसेच मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील सिआरए क्र. ११६/२०१३,चा निर्णय सादर केला आहे. सदर आदेशान्वये वक्फ़ मंडळाने नियुक्ती केलेले मुतवल्लीस Recognaized केले आहे.

गुलाम दस्तगीर यांचे मृत्यु नंतर सदर संस्थाची सेवा १९५६ पासुन अंदाजे ७० वर्षा पासुन अर्जदारचे वडील वक्फ़ मंडाळाला मिळुन सदर संस्थाची वार्षीक हिशोब, लेखा परिक्षण अहवाल, वक्फ़ फ़ंड वक्फ़ मंडाळात नियमीत जमा करीत आहे. शेख नसिर यांनी त्यांचे वडील नसिम अहेमद यांचे

नियुक्ती मुतवल्ली मा. वक्फ़ न्यायाधिकरण येथे सुट क्र.९७/२००८, अन्वये आव्हान केले आहे. ज्याचा निर्णय नसिम अहेमद यांचे बाजुने लागला त्याला शेख नसिर यांनी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे सिआरए क्र. १६६/२०१३, दाखल केला यात पण मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी सिआरए क्र. १६६/२०१३ व ७०/२००९, मध्ये वक्फ़ न्यायाधिकरणाचे सुट क्र. ९७/२००८, मध्ये दिलेल्या आदेशाला कायम ठेवले आहे.

शेख नसिर यांनी मा. सिव्हिल कोर्ट येथील लिगल हेअरींगशिप साठी दावा दाख़ल केला त्याला तत्कालिन मुतवल्ली नसिम अहेमद यांनी चॅलेन्ज केले आणि तो दावा संपुष्टात आला अर्जदाराने फसवणुकीने नगर भुमापन अधिकारी यांच्या कार्यलयात सदर संस्थाचे आखिव पत्रकामध्ये नाव टाकण्याची अर्ज दाखल केला परंतु तत्कालिन मुतवल्ली यांनी सिटी सर्वे मध्ये पण पैरवी करुन त्यांचा अर्ज फ़ेटाळण्यास भाग पाडले. तत्कालिन मुतवल्लीचा मुलगा शेख इरशाद यांनी विनंती केली आहे की त्यांचे वडील जे सदर संस्थाचे मुतवल्ली होते त्यांचे निधन दि. ०५/११/२०२०, रोजी झाल्याने सदर सन्स्थेची सर्व देखभाल सेवा देखभाल वगैरे अर्जदार करीत आहेत म्हणुन त्याच्या वडीलांच्या जागी त्यांना म्हणजेच शेख इरशाद पिता नसिम अहेमद यांना मुतवल्ली म्हणुन घोषीत करावे.

प्रकरणातील मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे अर्जदार शेख नसिर यांनी दाखल केलेले सिआरए नंबर १६६/२०१३, मध्ये मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी निर्णय दिला की, सदरील वक्फ़ संस्थाचे मुतवल्ली बद्दलचा निर्णय सहा महिण्याचे आत सर्व पक्षकाराना सुनावणीची संधी देवुन महाराष्ट्र वक्फ़ न्यायाधिकरण यांच्या निकालामधील, निष्कर्षांनी प्रभावीत ना होता गुणवत्तेवर सदर प्रकरण निकालीत काढण्याचे आदेशित केले आहे. सदर प्रकरणी शेख नसिर यांनी मा. उच्च न्यायालय औरगाबाद येथे अवमान याचीका दाखल केलेली आहे. दि.०३/०१/२०२२ च्या न्यायालयाचे विंटर वैकेशन संपण्यापुर्वी याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

सदर वक्फ संस्थेच्या मूतवल्लीपदासाठी दावा करणारे (१) शेख नसीर शेख अब्दुल कादर व (२) शेख इर्शाद शेख नसीम अहमद हे दोन्ही दावेदार सदर वक्फ संस्थेच्या ट्रस्ट डीड मध्ये वंशपरांपरागत मूतवल्लीची नियुक्ती करण्यात येईल अशा स्वरुपाचे कोणतेही दस्तावेज सादर करू शकले नाहीत.

असे असल्याने त्यांच्या मूतवल्लीपदाच्या - दाव्याच्या अनुषंगाने वक्फ मंडळाने निर्णय घेण्यासाठी प्रकरण सादर करण्यात येत आहे.

मागिल बैठकी मध्ये उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन पुढील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला-

ठराव क्रमांक २१:-

वक्फ़ संस्था दर्गाह तकीया रोशन अली शाह कादरी निशाणे मुबारक हजरत महेबुब सुभानी शाह बाजार औरंगाबाद, या वक्फ संस्थेच्या मुतवल्ली पदाच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ अर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. तथापी अर्जदारास एक शेवटची संधी म्हणून त्याची बाजू मांडण्यासाठी वक्फ मंडळाच्या आगामी बैठकीपुढे सुनावणीची संधी देण्यात यावी. असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक २७:- **वक्फ़ संस्था दर्गाह तकीया रोशन अली शाह कादरी निशाणे मुबारक हजरत महेबुब सुभानी शाह बाजार औरंगाबाद, या वक्फ संस्थेच्या मुतवल्ली पदाच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ अर्जदारांनी कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. तथापी, अर्जदारांना एक शेवटची संधी म्हणून त्यांची बाजू मांडण्यासाठी वक्फ मंडळाच्या आगामी बैठकीपुढे सुनावणीची संधी देण्यात यावी. असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

(आस्थापना विभाग)

विषय क्रमांक २८: - **श्री. इफ्तेखारुल्लाह बेग पिता सईदउल्लाह बेग, तत्कालीन लघु लेखक (आता सेवानिवृत्त) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्या विरुध्द करण्यात आलेल्या विभागीय चौकशीच्या अहवालावर निर्णय घेणे बाबत.**

ठराव क्रमांक २८:- **श्री. बेग इफ्तेखारुल्लाह सईदऊल्लाह यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप व त्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांनी नोंदविलेले निष्कर्ष व त्या संबंधात श्री.बेग इफ्तेखारुल्लाह सईदुल्लाह यांनी केलेला खुलासा याचे सविस्तर विवेचन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या अभिप्रायासह हे प्रकरण बैठकीत चर्चा व निर्णयासाठी त्यांच्या अहवालाद्वारे सादर केले. सदर चौकशी प्रकरणी बैठकीत सविस्तर चर्चा झाली. या चर्चेअंती श्री.बेग इफ्तेखारुल्लह सईदुल्लाह यांना ते दोषमुक्त असल्याचा निष्कर्ष काढून त्यांच्याकडून कोणतीही वसूली करण्यात येऊ नये असा ठराव संमत करण्यात आला.**

विषय क्रमांक २९: - **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कार्यालयातील लेखा विषयक कामकाज आधुनिक पध्दतीने करण्यासाठी टॅली व रेकोलो सॉफ्टवेअर खरेदी करण्यास मान्यता देणे बाबत.**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कार्यालयातील लेखा विषयक कामकाज पारंपारिक पध्दतीने करण्यात येत असून त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. आधुनिक पध्दतीने लेखा विषयक कामकाज करण्यासाठी टॅली व रेकोलो सॉफ्टवेअर खरेदी करुन मुख्यालयातील तसेच क्षेत्रिय कार्यालयातील कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. सदर सॉफ्टवेअर अंदाजे रक्कम रुपये ८०,०००/-इतक्या किंमतीत उपलब्ध होऊ शकेल. यासाठी कोटेशन मागवुन खरेदी करण्यास मान्यता देण्यात यावी.

ठराव क्रमांक २९:- **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कार्यालयातील लेखा विषयक कामकाज आधुनिक पध्दतीने करण्यासाठी टॅली व रेकोलो सॉफ्टवेअर खरेदी करण्याचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

विषय क्रमांक.३०:- **महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कार्यालयात विधी सल्लागार (१ पद), विधी अधिकारी (२पदे), लेखा अधिकारी (१ पद), महसूल अधिकारी (१पद), प्रशासन अधिकारी (१पद) कंत्राटी पध्दतीने नियुक्त करणे बाबत.**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी व्यतिरिक्त एकही अधिका-याचे पद नाही त्यामुळे वक्फ मंडळाचे कामकाज पार पाडताना खुप अडचणी येत आहे. या करिता विधी विषयक कामकाजासाठी, विधी सल्लागार (१ पद), विधी अधिकारी (२पदे), लेखा विषयक कामकाजासाठी लेखा अधिकारी (१ पद), भुसंपादन, महसूल विषयक कामकाजासाठी महसूल अधिकारी (१पद), व वक्फ मंडळाच्या आस्थापनेवर प्रशासन अधिकारी (१पद) असे एकुण ६ सेवा निवृत्त अधिकारी कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. या अधिका-यांना रुपये ५०,०००/- ते ७०,०००/-पर्यंत मानधन देण्यात येईल.

ठराव क्रमांक ३०:- महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कार्यालयात विधी सल्लागार (१ पद), विधी अधिकारी (२पदे), लेखा अधिकारी (१ पद), महसूल अधिकारी (१पद), प्रशासन अधिकारी (१पद) ही पदे कंत्राटी पध्दतीने/मानधनावर नियुक्त करण्याबाबत ठराव एकमताने मंजुर करण्यात आला.

विषय क्रमांक.३१:- **ॲड. जावेद आर शेख, यांची मानधनावर करण्यात आलेली नियुक्ती पुढे चालू ठेवणे बाबत.**

वक्फ मंडळाच्या सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित एस.एल.पी. तसेच एस.बी.यु.टी. शी संबंधी प्रकरणे हाताळण्यासाठी ॲड. जावेद आर शेख, यांची दि. ०१ /०१ /२०२० पासून रु. २५०,०००/- इतक्या मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्ती वेळोवेळी पुढे चालू ठेवण्यात आली असून त्यांच्या नियुक्तीचा कालावधी दि. २८/०२/२०२२ रोजी संपुष्टात येत आहे. न्यायालयीन कामकाजामध्ये त्यांची मोठ्या प्रमाणावर मदत होत आहे. त्यांना उच्च न्यायालयातील तसेच काही महत्वाची महाराष्ट्र वक्फ न्यायाधीकरणातील प्रकरणे देखील देण्यात आली आहेत. याशिवाय वक्फ मंडळाला विविध प्रकरणात विधी विषयक सल्ला देखील त्यांच्याकडुन घेण्यात येतो. त्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे.

ठराव क्रमांक.३१ **ॲड. जावेद आर शेख, यांची मानधनावर करण्यात आलेली नियुक्ती पुढे चालू ठेवण्यासाठी त्यांच्याकडून मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व इतर न्यायालयात वक्फ मंडळाच्या वतीने दाखल केलेल्या प्रकरणांची अद्यावत माहिती पुढील बैठकीमध्ये सादर केल्यावर त्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवण्यासंबंधी निर्णय घेण्यात येईल. असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

(मा. सन्माननीय सदस्य ॲड. ए. यु. पठाण यांनी दिलेले मुद्दे)

विषय क्रमांक.३२:- **मगदुम बीबी ट्रस्ट पनवेल ता. पनवेल जि. रायगड या वक्फ संस्थेच्या विकासासाठी देण्यात आलेल्या तथाकथित ना हरकत प्रमाणपत्राच्या अनुषंगाने व त्या आधारे करण्यात येत असलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने चर्चा.**

उपरोक्त प्रकरणी दि. २५/१२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ४१ नुसार सन्माननीय सदस्य ॲड. ए. यु. पठाण हे या प्रकरणाचा गोषवारा (Synopsis) सादर करतील.

ठराव क्रमांक ३२:- **या प्रकरणी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर हे प्रकरण विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायासह त्यानंतरच्या बैठकीत ठेवण्यात यावे.**

विषय क्रमांक. :-३३ **पीर कमर अली दर्गाह आणि गुडजीबाबा ट्रस्ट खेड शिवापुर जि. पुणे या वक्फ संस्थेच्या योजना मंजूरी बाबत.**

सदर वक्फ संस्थेच्या योजना मंजूरीच्या प्रस्तावावर वक्फ मंडळापुढे सुनावणी सुरु आहे.

ठराव क्रमांक ३३:- **पीर कमर अली दर्गाह आणि गुडजीबाबा ट्रस्ट खेड शिवापुर जि. पुणे या वक्फ संस्थेच्या योजना मंजूरी बाबतचे सदर प्रकरण वक्फ मंडळापुढे अंतिम सुनावणीसाठी ठेवण्यात यावे.**

विषय क्रमांक. :-३४ **सर्व्हे नं. ५५ कोंढवा, आलमगीर मस्जीद पुणे च्या मुतवल्लींना हटवुन सदर वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत घेणे बाबत.**

सर्व्हे नं. ५५ कोंढवा, आलमगीर मस्जीद पुणे च्या मुतवल्लींना हटवुन सदर वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत घेण्या करिता संबंधीत मुतवल्लींना नोटीसेस देण्यात आल्या असून त्यांचे लेखी म्हणणे मागविण्यात आले आहे. त्यांना सुनावणीची संधी देऊन या बाबत निर्णय घेण्यात येईल.

ठराव क्रमांक ३४:- **सर्व्हे नं. ५५ कोंढवा, आलमगीर मस्जीद पुणे च्या मुतवल्लींना हटवुन सदर वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत घेण्यात यावी असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.**

(मा. सन्माननीय सदस्या डॉ. फौजिया खान यांनी दिलेले मुद्दे)

विषय क्रमांक. ३५:- **दर्गाह हजरत कुर्बान अली शाह व मस्जीद या वक्फ संस्थेची नोंदणी तसेच मुतवल्ली म्हणून नियुक्तीसाठी सय्यद सिराज मोहियोद्दीन सय्यद अलाऊद्दीन यांचा अर्ज**

दर्गाह हजरत कुर्बान अली शाह व मस्जीद या नावाने वक्फ संस्था दि.०२/१२/२००९ रोजी क्र. मरावम/पी.बी.एन/२४/२००९ ची नोंदणी करण्यात आली आहे. सदर वक्फ संस्था सर्व्हे क्र. ५९१ मध्ये आहे. सर्व्हे क्र. ५९१ मध्ये शासन राजपत्र दि. ०२/०५/१९९४ नुसार दर्गाह हजरत सय्यदशाह तुराबूल हक्क, मस्जीद, दोन सराए आणि कब्रस्तान आहेत. याच वक्फ संस्थेच्या जमीनीवर सन २००९ मध्ये दर्गाह हजरत सय्यद कुर्बान अली शाहची नोंदणी करण्यात आली. यामुळे एक मालमत्ता दोन वक्फ संस्थांच्या नावे दर्शवली गेली आहे. सदर नोंदणी सय्यद सिराज मोहियोद्दीन यांनी केली असून त्यांनी मुजावर म्हणून स्वतःची नेमणुक करण्यासाठी दि. ०६/०९/२०१६ रोजी अर्ज केला होता व या जागेसंबंधी काही गैरव्यव्हार करण्याचे प्रयत्न केले होते अशी तक्रार आहे. त्यांनी पुन्हा सदर दर्गाहसाठी मुतवल्ली म्हणून नियुक्तीसाठी आता अर्ज केला आहे. त्यांची विरासत मंजूर झालेली नाही. सदर संस्थेचे मुतवल्लीपद अनुवंषिक असल्याबाबत समुचित /अधिप्रमाणित पुरावा त्यांनी सादर केलेला नाही. या प्रकरणी सखोल चौकशी करुन योग्य निर्णय घेण्यात यावा.

ठराव क्रमांक ३५:- **सदर प्रकरणात मुजावर/मुतवल्ली पदी नियुक्तीसाठी वक्फ मंडळास प्राप्त अर्ज रद्द करण्यात यावा तसेच अर्जदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची सत्यता पडताळणी करण्यात यावी ते बोगस आढळून आल्यास त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करणे बाबत कार्यवाही करावी.**

विषय क्रमांक. ३६:- परभणी शहरातील वक्फ संस्था दर्गाह, कब्रस्तान आखुंदमियाच्या मुतवल्ली पदी नियुक्ती मिळण्यासाठी शेख सलीम शेख नविद, यांनी अर्ज केला आहे. त्यांची विरासत मंजूर झालेली नाही. सदर संस्थेचे मुतवल्लीपद अनुवंषिक असल्याबाबत समुचित /अधिप्रमाणित पुरावा त्यांनी सादर केलेला नाही. वक्फ संस्थेच्या गैर व्यवहाराबाबत श्री. के.बी. भोगे समितीने दिलेल्या अहवालामध्ये अर्जदाराच्या हेतुविषयी समितीने संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करुन योग्य निर्णय घेण्यात यावा.

ठराव क्रमांक ३६:- सदर प्रकरणात मुजावर/मुतवल्ली पदी नियुक्तीसाठी वक्फ मंडळास प्राप्त अर्ज रद्द करण्यात यावा तसेच अर्जदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची सत्यता पडताळणी करण्यात यावी ते बोगस आढळून आल्यास त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करणे बाबत कार्यवाही करावी. लिज रुल्स प्रमाणे संबंधीताकडून भाडे आकरण्यात यावे.

(मा. सन्माननीय सदस्य मौलाना हाफीज सय्यद अथर अली यांनी दिलेले मुद्दे)

विषय क्रमांक. ३७:- बिस्मिल्लाह शाह बाबा दर्गाह, सि.एस.टी. स्टेशन, मुंबई या वक्फ संस्थेच्या व्यवस्थापन योजनेसाठी मोहम्मद शकूर युसुफ शेख, यांचा अर्ज प्राप्त झाला असून यासाठी दि. ०५/०१/२०२१ रोजी जाहीर प्रगटन देण्यात आले आहे. त्यावर आक्षेप प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणी वक्फ मंडळापुढे सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

ठराव क्रमांक ३८:- बिस्मिल्लाह शाह बाबा दर्गाह, सि.एस.टी. स्टेशन, मुंबई या वक्फ संस्थेच्या व्यवस्थापन योजना मंजूरीसाठी दाखल प्रकरणामध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळापुढे सुनावणी घेऊन योग्य तो निर्णय घेणे बाबत एकमताने ठराव मंजुर करण्यात आला.

विषय क्रमांक. ३८:- हाजी सुमार ट्रस्ट मुंबई च्या मालमत्तेवर क्लासिक कार्पोरेशन कडुन होत असलेल्या बांधकामाबाबत

हाजी सुमार ट्रस्ट मुंबई च्या मालमत्तेवर क्लासिक कार्पोरेशन कडुन बांधकाम करण्यात येत असून सदर मालमत्तेबाबत असलेल्या वादाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात यावा.

ठराव क्रमांक. ३८:- हाजी सुमार ट्रस्ट मुंबई च्या मालमत्तेवर क्लासिक कार्पोरेशन कडुन होत असलेल्या बांधकामाबाबत च्या प्रकरणात महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळापुढे सुनावणी ठेवण्यात यावी, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

अ. क्र.	माननीय सदस्यांचे नांव	स्वाक्षरी
१	डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा मा. अध्यक्ष,	
२	श्री. सय्यद इम्तियाज जलील मा. लोकासभा सदस्य तथा सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	

३	डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान, मा. राज्यसभा तथा सदस्या, म.रा.व.मं.औरंगाबाद	
४	श्री. फारुख अन्वर शाह, मा..विधान सभा सदस्य तथा मा. सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,औरंगाबाद	
५	ॲड. खालीद बाबू कुरैशी मा. सदस्य, म.रा.व. मं औरंगाबाद	
६	मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	signed at (No 6) not executed I object on the matter 17/05/22
७	मा. ॲड. ए. यु. पठाण, मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	17.5.22 signed subject to Subject No. 6 & its resolution not agreed.
८	मा. इम्तियाज मुश्ताक काझी, सह सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग तथा मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	17/5/22
९	मा. समीर गुलामनबी काझी, मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	17/05/22
१०	मा. शेख हसनैन शाकीर, मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	
११	मा. मौलाना सय्यद अतहर अली, मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद	
१२	श्री. अनिस शेख, मुख्य कार्यकारी अधिकारी	